
विज्ञान निर्भयता नीती

# अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका

वर्ष दुसरे । अंक चौथा

एप्रिल २०२२





## विनम्र अभिवादन

चमत्कार किती साधू दाखविती । तया पायी मती न ये माझी ।।
ठाणके ठुणके भानामती-खेळ । ऐसे गुरू फोल राहे जगी ।।
दाखविती भोळ्या जना चमत्कार । आम्ही फसणार नाही त्याने ।।
तुकड्यादास म्हणे तोचि संत जाण । ज्याने आत्मज्ञान प्राप्त केले।।

भुते कै काढती स्मशानी जागती । यंत्रे चालविती तंत्रासही ।।
ऐसे गुरू किती भेटले फुकट । तरी आम्हा वीट वाटे त्यांचा ।।
गारुड्याने जरी जादू दाखविली । ते 'गुरुमाऊली' म्हणो कैसी?।।
तुकड्यादास म्हणे गुरू तो वेगळा । जाणतसे कळा आत्मरूपी।।

पुत्र द्यावयासी झुरताती गुरू । जाणावे लुटारू कानकोंडे।।
होईना जाईना एक यांच्या हाते । तोंडाचेचि दाते वाजविती ।।
यांच्या बोले जरी पुत्र होय लोका । कासयासी भिका मागती हे ।।
तुकड्यादास म्हणे ऐशा गुरुपाठी । हाणावया काठी भिऊ नये।।

**– राष्ट्रसंत तुकडोजी महाराज**





**डॉ. नरेंद्र दाभोलकर**
संस्थापक कार्याध्यक्ष
महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती

**अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका**

**संपादक**
नितीन शिंदे

**कार्यकारी संपादक**
उत्तम जोगदंड

**सहसंपादक**
एकनाथ पाटील

**सदस्य**
दीपक बाविस्कर
श्यामसुंदर मिरजकर
मांतेश हिरेमठ

**व्यवस्थापकीय संपादक**
विशाल विमल
अजय भालकर

**सदस्य**
तुकाराम शिंदे
राजेंद्र फेगडे

**वार्षिक वर्गणी**
**४००** रु. (व्यक्तीसाठी)
**५००** रु. (संस्थेसाठी)

**वर्गणी पाठविण्याची सुविधाः**
महाराष्ट्र अंनिस अंतर्गत प्रकाशन संस्थेच्या खाली नोंदविलेल्या बँक खात्यावर वर्गणीची रक्कम पाठवू शकता.
विवेक जागर संस्था,
आय.सी.आय.सी.आय. बँक, मुंदडा मार्केट, धुळे
खाते नंबर : 646301002757
IFSC Code : ICIC0006463
● वर्गणीची रक्कम ऑनलाईन पाठविल्याचा स्क्रीनशॉट अजय भालकर ९३५९०८०८२० या व्हॉटस्‌अप नंबरवर पाठवावा. लगतच्या अंकासोबत वर्गणीची पावती पाठवली जाईल.

**सल्लागार मंडळ**
प्रदीप पाटकर
संध्या नरे-पवार

**कायदेशीर सल्लागार**
ॲड. गोविंद पाटील

**मुद्रितशोधन** : प्रल्हाद मिस्त्री

**मुखपृष्ठ** : अभिजीत वागिरे

**स्वागतमूल्य** : ₹ २५/-

विवेकी विचार हेच खरे माणूसपणाचे लक्षण
**महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे मुखपत्र**

# अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका

विज्ञान निर्भयता नीती

**वर्ष दुसरे । अंक चौथा**
**एप्रिल २०२२**

## अनुक्रमणिका

- **संपादकीय** २
- **अभिवादन**
  फुले-आंबेडकरांचे मानवतेस योगदान/ प्रा.डॉ.श्रीकृष्ण महाजन ३
  अंधश्रद्धेला सुरुंग लावणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर/ प्रा.सुशील मेश्राम ५
- **वर्तमान**
  हिजाब, बुरखा आणि भारतीयांचे पेहराव/ रूकसाना मुल्ला ८
- **बुवाबाजी**
  तर्क गमावलेली 'झुंड' / विनायक सावळे ११
- **संतांचिये द्वारी**
  चक्रधरस्वामींचा स्त्रीविषयक दृष्टीकोन/ प्रा. कोमल कुंदप १३
- **विज्ञान विश्व**
  वैज्ञानिक मानसिकता : काळाची गरज/ सुधीर फाकटकर १५
- **मनापासून**
  अंतरीची सल/ डॉ. प्रदीप पाटकर १९
- **चमत्कार जनामनातील**
  व्हायरस कोरोनाचा, फसवा इलाज G3 चा/ प्राचार्य मच्छिंद्रनाथ मुंडे २०
- **जडणघडण**
  ...आणि संघटनेमुळे विवेकशील झालो/ अमोल चौगुले २१
- **चित्रपट परीक्षण**
  झुंडः व्यवस्थेच्या दगडी भिंतीला पारदर्शक करणारा सिनेमा/ प्रा.डॉ. शामसुंदर मिरजकर २३
- **पुस्तक परिचय**
  'स्त्री जन्मत नाही, तर ती घडवली जाते' हे सिद्ध करणारा ग्रंथ :
  द सेकंड सेक्स/ यशवंती शिंदे २५
- **विविध उपक्रमांच्या वाटेवर/ अनिल शोभना वसंत** २७
- **महा. अनिसची खबरबात/ विशाल विमल** २९

सदरचे मासिक संपादक नितीन शिवाजीराव शिंदे यांनी भारती मुद्रणालय, शाहूपुरी, कोल्हापूर येथे छापले आणि प्रकाशक संजय बापूराव बनसोडे यांनी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, महात्मा फुले कॉलनी, इस्लामपूर (जिल्हा सांगली) ४१५ ४०९ येथून प्रकाशित केले आहे. महा. अंनिससाठी विवेक जागर संस्थेच्यावतीने प्रकाशित करण्यात आलेल्या या अंकात व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, प्रकाशक, महा. अंनिस आणि विवेक जागर संस्था सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर बाबींसाठी मा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारीसाहेब इस्लामपूर, ता. वाळवा, जि. सांगली यांचे कार्यक्षेत्र असेल.

**संपादकीय पत्ता**
संपादक, अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका,
'कल्पतरु', कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजसमोर,
इस्लामपूर, जि. सांगली - ४१५४०९.

## विवेकाचा आवाज बुलंद करूया

गेल्या काही वर्षातील जगभरातील घडामोडी पाहाता, विवेकाची वाट किती खडतर आहे, या वाटेवर किती काटे आहेत हे प्रकर्षाने जाणवते आहे. विवेकवादाला असलेला हा धोका अगदी सार्वत्रिक आहे. हा धोका केवळ विवेकवादालाच नाही, तर जागतिक मानवी सहजीवन, शांतता, पर्यावरण, मानवता यांनाही आहे. जागतिक स्तरावरील याचे ठसठशीत आणि अगदी ताजे उदाहरण आहे रशियाच्या युक्रेनवरील आक्रमणाचे.

जगातील दोन महासत्ता अमेरिका आणि रशिया यांच्यात शीतयुद्ध सुरू झाल्याच्या काळापासून, आपणच महाशक्तिमान आहोत हे जगावर बिंबवण्यासाठी त्यांनी जे काही केले आहे किंवा आज ते जे करीत आहेत, त्यात विवेकाचा बळी गेलेला आहे. परिणामी, आज जग ज्वालामुखीच्या तोंडावर उभे असल्यासारखी भीषण परिस्थिती निर्माण झाली आहे. खरे तर, विज्ञानाने प्रगतीची उत्तुंग झेप घेतली असताना याच विज्ञानाचा उपयोग करून पृथ्वीचे पर्यावरण कसे स्वच्छ ठेवले जाईल, मानवाच्या अस्तित्वाला असलेला धोका कसा दूर करता येईल, संपूर्ण मानवी प्रजातीचे जीवन कसे सुसह्य करता येईल, यासाठी या महासत्ता काहीतरी करतील अशी अपेक्षा होती. परंतु, एकीकडे केवळ काही महिन्यांपूर्वी जेम्स वेब ही अवकाश दुर्बीण पृथ्वीपासून तब्बल १५ लाख किलोमीटर दूर अंतरावर पोहोचवून मानवाच्या विज्ञानातील प्रगतीचे पान सुवर्णाक्षरांनी लिहिले जात असतानाच रशियाने युक्रेनवर आक्रमण केले आणि जागतिक शांतता, अर्थव्यवस्था, पर्यावरण आणि एकूणच मानवी जीवन धोक्यात आणले आहे.

'युद्धस्य कथा रम्या:' असे सुरक्षित अंतरावर आपल्या देशात टीव्हीसमोर बसणाऱ्याला वाटत असते. परंतु, रशिया-युक्रेन युद्धाच्या ज्या बातम्या येत आहेत, त्या कोणाही संवेदनशील माणसाला अस्वस्थ करून टाकणाऱ्या आहेत. मोठ्या प्रमाणात होत असलेले नागरिकांचे आणि सैनिकांचे मृत्यू, स्फोटाने कोसळलेल्या इमारती, मोठ्या प्रमाणावरील वित्तहानी यामुळे युक्रेनचे कंबरडेच मोडणार आहे. युक्रेनमध्ये शिक्षण घेत असलेल्या भारतीय विद्यार्थ्यांची जीव वाचवून मायदेशी परतण्यासाठीची केविलवाणी धडपड, त्यांच्या पालकांच्या चेहेऱ्यावरील चिंता, सुरक्षित ठिकाणी जाण्यासाठी युक्रेनमधील लोकांची चाललेली जीवघेणी धावपळ हे पाहून कोणाही सूज्ञ माणसाचे मन गलबलून जाईल. या युद्धाचे परिणाम जगातील जवळजवळ सर्वच देशांवर होणार आहेत. त्यातून सावरायला कित्येक दशके लागणार आहेत. या युद्धामुळे ज्यांनी ज्यांनी आपल्या प्रिय व्यक्ती गमावल्या त्यांच्या भावीजीवनावर होणाऱ्या परिणामांची तर गणतीच करता येणार नाही. हे झाले आहे माणसाच्या अविवेकी वर्तनाने.

जगाला सध्या तातडीची गरज आहे ती शांततामय सहजीवनाची, प्रेमाची आणि बंधुभावाची आणि हे साध्य करायचे असेल, तर युद्धाचा नव्हे, तर बुद्धाचा मार्ग जगाने अनुसरला पाहिजे. गांधीजींचा मार्ग जगाने अनुसरला पाहिजे. त्यामुळे युद्धाला विश्वात स्थानच राहाणार नाही. असे झाल्यास शस्त्रास्त्र उत्पादनावर होणारा विविध देशांचा खर्च विधायक कामासाठी वापरला जाऊ शकतो. शिक्षण, आरोग्य, पर्यावरणरक्षण यासाठी वापरला जाऊ शकतो. किती असावा बरे जगाचा शस्त्रांवरील खर्च? 'ॲम्नेस्टी'च्या अंदाजानुसार २०१७ साली (म्हणजे या एका वर्षात) जगातील १०० मोठ्या शस्त्रास्त्र कंपन्यांनी एकूण ३९,८२० कोटी यूएस डॉलर्स एवढ्या रकमेची शस्त्रास्त्र विक्री केली. एका डॉलरचा दर अंदाजे रु.७५ गृहीत धरल्यास, रुपयात हे मूल्य रु.२९,८६,५०० कोटी एवढे येते. या एवढ्या प्रचंड रकमेला विधायक कार्याकडे वळवण्यात केवळ आणि केवळ एकच अडथळा आहे. तो म्हणजे विवेकपूर्ण विचारांचा अभाव. म्हणूनच या विवेकी विचारांची, बुद्धाच्या विचारांची पेरणी संपूर्ण जगात झाली पाहिजे. ही पेरणी करण्याची प्रक्रिया प्रदीर्घ आहे. या मार्गात संकटे खूप आहेत. या संकटांना झुंजायची नशा जडल्याशिवाय हे सध्या होणार नाही. हे साध्य करण्यासाठी सारे मिळून विवेकाचा आवाज बुलंद करूया!

उत्तम जोगदंड



# फुले-आंबेडकरांचे मानवतेस योगदान

प्रा. डॉ. श्रीकृष्ण महाजन

"डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी उच्चवर्णीयांना जातीच्या अहतां सोडायला लावण्याचा प्रयत्न केला. त्याच वेळी वंचित समाजाचे समग्र मानसिक परिवर्तन करून आत्मसन्मान आणि अस्मिता जागविली. ज्ञानाच्या भांडारावर हुकमत मिळवून त्यांनी धर्म आणि संस्कृतीची कठोर तर्कनिष्ठ चिकित्सा केली. शिक्षणाचे महत्त्व स्वतः जाणले आणि समाजाला त्याबाबत जागृत केले. शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा हा शिक्षणातून क्रांती घडविणारा त्यांचा विचार भारतीय समाजाच्या परिवर्तनास कारणीभूत ठरला. स्त्रियांच्या हक्कासाठी संविधानात तरतूद करून आणि हिंदू कोड बिलाच्या माध्यमातून स्त्री हक्काची सनदच त्यांनी देशाला बहाल केली."

भारतीय समाजातील वंचितांच्या मागासलेपणाला भांडवलशाहीतून येणारे वर्ग हेच फक्त कारण नव्हते, तर जात-वर्णव्यवस्थेने त्यांच्यावर लादलेली बंधने आणि काहींना दिलेले विशेषाधिकार यामुळे ही सामाजिक रचना शोषणाची व्यवस्था बनून राहिली होती. जात ही या देशातील सर्वात मोठी अंधश्रद्धा असूनही त्यादृष्टीने त्याची फारशी चर्चा होताना दिसत नाही. अर्थात, महात्मा जोतीराव फुले, राजर्षी शाहू महाराज, विठ्ठल रामजी शिंदे , डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी या प्रश्नाकडे त्यादृष्टीने पाहिले. हा प्रश्न फक्त वंचितांचा नसून तो संपूर्ण देशाचा आहे. किंबहुना मानवी समाजाचा आहे, हे समजून घेतले पाहिजे. गरिबी, बेरोजगारी, प्रादेशिक मागासलेपण अशा अनेक समस्यांचा अंतरसंबंध हा या सामाजिक समस्यांशी आहे, हे विसरून चालणार नाही. महात्मा फुले आणि डॉ.आंबेडकर यांनी त्यांच्या विचार आणि कार्याने समाजामध्ये आमूलाग्र बदल घडवून आणले. फुले हे भारताच्या समाजिक क्रांतीचे जनक आहेत, तर डॉ. आंबेडकर हे बुद्धिप्रामाण्यवादी तत्त्वचिंतक आणि लोकशाही मूल्यांचे आग्रही नेते आहेत, ज्यांनी भारताला देश म्हणून घडविण्यासाठी आधुनिक मूल्यांचा वारसा दिला.

धर्मचिकित्सा करून भारतीय समाजातील वाईट चालीरीती नष्ट करण्यासाठी महात्मा फुले यांनी सामाजिक लढा उभा केला. धर्म आणि धर्मग्रंथ ईश्वर निर्मित नसून माणसानेच ते निर्माण केले आहेत. त्यामध्ये सार्वजनिक सत्य नाही. चातुर्वर्ण्य किंवा जातिभेद या गोष्टीसुद्धा देवनिर्मित नसून मानवनिर्मित आहेत, याचे स्पष्ट विश्लेषण त्यांनी केले.

धर्म राज्य भेद मानवा नसावे। सत्याने वागावे ईशासाठी।।
ख्रिस्त महम्मद मांग ब्राह्मणासी। धरावे पोटाशी बंधूपरी।।
निर्मिकाचा धर्म सत्य आहे एक। भांडणे अनेक। कशासाठी?।।

धर्माच्या नावाखाली स्वर्ग-नरक, पुनर्जन्म आणि कर्मसिद्धांत या संकल्पनांनी भारतातील बहुजन समाजाला मानसिक गुलाम बनवून ठेवल्याचे दिसून येते. अशा संकल्पनांना घाबरून धर्माच्या नावाखाली मानसिक गुलामीला बळी पडू नका, असे ते सांगतात. धर्माच्या नावाखाली भेदाभेद करून चालणार नाही आणि निर्मिक एकच असेल, तर आपण बंधुतेने वागले पाहिजे, असा मानवतावादी दृष्टिकोन त्यांनी दिला. तसेच अशा सामाजिक वैगुण्यावर त्यांनी उपाय सुचविले आणि प्रत्यक्ष कृतीने त्यावर तोडगा काढता येतो, हे दाखवून दिले.

थोडे दिन तरी मद्य वर्ज करा। तोच पैसा भरा। ग्रंथासाठी।।
ग्रंथ वाचताना मनी शोध करा। देऊ नका थारा। वैरभावा।।

वाईट सोडून देऊन ज्ञान मिळवण्याचा प्रयत्न केला पाहिजे. सत्याचा शोध घेत असताना वैरभाव असू नये, हा त्यांचा विचार नैतिक अधिष्ठान स्पष्ट करणारा आहे.

विद्येविना मती गेली
मतीविना नीती गेली
नीतीवना गती गेली
गतीविना वित्त गेले
वित्ताविना शूद्र खचले
इतके सारे अनर्थ
एका अविद्येने केले

या मांडणीतून फुल्यांनी बहुजन समाजाच्या अधोगतीची कारणमीमांसा केली. सामाजिक परिवतर्नासाठी शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही, हे त्यांनी जाणले. त्यामुळेच जे गुलामगिरीचे बळी होते, त्यांच्यासाठी त्यांनी शाळा सुरु केल्या. अस्पृश्यांना पाण्याचा हौद खुला करणे हे क्रांतिकारक पाऊल त्यांनी उचलले

म्हणून आजचा मानवी विकास आपण पाहू शकलो. मुलीच्या शाळा सुरू केल्या. स्त्रीमुक्तीच्या कार्याचा महाप्रारंभ यातूनच झाला. ब्राह्मण स्त्रियांच्या मुलांची भृणहत्या होऊ नये, म्हणून बालहत्याप्रतिबंधकगृह उभारले. माणुसकीने गहिवरलेल्या फुले दाम्पत्याने या स्त्रियांचे बाळंतपण स्वतःच्या मुली समजून केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी उच्चवर्णीयांना जातीच्या अहतां सोडायला लावण्याचा प्रयत्न केला. त्याच वेळी वंचित समाजाचे समग्र मानसिक परिवर्तन करून आत्मसन्मान आणि अस्मिता जागविली. ज्ञानाच्या भांडारावर हुकमत मिळवून त्यांनी धर्म आणि संस्कृतीची कठोर तर्कनिष्ठ चिकित्सा केली. शिक्षणाचे महत्त्व स्वतः जाणले आणि समाजाला त्याबाबत जागृत केले. शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा हा शिक्षणातून क्रांती घडविणारा त्यांचा विचार भारतीय समाजाच्या परिवर्तनास कारणीभूत ठरला. स्त्रियांच्या हक्कासाठी संविधानात तरतूद करून आणि हिंदू कोड बिलाच्या माध्यमातून स्त्री हक्काची सनदच त्यांनी देशाला बहाल केली.

बुरसटलेल्या चालीरीती व रूढी परंपरा यावर आसूड ओढले आणि एकूण समाजाला गुलामीतून बाहेर काढून माणूस बनण्यास प्रवृत्त केले. हिंदू धर्मातील वर्ण व जातिव्यवस्थेसह इतर अनेक वाईट रुढींच्या विरोधात सातत्याने आवाज उठविला आणि धर्माच्या ठेकेदारांना बदलाचे आवाहनही केले. तथापि, ही चिवट व्यवस्था बदलायला तयार नाही, हे ओळखून आयुष्याच्या उत्तरार्धात त्यांनी बौद्ध धम्म स्वीकारला. जो स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय अशा मानवी मूल्यांचा अंगीकार करणारा आहे.

भारतात फक्त राजकीय लोकशाही रुजून पुरेशी नाही, तर आर्थिक व सामाजिक लोकशाहीसुद्धा निर्माण झाली पाहिजे, असा विचार त्यांनी आग्रहाने मांडला. वर्तमानातील लोकशाहीची स्थिती पाहिली की तो विचार देशासाठी किती महत्त्वाचा आहे, हे पटते. आधुनिक मूल्यांवर आधारित संविधानाची निर्मिती त्यांच्या नेतृत्वाखाली झाली. भारतीय संविधानाच्या माध्यमातून केलेल्या तरतुदींसाठी डॉ. आंबेडकरांना संविधानसभेत बौद्धिक लढा द्यावा लागला होता. मानववंशशास्त्र, समाजशास्त्र, कायदा, राज्यघटना इतिहास, अर्थशास्त्र, तत्त्वज्ञान व विज्ञान अशा विविध विषयांत पारंगत असणाऱ्या डॉ.आंबेडकरांनी प्रचंड वाचन केले, प्रचंड लेखन केले. त्याच वेळी समाजप्रबोधनासाठी व्याख्याने दिली. तर्कशुद्ध व सार्वत्रिक हितासाठी त्यांनी आपली लेखणी आणि वाणी झिजवली.

फुले-आंबेडकरांनी धर्म, समाज आणि संस्कृतीची चिकित्सा केली. अस्पृश्यता आणि जातिभेदाविरुद्ध यशस्वी लढा दिला. स्त्री हक्कासाठी विचार मांडले आणि कृतिशीलता दाखविली. फुले-आंबेडकरांनी केलेल्या कार्याच्या मध्यावरील राजर्षी शाहूंचे कार्य आणि विचार या दोन महामानवांच्या कार्याला सांधणारे ठरले हेही विसरून चालणार नाही. मानवी जीवनाच्या विविध क्षेत्रात फुले-आंबेडकरांनी आपला ठसा उमटविला आहे. त्यांनी केलेला संघर्ष हा एकाच समाज समूहासाठी मर्यादित नव्हता तर एकूण मानवजातीसाठी होता, असेच दसून येते. त्यांचे स्वातंत्र्याचे, समतेचे व बंधुतेचे विचार अंगीकारणे, अंधश्रद्धा सोडून देणे, बुद्धिवादी व तर्कसंगत वर्तन करणे, हेच खरे या महामानवांना अभिवादन ठरेल.

(लेखक : डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्र, शिवाजी विद्यापीठ येथे संचालक म्हणून कार्यरत आहेत.)

●

## जटा निर्मूलन

**इस्लामपूर :** वाळवा येथील सौ. विजया बजरंग पाटील (वय ५५) यांचे इस्लामपूर शाखेच्या वतीने दि. १ फेब्रु. २०२२ रोजी जटा निर्मूलन करण्यात आले. गेली अकरा वर्षे अंधश्रध्देपोटी त्यांनी जटा जोपासलेल्या होत्या. वाळवा पंचायती समितीचे उपसभापती नेताजीराव पाटील (बाबा) यांच्या प्रमुख उपस्थितीत डॉ.नितीन शिंदे, प्रा.सतीश चौगुले, अंनिसचे कार्याध्यक्ष प्रा.बी.आर.जाधव, निलेश कुडाळकर, राजेंद्र मोटे, अरुण पाटील यांनी कुटुंबियांचे प्रबोधन करून जटा निर्मूलन केले. सौ.पाटील यांचा मुलगा सागर, सुनबाई अश्विनी आणि सोनाली पाटील यांनी याप्रसंगी मोलाचे सहकार्य केले.









# अंधश्रद्धेला सुरूंग लावणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर

सुशील मेश्राम
९८६०३२२३८५

> “नैतिकता हे बाबासाहेबांच्या चळवळीचे अधिष्ठान आहे. धर्मांधतेसमोर बाबासाहेबांनी बुद्ध धम्माचा नैतिक पर्याय उभा केला. म्हणून बुद्धधम्माचे नागरिकत्व अभिमानास्पद वाटते. त्यांनी दिलेला बुद्धाचा धम्म ही नैतिक जीवनप्रणाली आहे. बाबासाहेबांच्या धम्माने दैववाद, अवतारवाद, अंधश्रद्धा, अमानुषता, धर्मांधता इ. ना सुरुंग लावण्याचे मानवतावादी कार्य केले. धम्मचक्र प्रवर्तनाच्या सोहळ्यात त्यांनी बुद्ध धम्माच्या नागरिकांना दिलेल्या बावीस प्रतिज्ञा म्हणजे बाबासाहेबांचा ‘धम्म’ आहे. आंबेडकरी जीवनशैलीचे प्रमाणक या बावीस प्रतिज्ञा आहेत. ही नीतीप्रणाली म्हणजे आंबेडकरी प्रतिभेचा अत्यंत प्रगल्भ आविष्कार आहे. या बावीस प्रतिज्ञा म्हणजे परंपरागत कौरूप्याला दिलेला सौंदर्यसौष्ठव पर्याय आहे.”

डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणजे धगधगता संघर्ष नाव हा महामानव सबंध आयुष्यभर अमानुषता, अनैतिकता व अंधश्रद्धेच्याविरुद्ध दोन हात करीत जगला. अमानुषतेविरुद्ध – मानुषता, अनितीविरुद्ध नीती, क्रांतीविरुद्ध प्रतिक्रांती असाच हा संघर्ष होता. या देशात प्रबुद्ध समाजाची निर्मिती करण्यासाठी बाबासाहेबांचे व्यक्तिमत्त्व अमानुषतेविरुद्ध कायम झुंज देत होते.

नैतिकता हे बाबासाहेबांच्या चळवळीचे अधिष्ठान आहे. धर्मांधतेसमोर बाबासाहेबांनी बुद्ध धम्माचा नैतिक पर्याय उभा केला. म्हणून बुद्धधम्माचे नागरिकत्व अभिमानास्पद वाटते. त्यांनी दिलेला बुद्धाचा धम्म ही नैतिक जीवनप्रणाली आहे. बाबासाहेबांच्या धम्माने दैववाद, अवतारवाद, अंधश्रद्धा, अमानुषता, धर्मांधता इ. ना सुरुंग लावण्याचे मानवतावादी कार्य केले. धम्मचक्र प्रवर्तनाच्या सोहळ्यात त्यांनी बुद्ध धम्माच्या नागरिकांना दिलेल्या बावीस प्रतिज्ञा म्हणजे बाबासाहेबांचा ‘धम्म’ आहे. आंबेडकरी जीवनशैलीचे प्रमाणक या बावीस प्रतिज्ञा आहेत. ही नीतीप्रणाली म्हणजे आंबेडकरी प्रतिभेचा अत्यंत प्रगल्भ आविष्कार आहे. या बावीस प्रतिज्ञा म्हणजे परंपरागत कौरूप्याला दिलेला सौंदर्यसौष्ठव पर्याय आहे.

एका माणसाने दुसऱ्या माणसाशी, पर्यायाने समाजाशी व देशाशी कसे वागले पाहिजे आणि देशाने आपल्या नागरिकांशी कसे वर्तन करावे, यासाठी भारतीय संविधानाची निर्मिती बाबासाहेबांनी केली. माणसाच्या या सार्वजनिक वा सामाजिक अस्तित्वासोबतच माणसाचे वैयक्तिक अस्तित्वही असते, याची पूर्ण कल्पना बाबासाहेबांना होती. पण या देशाने त्यांच्या वैयक्तिक अस्तित्वाला पुरेसा न्याय दिला नाही. एका व्यक्तीने कसे वागावे, कसा विचार व आचार ठेवावा. स्वत:च्या वैचारिकतेचे, व्यावहारिकतेचे नियमन कशा प्रकारे करावे या ऐतिहासिक गरजेपोटी त्यांनी बुद्धाच्या धम्माचा पर्याय स्वीकारला व बावीस कलमी नैतिक संविधान धम्माच्या अनुयायांना दिले.

देशातील सर्व जाती-धर्म-पंथीयांसाठी भारतीय संविधान तर धम्मसमुदायींसाठी २२ प्रतिज्ञांचे संविधान अशी दोन स्वतंत्र संविधाने त्यांनी निर्माण केले. त्यापैकी हे २२ प्रतिज्ञांचे संविधान मात्र उपेक्षितच राहिले, असे निदर्शनास येते. या बावीस कलमी संविधानाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे ते अत्यंत उन्नत, प्रगल्भ अशा व्यक्तिमत्त्वाचा तो निर्भय आविष्कार आहे. जीवनातील सर्वच अंधश्रद्धांना, अनितीला, सुरूंग लावून निर्भय मानवतावादाचा मुकुट व्यक्तीच्या कपाळावर मिरविणारे, ‘बहुजन हिताय बहुजन सुखाय’चा जागर करणारे तत्त्व यात असून एका महापुरुषाचे आर्त स्वगत आहेत.

पहिल्या तीन प्रतिज्ञा हिंदू देवदेवतांचे नाव घेऊन, त्यांची उपासना नाकारणाऱ्या आहेत. देवाच्या नावावर सर्वसामान्यांचा मेंदू लुबाडणाऱ्या, पूजा, रूढी, परंपरा देवाला पुढे करूनच बनविल्या गेल्या. त्या दैववादावरच या प्रतिज्ञांनी नकाराचा नांगर चालविला आहे. कारण देव म्हटला की मंदिर आलं. मंदिर आलं की मूर्ती आली, नवस आला, चमत्कार आला म्हणून देव ही कल्पनाच बाबासाहेबांनी नाकारली.

अवतारवाद प्रतिज्ञेवर नाकारताना मध्ययुगीन कालखंडात बुद्धाला बोथट करण्यासाठी, ‘बुद्ध हा विष्णूचा अवतार आहे’ असे सांगून समरसतेच्या हलाहलात बुद्धाला बुडविले गेले. अवताराच्या नावावर आजही रामरहीम, राधे माँ, आसाराम बापूंसारखी मंडळी मोठ्या प्रमाणात पिळवणूक, लुबाडणूक करताना दिसतच आहेत. असे अनेक बुवा-बापू, अम्मा

समाजात वावरतच आहेत व अज्ञानी जनतेला नाडवत आहेत, अशा अवतारांपासून बाबासाहेबांनी बुद्धाला तोडून व निरीश्वरवाद्यांच्या छावणीत बसविले. 'बुद्ध मार्गदाता आहे मोक्षदाता नव्हे', असे सांगितले.

डॉ.आंबेडकरांच्या या परमेश्वर विरोधामागे कबीरपंथी संस्कार ते निस्सीम निरीश्वरवाद असा विलक्षण प्रवास उभा आहे. 'यदा ही धर्मस्य' या फसवेगिरीला दिलेले बाबासाहेबांचे हे चोख उत्तर आहे. आपल्या उभ्या आयुष्यात या सर्व देवादिकांचे त्यांनी ऑडीट केले व सगळे फ्रॉड्स डिक्टेट केले. देव निर्माणकर्त्याने माणसाच्या धडावर हत्ती, वराह वगैरे शिर लावून माणसाला पशू बनविले. धर्माने माणसातील पशुत्व घालवायचे सोडून माणसालाच पशू बनविले. बाबासाहेबांनी राम-कृष्णाचे रिडल्स जनतेसमोर आणले. देवाशी दोन हात करणारे नास्तिक ग्रंथ निर्माण केले. परमेश्वरशाहीचा धिक्कार हे बाबासाहेबांच्या नैतिक संविधानाचे प्रथम मार्गदर्शक तत्त्व आहे.

बाबासाहेबांनी परंपरेला नाकारत असताना काही स्वीकार्यही ठरविले. बुद्धाचे पंचशील हे मानवी वर्तनशुद्धीचे महत्त्वाचे तत्त्व सांगितले. परंतु पंचशील देण्याच्या आधी दैववाद नाकारण्याला अग्रक्रम दिला, हे आपण लक्षात घेतले पाहिजे. यावरून दैववादाची भीषणता लक्षात घ्यावी. पहिल्या पाच प्रतिज्ञांमधून बाबासाहेबांनी अध्यात्माचे, दैववादाचे, अवतारवादाचे सारे दोरच कापून टाकले.

देशातील नागरिकांसाठी स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय, धर्मनिरपेक्षता असे संविधान देऊन परंपरागत विषमतेला, अन्यायाला धर्मांधतेला खीळ लावण्याचे कार्य बाबासाहेबांनी केले. तर बुद्ध धम्माच्या साधकांसाठी बुद्धाचा नीतीमार्ग प्रमाण मानला. बुद्धाचा आर्य अष्टांगिक मार्ग (प्र.क्र. ११ ) दहा पारमिता (क्र. १२ ) आणि पंचशील (क्र. १३ ते १७ ) ही सर्व मानवी वर्तन प्रमाणके होत. केवळ परंपरा, परमेश्वर व दैववाद नाकारल्याने मानवी जीवनाचे ईप्सित साध्य होणार नाही, तर सम्यक दृष्टिकोन स्वीकारून करूणा व मैत्रीचे अधिष्ठान प्राप्त करून सम्यक व समृद्ध अशा मानवी व्यक्तिमत्त्वाची निर्मिती होऊ शकते, हा विश्वास बाबासाहेबांना होता. म्हणून बुद्धाच्या नीतीमूल्यांचा स्वीकार करण्याची प्रतिज्ञा त्यांनी दिली. या प्रतिज्ञांना कुठेही अध्यात्माचा, अलौकिकाचा स्पर्श नाही. या पूर्णत: मानवीय आहेत.

समाजातील पुरोहितशाही, कर्मकांड हे धोके लक्षात घेत, 'मी श्राद्धपक्ष करणार नाही. पिंडदान करणार नाही आणि कोणतेही क्रियाकर्म मी ब्राह्मणाचे हातून करून घेणार नाही.' अशाप्रकारे कर्मकांड व पुरोहितशाहीचा निषेध करण्याची प्रतिज्ञा घेऊनही बौद्ध समाजात नदीत राख विसर्जन, तेरवी, तिरडी, विसावा, परित्राण पाठ इ. कर्मकांड सुरू आहेतच. बौद्ध अनुयायाला स्वत: बौद्धविधी करण्याची परवानगी असताना पाली भाषेतील बौद्ध गाथा मराठीत भाषांतरित झालेली संहिता उपलब्ध असतानाही भिक्षूच्यामार्फत पुरोहितशाही सुरू असल्यामुळे या प्रतिज्ञांकडे बौद्ध समाजाने दुर्लक्ष केले असे म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही.

बाबासाहेबांना प्रखर विज्ञाननिष्ठ समाज हवा होता म्हणून त्यांनी श्रद्धादी क्रियाकर्मांना प्रतिज्ञापूर्वक नाकारण्यास सांगितले. वैज्ञानिक दृष्टिकोन म्हणजे, पुरावा उपलब्ध आहे तेवढा विश्वास ठेवणे. विज्ञान म्हणजे सत्य. भिक्षूच्या घरप्रवेशाने किंवा बौद्ध गाथेच्या पठणाने घराला पावित्र्य येत नसून, गाथेचा अर्थ समजून घेऊन त्याचे योग्यप्रकारे आकलन करून घेऊन प्रत्यक्ष आचरण केल्याशिवाय घराला, घरातील व्यक्तींच्या व्यक्तित्वाला मांगल्य, पावित्र्य कसे प्राप्त होणार? क्षणाक्षणाला डोळस बुद्धी ठेवूनच मनुष्य स्वप्रगती करू शकतो व इतरांचेही कल्याण साधू शकतो. श्रद्धादी कर्मकांड केल्याने फक्त पुरोहितांचे पोट भरू शकते. म्हणून या क्रियाकर्मांना प्रतिज्ञेवर नाकारणे आवश्यक आहे.

भारतीय परंपरेने स्त्रीशूद्रातिशूद्रांना निचोत्तम स्थान दिले व वेदांनी माणसामाणसांत भेद केले. मी 'सर्व मनुष्यमात्र समान मानतो' (प्र.क्र. ९ ) व 'मी समता स्थापन करण्याचा प्रयत्न करीन.' या दोन प्रतिज्ञांनी विषमतेवर घाव करीत सर्वांप्रति समताभाव, बंधुत्व व मैत्री करण्याचे अभिवचन दिले. हिंदू कोड बिलाच्या माध्यमातून सबंध भारतीय स्त्रियांच्या मुक्तीचा जाहीरनामा बाबासाहेबांनी मांडला. परंतु आपल्या घरातील स्त्री-पुरुष सत्तेत बद्ध आहे व आपण पोटजातीच्या बाहेर यायला तयार नाही. सर्वांना मतदानाचा हक्क व सर्व मतांना समान मूल्य सांगणाऱ्या बौद्ध अनुयायांनी वरील दोन्ही प्रतिज्ञांचे पुन्हा नव्याने आकलन करून घेण्याची गरज आहे. जेणेकरून घराघरांतील विषमतेला पायबंद बसेल व समतेच्या मार्गातील अडचणी सोडविणे शक्य होतील.

बाबासाहेबांच्या या बावीस प्रतिज्ञा पूर्णत: मानवीय आहेत. मानवापेक्षा श्रेष्ठ कोणीही नाही. मानव हा 'मन आणि शरीर' या दोन तत्त्वांनी बनलेला आहे. शरीरावर मनाचे नियंत्रण पाहिजे. कारण मनच शरीराचे वहन करते. म्हणून मनावरच परंपरेने घाव केले. देवादिकांचा धाक दाखवून मानसिक गुलाम केले. वरील प्रतिज्ञा सर्व प्रकारच्या मानसिक गुलामीला काळे फासून सम्यक व्यक्तित्वनिर्मितीचे मार्ग प्रशस्त करतात. या प्रतिज्ञा म्हणजे नियम नसून स्वयंनिर्णय आहेत. या प्रतिज्ञा नास्तिक, इहवादी, बुद्धिप्रामाण्यवादी, बुद्धनितीवादी आणि विज्ञाननिष्ठ आहेत. बाबासाहेबांचा धम्मानुयायी धर्मांधता अंधश्रद्धा, अनिती, अमानुषता, पाशवीपणा आणि अविचाराच्या अंधारयात्रेत भरकटल्या जावू नये तर तो डोळस, बुद्धिवादी, विज्ञानवादी बनून त्याने स्वत:चे, आपल्या

समाजाचे, देशाचे किंबहुना सबंध विश्वाचे कल्याण साधावे म्हणून बाबासाहेबांनी आयुष्यभर चिंतन, मनन करून आपल्या विचाराचे वेळोवेळी परिष्करण केले व आयुष्याच्या उत्तरार्धात धम्मदीक्षेसोबतच बावीस कलमी प्रतिज्ञांचे नैतिक संविधान दिले.

या प्रतिज्ञा समूहात 'माझा नवा जन्म होत आहे असे मी मानतो'(२१) आणि 'मी इत:पर बुद्धाच्या शिकवणीप्रमाणे वागेन अशी प्रतिज्ञा करतो'(२२) ही शेवटची सुंदर प्रतिज्ञा आहे. बाबासाहेबांचा धर्मत्याग व धम्मस्वीकारप्रसंगीची तरल मनोवस्था नेमकी या प्रतिज्ञांमधून व्यक्त होते. बाबासाहेबांनी अथक परिश्रमातून प्रकांड पांडित्य प्राप्त केले. तरीही कर्मठ हिंदुत्ववाद्यांनी त्यांचा छळवाद थांबवला नाही. त्यांना मानवापेक्षा धर्म मोठा वाटत राहिला. बाबासाहेबांनी सांगितले, 'माणूस धर्मासाठी नसून धर्म मानवासाठी आहे'; परंतु माणुसकीला पारखे झालेल्यांना हे कसे कळणार? शेवटी आपल्या देशबांधवाचे, शेकडो पिढ्यांचे कल्याण लक्षात घेत आपल्या जुन्या, मनुष्यमात्राच्या उत्कर्षाला हानीकारक असणाऱ्या आणि मनुष्यमात्राला असमान व नीच मानणाऱ्या हिंदूधर्माचा त्यांनी त्याग केला व त्यासोबतच सर्व मनुष्यमात्रास समान माननाऱ्या, सर्व मनुष्यमात्रांना उत्कर्ष करण्याची संधी देणाऱ्या बुद्धधम्माचा स्वीकार केला. पंचशील, अष्टशील, दहा पारमिता पाळण्याची प्रतिज्ञा घेऊन व देऊन सांगितले की, हा धम्म म्हणजे आपण गळ्यात मढे अडकवून घेत आहोत, असे मानू नका. बौद्ध धम्माच्या दृष्टीने भारताची भूमी सध्या शून्यवत आहे. म्हणून आपण उत्तमरीतीने धम्म पाळण्याचा निर्धार केला पाहिजे. नाहीतर महार लोकांनी तो निंदाजनक स्थितीत आणला, असा आरोप होणार नाही ह्याची काळजी घ्या. हे आपल्याला साधले, तर आपण आपल्याबरोबर देशाचा इतकेच नव्हे; तर जगाचाही उद्धार करू. कारण बौद्ध धम्मानेच जगाचा उद्धार होणार आहे, असे त्यांनी धम्मदीक्षाप्रसंगी दिलेल्या भाषणात सांगितले.

धम्माचा मार्ग म्हणजे मानवी अभ्युदयाचा, उत्कर्षाचा मार्ग आहे. धम्माची आवश्यकता गरिबांना असते. गरिबांना धम्म आशावादी बनवतो व सांगतो की, घाबरून जाऊ नकोस. विवेकाला सोडू नकोस, जीवन सुखी होईल. धम्मानुसार आचरण केलेस, तर निराशा तर जाईलच; पण आशावादी जीवनाचे मार्ग प्रशस्त होतील. तुझा उत्कर्ष करणे तुझ्याच हातात आहे, हे तुझ्या लक्षात येईल. हाच नवा जन्म आहे, असे बाबासाहेबांना वाटले असावे म्हणून धम्मस्वीकार प्रसंगीच्या भाषणात ते म्हणतात की, 'मला आज नरकातून सुटल्यासारखे वाटते, मला हर्षवायू झाला आहे.' अशा प्रकारे हिंदूधर्मत्याग करून बाबासाहेबांनी सर्वच अंधश्रद्धांच्या, अनितीच्या पावलांखाली सुरूंग लावले व बुद्धधम्माच्या माध्यमातून देशाला नवी पहाट दाखविली.

(लेखक सेवादल महिला महाविद्यालय, नागपूर येथे कार्यरत आहेत.)

●

---

**रंजना गवांदे यांना पुरस्कार !**



**मुंबई :** महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्यावतीने महिला दिनानिमित्त आदिशक्ती प्रेरणा पुरस्कार वितरित करण्यात येतो. हा मानाचा पुरस्कार महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या राज्य पदाधिकारी अँड. रंजना गवांदे (संगमनेर) यांना देण्यात आला आहे. महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर, जलसंधारण मंत्री जयंत पाटील, शिक्षण मंत्री वर्षा गायकवाड , उच्च व तांत्रिक शिक्षण मंत्री  उदय सामंत आणि पहिल्या टेस्ट ट्यूब बेबी घ्या निर्मात्या डॉ इंदिरा हिंदुजा यांच्या उपस्थितीत सह्याद्री अतिथीगृह मुंबई येथे या कार्यक्रम झाला.



# हिजाब, बुरखा आणि भारतीयांचे पेहराव

रुकसाना मुल्ला
७०६६३३४३३३

"कर्नाटकातील घटनेने 'हिजाब' हा मुद्दा आणखीच अधोरेखित झाला. त्यात 'पहले हिजाब-फिर किताब, हिजाब मेरी शान है, हिजाब मेरी पहचान है।' असे फलक हातात घेऊन मुली, महिला, रस्त्यात उतरल्या असे दृश्य दिसले. खरेतर ज्या इस्लामचे नाव घेतले जाते त्याची शिकवण 'इकरा' व 'इल्म' या दोन शब्दांपासून सुरू होते. इकरा म्हणजे वाचन आणि इल्म म्हणजे ज्ञान, शिक्षण. मो. पैगबरांनी वाचन करण्याचा, भरपूर ज्ञान, शिक्षण मिळवण्याचा उपदेश केला आहे. सावित्रीबाई फुलेंसोबत ज्ञानदानाचे कार्य केलेल्या फातिमा (पहिल्या मुस्लिम शिक्षिका) यांचा फोटो उपलब्ध आहे; त्यात त्यांनी बुरखा घातलेला नाही. ज्ञान मिळवण्यासाठी परदेशात चीनपर्यंत जावे लागले तरी नक्की जाऊन इल्म, शिक्षण घ्या, असे सांगितले असताना हिजाबचा ज्ञानाशी, शिक्षणाशी संबंध जोडणे म्हणजे आज मानवी विकासाच्या प्रवाहात उलट्या दिशेने, अधोगतीकडे प्रवास करणे आहे."

आपला भारतीय समाज विविधतेने नटलेला आहे. धर्म, जाती, वंश, प्रांत, लिंग यांच्या निरपेक्ष आपापली संस्कृती प्रत्येक जण जपत असला तरी या विविधतेतही एकतेचं दर्शन घडतं. म्हणूनच जगात भारताचे हे वेगळेपण आहे, यात वादच नाही. विविध संस्कृतीतील खानपान, चालीरीती, उत्सव, पूजा-अर्चा व प्रार्थना, कला, करमणूक, पेहराव इत्यादीत ही विविधता दिसून येते. या विविधतेचा आधार कधी धर्म, जाती, प्रदेश तर कधी काळ, ऋतुमानसुद्धा असतो. आपापल्या आवडीनिवडी आणि परंपरांनुसार भारतातील अनेक लोकसमूह आपापल्या विशिष्ट सांस्कृतिक विविधतेची जपणूक करीत आलेले आहेत आणि आता तर राज्यघटनेनेच तसा अधिकार दिला आहे.

पेहरावाच्या बाबतीतसुद्धा ही विविधता दिसून येते. पगडी म्हटले की, शीख बांधव, लुंगी म्हटले की दक्षिण भारतीय बांधव, नऊ वारी साडी नेसणाऱ्या महाराष्ट्रीय भगिनी, साडीचा पदर मागून पुढे घेणाऱ्या मारवाडी किंवा गुजराती भगिनी, काठेवाडी आणि राजस्थानी स्त्रियांचे पेहराव, पंजाबी भगिनींचा ड्रेस आपल्या डोळ्यांसमोर येतात. त्याचप्रमाणे हिजाब, बुरखा म्हटले की, मुस्लीम भगिनी डोळ्यांसमोर येतात. परंतु धर्म, जाती, प्रांतानुसार हिजाबसारख्याच वेगवेगळ्या पद्धती आहेत. घुंगट, पडदा, नकाब, पदर, हिजाब, बुरखा, अल अमिरा, शायला, खिमार, चादोर इ. वेगवेगळ्या धर्मात व जातीत आढळून येतात. सर्वांचे मूळ मात्र पुरुषप्रधानतेत, पुरुषी मानसिकतेत, पुरुषी वर्चस्वाच्या संस्कृतीत आपल्याला आढळून येते.

सध्या कर्नाटक राज्य हिजाब प्रकरणामुळे गाजत आहे. वस्तुस्थिती अशी आहे की, कुराणमध्ये 'हिजाब' हा जो शब्द वापरलेला आहे त्याचा अर्थ फक्त 'डोकं झाकणं' आणि त्यासाठी 'डिसेंट कपडे वापरणं' (साजेसे, योग्य) या अर्थाने वापरलेला आहे. १४०० वर्षापूर्वी मो. पैगंबर यांच्या पत्नी आयशा यांच्याशी काही पुरुष असभ्य वर्तन करीत; म्हणून त्यावेळच्या परिस्थितीत पत्नीने पडद्याआडून बोलावे असे त्यांनी सुचविले. अर्थातच व्यक्ती व कालसापेक्ष अशी त्यांची ही सूचना होती; त्यामुळे सर्वांनाच लागू नव्हती. शिवाय अरब देशात तापमान जास्त, वालुकामय प्रदेश यामुळे डोके झाकावे, डोळ्यांत व नाका-कानात वाळू जाऊ नये यासाठी संरक्षण म्हणून पडदा पद्धती असावी. म्हणूनच अरब पुरुषदेखील संपूर्ण शरीर झाकले जाईल, असा पेहराव करीत असतात. म्हणून हिजाब पद्धत उदयास आली जी की, कालसुसंगत होती.

स्त्रियांसाठी बुरखा हा प्रकार मात्र इस्लाम धर्मातून आलेला नाही तर वेगवेगळ्या प्रदेशातील इस्लामिक संस्कृतीमधून आलेला आहे. स्त्री ही आपल्या मालकीची वस्तू असल्याची भावना पुरुषांच्या मनात घट्ट होत गेली. अशा पुरुषप्रधान मानसिकतेतून बुरखा नंतर आलेला आहे. मो. पैगंबरांनी जसा स्त्रियांच्या पेहरावात हिजाबचा केवळ संकेत सांगितला तसा 'नजरों का हिजाब' तर पुरुषांनाही सांगितला आहे. म्हणजे इतर स्त्रियांशी बोलताना नजरेला नजर न भिडू देता, खाली नजर ठेवून बोलावे, असे सुचवले आहे आणि थोड्याफार फरकाने असेच संकेत सर्व धर्मात आढळतात. पण या सभ्यतेने पुरुष वागतात का?

देशकालानुसार धर्मपंथांनी निर्देशिलेल्या सत्य, अहिंसा, अस्तेय, बंधुता, सहिष्णुता, परस्परांचे स्वातंत्र्य अशा जीवनमूल्यांवर आधारित संस्कृती विविध लोकसमूहांमध्ये विकसित होत गेल्या. संस्कृती ही कायम प्रवाहित राहाणारी

बाब आहे. अर्थातच काळानुसार खानपान, चालीरीती, उत्सव, पेहराव यात बदल होत गेलेले आपल्याला दिसून येतात. उत्तरेतील पंजाबी सामोसा तसेच दक्षिणेतील इडली डोसा, पूर्वेतील मोमो इत्यादी खाद्यपदार्थ मध्यभारतात पोहोचले. महाराष्ट्रातील पुरणपोळी सातासमुद्रापार गेली आहे. त्याचप्रमाणे पेहरावाच्या बाबतीत जाड्याभरड्या सुती धोतर व सदऱ्याच्या जागी पँट – शर्ट, सूट–टाय आले. यांत्रिकीकरणानंतर सुती कपड्यांची जागा कृत्रिम धाग्यांनी बनलेल्या कपड्यांनी घेतली; आता तेच बहुतेक सर्वच जण घालतात. उत्तरेतील पंजाबी ड्रेस अगदी दक्षिण भारतात पोहोचला. अशाप्रकारे विविध संस्कृतींचे प्रवाह वाहात राहाण्याबरोबरच त्यांचे अभिसरणदेखील होते.

अशा सांस्कृतिक अभिसरणासाठी कोणीही विशेष प्रयत्न करीत नसून ती मानवी समाजाच्या विकासातील एक नैसर्गिक प्रक्रिया आहे. पेहरावाच्या बाबतीत तर कोणीही यासाठी सक्ती करीत नाही; सक्ती करणे अजिबात योग्य नाही. तरीही व्यवहारात अनेक ठिकाणी त्यासाठी बंधने आणि संकेत असतात. सैन्यातील सैनिक, पोलीस, चौकीदार, पायलट, नर्स हे सर्व आपापल्या व्यवसायाच्या ठिकाणी काम करणारे पुरुष असोत अथवा स्त्रिया यांनी त्यांच्या पारंपारिक वेशात वावरलेले कसे बरे चालतील? त्यांच्या त्या त्या संस्था, खाजगी असोत की सार्वजनिक, त्यांनी काही ड्रेस कोड ठरविलेला असतो तोच त्यांच्या कर्मचाऱ्यांना परिधान करावा लागतो. त्या त्या संस्था आपले ड्रेस कोडबाबतचे नियम शिस्तीने व चोखंदळपणे अंमलात आणीतच असतात. त्यासाठी कोणी बाहेरील व्यक्ती अथवा संघटनांनी सूचना किंवा दबाव आणण्याची किंवा त्या संस्थांच्या कामकाजात ढवळाढवळ करण्याची गरजच नसते. अशी ढवळाढवळ करण्याच्या प्रयत्नांनी सामाजिक स्वास्थ्य, शांतता मात्र बिघडते.

समाजात पाहिले तर पेहरावाचे केवळ संकेत असतात आणि ते सुद्धा बदलत असतात, प्रवाही असतात. विलायतेत शिकत असताना महात्मा गांधी साहेबासारखा पेहराव करण्यासाठी आटोकाट प्रयत्न करायचे. परंतु तेच गांधी आफ्रिकेतील न्यायालयात वकील म्हणून उभे राहिले ते पारंपारिक भारतीय काठेवाडी पेहरावात. तेव्हा त्यांना न्यायाधीशांनी काठेवाडी पागोटे काढून टाकण्यासाठी आज्ञा केली. गांधीजींनी त्या आज्ञेचे पालन करण्यास स्पष्ट नकार दिला. परंतु त्याच गांधीजींनी नंतर अर्धे धोतर आणि पंचा असा पेहराव आयुष्याच्या अखेरपर्यंत केला. सभा, संमेलने, समारंभ यात पेहरावाचे संकेत सहजच मोडले जातात. लग्नात अगदी लहान मुलीसुद्धा साडी नेसतात. १९ व्या शतकाच्या शेवटी हंटर कमिशनपुढे साक्ष देण्यासाठी महात्मा फुले गेले तेव्हा ते शेतकऱ्याच्या वेशात गेले होते.

पेहरावाबाबत काही समूह जरा कट्टर असतात हे खरे आहे. तरीही परिस्थितीचा मोठा रेटा त्यांना बदलण्यास भाग पाडत असतो. एके काळी वयात आलेल्या आपल्या मुलींनी साडीच नेसावी अशी त्यांच्या हिंदू पालकांची सक्ती असायची. मात्र अलीकडे कॉलेजमध्ये जाणाऱ्या मुलींनी जीन पँट घालणे साधारण गोष्ट झाली आहे. काही मुस्लीम पालकसुद्धा याबाबतीत बदलत असले तरी काही अधिकच कट्टर असतात. सुन्नी समाजात काळा बुरखा वापरला जातो तर शिया आणि बोहरी समाजात वेगवेगळ्या रंगाचे बुरखे वापरतात. सुन्नीमधील हनबली पंथाने तर तोंड झाकलं पाहिजे म्हणून फतवाच काढला होता. म्हणजे हिजाबचा मूळ उद्देश बाजूलाच राहिला आणि आता त्याचे स्वरूप बदललेले दिसून येते. पूर्वी मुलगी वयात आली, किंवा लग्न ठरले किंवा लग्न झाल्यानंतर सासरी बुरखा घालावा लागायचा. पण आजची परिस्थिती वेगळीच दिसून येते. अगदी दोन वर्षांपासूनच्या मुलींनासुद्धा मखनी– मिनी बुरखा–घातला जातो. म्हणजे हाफ बुरखाच म्हणूया. बुरख्याचे, हिजाबचे स्वरूप बदलले दिसून येते. फक्त दोन डोळे उघडे नव्हे तर ते पण जाळीने झाकलेले. खरेतर कुराणमध्ये हिजाब किंवा बुरख्याची सक्ती नाही; कसे राहावे याचे केवळ संकेत आहेत. गैरमर्द, परपुरुषाची नजर आपल्या स्त्रीवर पडू नये हीच बुरख्यामागील पुरुषी मानसिकता आहे. ही सर्व गोंडस नावे देण्यामागील हेतू स्त्रीला पुरुषी धाकात व वर्चस्वाखाली ठेवणे हाच होतो.

कर्नाटकातील घटनेने 'हिजाब' हा मुद्दा आणखीच अधोरेखित झाला. त्यात 'पहले हिजाब–फिर किताब, हिजाब मेरी शान है, हिजाब मेरी पहचान है।' असे फलक हातात घेऊन मुली, महिला, रस्त्यात उतरल्या असे दृश्य दिसले. खरेतर ज्या इस्लामचे नाव घेतले जाते त्याची शिकवण 'इकरा' व 'इल्म' या दोन शब्दांपासून सुरू होते. इकरा म्हणजे वाचन आणि इल्म म्हणजे ज्ञान, शिक्षण. मो. पैगबरांनी वाचन करण्याचा, भरपूर ज्ञान, शिक्षण मिळवण्याचा उपदेश केला आहे. सावित्रीबाई फुलेंसोबत ज्ञानदानाचे कार्य केलेल्या फातिमा (पहिल्या मुस्लिम शिक्षिका) यांचा फोटो उपलब्ध आहे; त्यात त्यांनी बुरखा घातलेला नाही. ज्ञान मिळवण्यासाठी परदेशात चीनपर्यंत जावे लागले तरी नक्की जाऊन इल्म, शिक्षण घ्या, असे सांगितले असताना हिजाबचा ज्ञानाशी, शिक्षणाशी संबंध जोडणे म्हणजे आज मानवी विकासाच्या प्रवाहात उलट्या दिशेने, अधोगतीकडे प्रवास करणे आहे.

मो. पैगंबरांना स्वतःचे मूल नव्हते. त्यांनी दत्तक घेतलेल्या भाचीचे लग्न ज्याच्याशी लावून दिले तो तिचा पती हा गव्हर्नर होता. लग्नानंतर तिच्या नवऱ्याने तिला चेहरा पडदा करण्यास सांगितले तेव्हा तिने दिलेले उत्तर संपूर्ण मुस्लिम समाजाला अंतर्मुख करावयास लावणारे आहे. ती म्हणते, 'पर्दा और मैं?

खुदाने मुझे खूबसूरत बनाया है, मैं चाहती हूँ की, लोग मुझे देखें और मेरी खुबसूरती में अल्लाह की शान का अहसास करें और उस अहसास का शुक्रिया अदा करें ।' मो. पैगंबराच्या पहिल्या पिढीनेच अशा प्रकारे पडदा पद्धतीला ठामपणे नकार दिला आहे, असे इस्लामशी संबंधित सर्वच ग्रंथात, पुस्तकात आढळते; पण ते जाणीवपूर्वक लपवले जाते. आज ८५ टक्के महिला बुरखाविना राहातात. सहा मुस्लिमबहुल देशांनी हिजाबपद्धती नाकारली आहे. हिजाब, बुरखा हे मुस्लीम स्त्रियांवर लादलेल्या गुलामीचे प्रतीक आहे. या लादलेल्या गुलामीची जाणीव न झाल्यानेच आज मुस्लिम महिलाच बुरख्याचे, हिजाबचे समर्थन करताना दिसतात.

वेगवेगळ्या लोकसमूहांवर लादलेली गुलामी दूर करण्यासाठी प्रयत्न करणाऱ्या संत व समाजसुधारकांची तुलनेने खूप मोठी परंपरा हिंदू समाजाला लाभलेली आहे. परंतु मुस्लिम समाजात समाजसुधारकांची, संख्या फारच नगण्य आहे. हमीद दलवाई यांनी स्थापलेले मुस्लिम सत्यशोधक मंडळ, अंधश्रद्धा निर्मूलन चळवळ यातील काही कार्यकर्ते मुस्लिम समाजातील समाजसुधारकाची भूमिका बजावत आहेत. जुनाट, कालबाह्य परंपरा, प्रथा यांना आजही मुस्लिम समाज चिकटलेला आहे. 'एका पिढीचे पाखंड पुढील पिढ्यांची परंपरा बनते'; हेलन केलर यांच्या या विधानाची येथे आठवण होते.

पेहरावाच्या बाबतीत प्रथम विचार आरोग्याचा झाला पाहिजे. शरीराच्या सामान्य हालचाली मुक्तपणे झाल्या पाहिजेत. शरीराला डी-जीवनसत्वाची गरज असते आणि ते केवळ सूर्यप्रकाशातच त्वचेच्या खाली निर्माण होते. सर्वच धर्मातील बहुतेक स्त्रियांचा अधिक वेळ घरातच जातो. त्यातही घराबाहेर पडल्यावर जर संपूर्ण शरीर झाकून घेतले तर सूर्यप्रकाशात न मिळाल्याने डी-जीवनसत्वाची कमतरता होते.

विविध धर्मपंथांनी खानपान, पेहराव, कला, उत्सव, चालीरीती इत्यादींच्या स्वातंत्र्याबरोबरच सत्य, अहिंसा, समता, बंधुता, न्याय, परस्परांच्या स्वातंत्र्याचा आदर अशी जी जीवनमूल्ये वेळोवेळी दिलीत तीच भारतीय राज्यघटनेने स्वीकारली आहेत. ही मूल्ये इतरांवर सक्तीने लादण्याची नसून प्रत्येकाने ती स्वतः जपण्यासाठी आहेत. थोडक्यात, महात्मा गांधींचा "Be the change you want to see in the world" हा संदेश प्रत्यक्षात आचरणात आणण्यासाठी ही मूल्ये आहेत.

(लेखिका : मअंनिसच्या महिला विभागाच्या राज्य कार्यवाह आहेत.)

●


**जाहीर प्रकटन**

**अंधश्रध्दा निर्मूलन पत्रिका**

स्वामित्व व अन्य विषयासंबंधी विवरण, फॉर्म ३, नियम ८ अन्वये

| | |
|---|---|
| प्रकाशन स्थळ | : महात्मा फुले कॉलनी, इस्लामपूर, जि. सांगली ४१५४०९ |
| प्रकाशन अवधी | : मासिक (दर महिन्याच्या १ तारखेस) |
| प्रकाशकाचे नाव | : संजय बापूराव बनसोडे |
| नागरिकत्व | : भारतीय |
| पत्ता | : महात्मा फुले कॉलनी, इस्लामपूर, जि. सांगली ४१५४०९ |
| संपादकाचे नाव | : नितीन शिवाजीराव शिंदे |
| नागरिकत्व | : भारतीय |
| पत्ता | : 'कल्पतरू' कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजसमोर,भोसले कॉलनी, इस्लामपूर, जि. सांगली ४१५४०९ |
| मुद्रकाचे नाव | : निहाल सुरेश शिपूरकर |
| नागरिकत्व | : भारतीय |
| पत्ता | : भारती मुद्रणालय,८३२, ई वॉर्ड, शाहूपुरी ४ थी गल्ली, कोल्हापूर-४१६००१ |
| मुद्रकाचे स्थळ | : भारती मुद्रणालय |
| पत्ता | : भारती मुद्रणालय,८३२, ई वॉर्ड, शाहूपुरी ४ थी गल्ली, कोल्हापूर-४१६००१ |
| स्वामित्व | : महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीची विवेक जागर संस्था |
| पत्ता | : 'भास्कर' ६८, कालिका देवी नगर, संघमा चौक, धुळे ४२४ ००१ |

मी संजय बापूराव बनसोडे घोषीत करतो की, माझ्या जास्तीत जास्त माहिती व विश्वासाला अनुसरून वर दिलेले विवरण खरे आहे.

सही

दिनांक : १ एप्रिल २०२२

स्थळ : इस्लामपूर.

**संजय बापूराव बनसोडे**

प्रकाशक



# तर्क गमावलेली 'झुंड'

बुवाबाजी

विनायक सावळे
९४०३२५९२२६

"प्रश्न विचारण्याची, शंका घेण्याची, तर्क करण्याची, उत्तर शोधण्याची वृत्ती ज्यावेळेस समाज गमावतो त्यावेळेस अशा पद्धतीच्या चमत्कारांना उधाण येतं आणि चमत्कारांच्या मागे धावणारी 'झुंड' तयार होते. ज्या शिक्षण व्यवस्थेतून वैज्ञानिक दृष्टिकोन विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचायला हवा होता आणि समाजामध्ये त्याचं प्रतिबिंब पडायला हवं होतं ते आज पडतांना दिसत नाही. अशा वेळी इथल्या शिक्षण व्यवस्थेलाच आत्मचिंतन करण्याची गरज आहे. विज्ञान शिकलेला विद्यार्थी जेव्हा नंदीला दूध पाजण्यासाठी मंदिरात जातो त्यावेळेस त्याने तर्कवादी वैज्ञानिक दृष्टिकोन हरवलेला असतो. विवेकाचा नंदादीप त्यानेच विझवलेला असतो."

गेले तेहतीस वर्षे अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे कार्यकर्ते चमत्कार सादरीकरणातून प्रबोधनाचे काम करीत आहेत. त्यात एक वाक्य हमखास सांगितले जाते, ज्या वाक्याला भरपूर टाळ्या देखील पडतात. ते वाक्य आहे, 'चमत्कार करणारे बदमाश असतात, त्यावर विश्वास ठेवणारे मूर्ख असतात आणि जे चमत्काराला विरोध करीत नाहीत ते भ्याड असतात.' अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीचे पितामह डॉ. अब्राहम कोउर यांच्या या वाक्याला श्रोत्यांचा चांगलाच प्रतिसाद मिळतो. गेली अनेक वर्षे महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात हे वाक्य अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या कार्यकर्त्यांनी पोहोचवले आहे. तरीही सत्तावीस वर्षांपूर्वी गणपती दूध पिण्याचा चमत्कार भारतभर घडला आणि नुकताच महादेवाच्या मंदिरातील नंदीने अचानकपणे दूध आणि पाणी पिण्याचा चमत्कारही महाराष्ट्रासह गुजरात, मध्यप्रदेश आदी राज्यात घडला. समाज माध्यमातून वाऱ्याच्या वेगापेक्षा अधिक वेगात ही बातमी देशभर पसरली आणि अगदी आदिवासी पाड्यांपर्यंत मोठी 'झुंड' आपली बुद्धी, चिकित्सकवृत्ती, शंका घेण्याची आणि प्रश्न विचारण्याची क्षमता या सगळ्यांना तिलांजली देत मंदिरात गर्दी करत नंदीला दूध पाजत राहिली.

दरम्यान दोन ठिकाणी झुंडीचा अनुभव आपल्या समाजाने घेतला आहे. एका बाजूला बहुप्रतिक्षित आणि बहुचर्चित सुप्रसिद्ध दिग्दर्शक नागराज मंजुळे यांचा 'झुंड' चित्रपट प्रदर्शित झाला. त्याला पाहण्यासाठी तोबा गर्दी. दुसऱ्या बाजूला दुसरी झुंड नंदीला पाणी किंवा दूध पाजण्यासाठी मंदिरांमध्ये रांगा लावलेली समाजमाध्यमांमध्ये बघायला मिळाली. यामध्ये उच्चशिक्षित आणि विज्ञानाचे उच्चशिक्षण घेतलेल्या महिलांपासून ते तरुणांचाही सहभाग दिसून आलेला आहे. एक निर्जीव मूर्ती नंदी, कासव किंवा अन्य मूर्ती असो ती पाणी खेचते. म्हणजे ती पाणी किंवा दूध पिते असा तर्क लावणे आणि चमत्कार घडल्याचा दावा करणे, हे अनाकलनीय आहे. प्रसारमाध्यमे देखील चमत्कार घडल्याचा अनुभव भक्तांना येत असल्याचे दाखवत दुसरी बाजू न मांडता अशा उन्मादी प्रकाराला खतपाणी घालताना आढळून आली. याचा संसर्ग सगळीकडे झाल्यामुळे मंदिरांमध्ये प्रचंड गर्दी उसळली होती. ही अंधश्रद्धेची भयानकता आपण सगळ्यांनीच अनुभवली आहे. एकालाही यामागे काहीतरी शास्त्रीय कारण असेल, असं न वाटणे हे तर्काने विचार करण्याची क्षमता गमावलेल्या झुंडीचे लक्षण आहे.

२१ सप्टेंबर, १९९५ रोजी ज्यावेळी गणपतीची मूर्ती अशाच पद्धतीने दूध प्यायला लागली, त्याच वेळेस विज्ञानातील 'सरफेस टेन्शन' किंवा 'पृष्टीय ताण' या तत्त्वातून घडणाऱ्या 'कॅपिलरी ॲक्शन' किंवा 'केशाकर्षण' प्रक्रियेतून हे घडते असे स्पष्टीकरण माध्यमांमध्ये शहीद डॉ. नरेंद्र दाभोळकर यांनी केले होते. याचा विसर माध्यमांसह सगळ्यांनाच कसा पडला, हेही एक कोडेच आहे. आधीच जाहीर झालेलं वैज्ञानिक तत्व समाज माध्यमांना आणि समाजाला कळू नये हे अनाकलनीय आणि दुःखद आहे.

शिक्षणाच्या गाभा घटकात समाविष्ट असलेले वैज्ञानिक दृष्टिकोन मूल्य, संयुक्त राष्ट्र संघाने घोषित केलेल्या जीवन कौशल्यात तर्कसंगत विचार करण्याच्या क्षमता वृद्धिंगत करण्याचा केलेला आग्रह आणि सर्वात शेवटी देशाच्या संविधानात कर्तव्य म्हणून सांगितलेला वैज्ञानिक दृष्टिकोन, या सगळ्या अपेक्षित मूल्यांना एकाच वेळी इतक्या व्यापक पद्धतीने फाटा देणारा समाज स्वतःच आपल्या विकासाची नाचक्की करीत असतो, हे यानिमित्ताने प्रकर्षाने जाणवले.

बुद्धीला न उलगडणारे, मती कुंठीत करणारे आणि

कार्यकारण भावाच्या पलीकडे जाणारे अद्भुत असे काही चमत्कार आहेत आणि ते घडवणारी दैवीशक्ती आहे, हा आदिम काळापासून समाजमान्य असलेला समाज आहे. मानवाच्या उत्क्रांतीच्या काळात निसर्गात घडणारे वणवे, महापूर, विजांचा कडकडाट, ढगांचा गडगडाट, वादळे, सूर्यग्रहण, चंद्रग्रहण याचे शास्त्रीय ज्ञान मानवाला नव्हते. त्याकाळी मानवाने त्याच्या कल्पनाविश्वाच्या आधारे काही संकल्पना रुजवल्या. पूजाविधी, कर्मकांडे तयार केली. त्यात दगडांमध्ये देखील प्राण असतो, इच्छा-आकांक्षा असतात अशी कल्पना त्याला सुचली. त्याला 'जड प्राणतत्त्ववाद' असे म्हणतात. पण ज्यावेळेस आधुनिक विज्ञानाची प्रगती झाली, निसर्गातील घटनांचा कार्यकारणभाव समजला त्यावेळी उत्क्रांतीच्या काळातील हे समज गळून पडायला हवे होते. पण एकविसाव्या शतकात, विज्ञान-तंत्रज्ञानाच्या युगातही माणसाने असे समज कवटाळून ठेवलेले आहेत, याचं ताजं उदाहरण म्हणजे नंदीला दूध आणि पाणी पाजण्याचा तथाकथित चमत्कार.



विज्ञानाची सृष्टी उपभोगणाऱ्या आणि महाशक्ती होण्याचे स्वप्न पाहणाऱ्या आपल्या देशामध्ये विज्ञानाच्या दृष्टीचा मात्र अभाव आहे. हे सारे चिंताजनक आहे. याचं स्पष्टीकरण देण्यासाठी अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीच्या कार्यकर्त्यांना पुढे यावे लागणं हे देखील अनाकलनीय आहे. अनेक वैज्ञानिक, विज्ञानाच्या शिक्षण संस्था, प्रशासन आणि इथली राजकीय व्यवस्था यापैकी कोणालाही याचं वास्तव समाजापुढे मांडाव आणि एकाच वेळेस चमत्काराच्या नावाने तयार झालेलं उन्मादी वातावरण निवळावं याची आवश्यकता वाटली नाही. महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या कार्यकर्त्यांनी आपल्या क्षमतेप्रमाणे ठीकठिकाणी यामागील शास्त्रीय स्पष्टीकरण देण्याचा प्रयत्न केला. त्याला माध्यमाने उचित प्रसिद्धी देखील दिली. पण यातून काय लक्षात आलं? कितीही वैज्ञानिक प्रगती समाजाची होऊ दे, प्रश्न विचारण्याची, शंका घेण्याची, तर्क करण्याची, उत्तर शोधण्याची वृत्ती ज्यावेळेस समाज गमावतो त्यावेळेस अशा पद्धतीच्या चमत्कारांना उधाण येतं आणि चमत्कारांच्या मागे धावणारी 'झुंड' तयार होते. ज्या शिक्षण व्यवस्थेतून वैज्ञानिक दृष्टिकोन विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचायला हवा होता आणि समाजामध्ये त्याचं प्रतिबिंब पडायला हवं होतं ते आज पडतांना दिसत नाही. अशा वेळी इथल्या शिक्षण व्यवस्थेलाच आत्मचिंतन करण्याची गरज आहे. विज्ञान शिकलेला विद्यार्थी जेव्हा नंदीला दूध पाजण्यासाठी मंदिरात जातो त्यावेळेस त्याने तर्कवादी वैज्ञानिक दृष्टिकोन हरवलेला असतो. विवेकाचा नंदादीप त्यानेच विझवलेला असतो. विज्ञानाचे शिक्षण केवळ परीक्षेतील गुणांसाठी होतं. जीवनाची दृष्टी येण्यासाठी आणि जीवनाची धारणा तयार होण्यासाठी वैज्ञानिक दृष्टिकोन पोहोचवण्यात येथील शिक्षणव्यवस्था कमी पडली आहे. भविष्यात अशा विवेक गमावलेल्या झुंडी तयार व्हायला नको असतील, तर समाजातील सर्वच घटकांनी आत्मचिंतन करण्याची गरज आहे. त्याचप्रमाणे समाज माध्यमांचा वापर करून अशी बातमी पसरवण्याचा कट कोणीतरी रचत असावा. याद्वारे धार्मिक ध्रुवीकरण करणे, धार्मिक उन्मादी वातावरण तयार करणे, लोकांच्या तर्कबुद्धीला विराम देण्याचा प्रयत्न करणे आणि त्यातून स्वतःची राजकीय पोळी भाजून घेणे असा जर कोणाचा छुपा अजेंडा असेल, तर याचा देखील समाजाने विचार करण्याची गरज आहे. असं जर होत असेल, तर समाजाच्या श्रद्धांचा फायदा घेऊन स्वतःचे छुपे हेतू साध्य करण्याचा या प्रयत्नांना समाजाने भीक घालता कामा नये. यासाठीदेखील सर्वांनीच सजग राहण्याची गरज आहे.

संत आणि समाजसुधारकांनी अशा सर्व प्रकारच्या चमत्कारांना विरोध केलेला आहे. चमत्कार माणसाची बुद्धी दुबळी, पांगळी आणि आंधळी करतात. माणसाचा विवेक नाहीसा करतात. चमत्कार करणाऱ्या तथाकथित शक्तीच्या हाती स्वतःला सोपवून तो मोकळा होतो. माणसाचे बुद्धिवैभव, निर्णयशक्ती, विवेकी विचारांची क्षमता ही सर्वाधिक महत्त्वाची बाब चमत्काराच्या पुढे भांडण करते. मानसिक गुलामगिरी अधिक धोकादायक आहे. चमत्कारांना सत्य मानणे, ही त्याची सुरुवात असते. परिवर्तनाची लढाई मग अवघड बनते. अंधश्रद्धा निर्मूलनाचे कार्य हेच यावरचे समर्पक उत्तर आहे. आगामी काळात मूर्तीने दूध पिल्याची अफवा पसरणार नाही आणि कोणी अशा चमत्काराचा आभास निर्माण केलाच, तर त्याला समाज सडेतोड उत्तर देईल अशा निर्भय चिकित्सक समाजाच्या दिशेने आपण वाटचाल करूया.

(लेखक महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे राज्य सरचिटणीस आहेत.)

●



# चक्रधरस्वामींचा स्त्रीविषयक दृष्टिकोन

प्रा. कोमल कुंदप
७७९८७७२५५५

“महानुभाव संप्रदायाचा मूळ दृष्टिकोन वर्णजातलिंगभेद विरहित होता. सर्व सामान्य समाज विचारप्रवण आणि सुखी व्हावा, हेच महानुभाव पंथ स्थापनेचे प्रयोजन होते. महानुभाव पंथाचे प्रवर्तक श्रीचक्रधरस्वामी यांचा चरित्रग्रंथ असणाऱ्या ‘लीळाचरित्रा’तील अनेक लीळांमधून श्रीचक्रधरांचा दृष्टिकोन स्पष्ट होतो. त्यांनी समाजातील अंधश्रद्धा, कर्मकांड, वर्णव्यवस्था, स्पृश्य-अस्पृश्य संकल्पना यांसारख्या बुरसटलेल्या विचारांविषयी योग्य शब्दांत आणि नेमके मार्गदर्शन केले आहे. याची प्रचिती आपल्याला ‘लीळाचरित्र’ वाचताना येते.”

महाराष्ट्रात विविध धर्मपंथांचा उदय प्रत्यक्षात अकराव्या शतकाच्यानंतर दिसतो. त्याची बीजे काही काळ अगोदरच तत्कालीन सामाजिक व धार्मिक विषमतेविरुद्धच्या बंडखोरीतून निर्माण झाली. त्यातून नाथ, महानुभाव, वारकरी हे पंथ यथावकाश उदयाला आले. हे संप्रदाय बाह्यतः भिन्न दिसत असले, तरी त्यांच्या मूळ प्रेरणात एक प्रकारची सुसंवादीताच दिसून येते. बहुजन सामाजाच्या जागृतीतून त्यांची आध्यात्मिक व नैतिक उन्नती हा पायाभूत विचार सर्वच पंथाच्या आद्यप्रेरणेत होता आणि म्हणून देशी भाषेच्या साहाय्याने आपल्या धर्मतत्त्वांचा प्रसार करणे, हे कार्य या काळात आधारभूत होते.

महानुभाव पंथाचा उदय बाराव्या शतकामध्ये झाला. तत्कालीन यादवकाळात महाराष्ट्रात समाजाचे अध:पतन झपाट्याने होत होते. कष्टकरी, सर्वहारा समाजाचे उद्धारक म्हणून कुणीही नव्हते. हा सर्वसामान्य समाज अवनतीकडे जात होता. श्रीचक्रधरस्वामींच्या समोर जो समाज होता तेथे मानवत्वाची होळी झाली होती. मनुष्यत्व पोरके झाले होते. कर्मविपाकादी सिद्धांत आर्थिक शोषणाचे हत्यार म्हणून उपयोगात आणले जात होते. समाज वर्णव्यवस्था, कर्मकांड व अंधश्रद्धा याखाली भरडला जात होता. त्यामुळे बहुजन समाजाची उन्नतीची सीमा अवरुद्ध झाली होती. सर्व धर्मग्रंथ संस्कृत भाषेत बंदिस्त होते. वादविवाद, शास्त्रचर्चा संस्कृतमधून होत असल्यामुळे सामान्य लोकांना ज्ञानापासून वंचित राहावे लागत असे. पुराणांमधून सामान्यजनांना तत्त्वज्ञान मिळत नसे; परंतु त्यांच्या संभ्रमात भर मात्र निश्चितच पडत असे. सामान्य जनता व्रतवैकल्ये, कर्मकांड, अनेक क्षुद्र देवी-देवतांची उपासना आदी गोष्टी करण्यात गुंग होती. यादवकाळात सनातन्यांचे प्राबल्य वाढल्यामुळे बहुजन समाजाचा कुणी द्रष्टा किंवा मार्गदर्शक नव्हता. तेव्हा श्रीचक्रधरांनी आपल्या कृती-उक्तीने भरकटलेल्या समाजास मार्गदर्शन केले. त्यासाठी महानुभाव संप्रदायाने आपले तत्त्वज्ञान मराठीतून विशद केले.

महानुभाव संप्रदायाचा मूळ दृष्टिकोन वर्णजातलिंगभेद विरहित होता. सर्व सामान्य समाज विचारप्रवण आणि सुखी व्हावा, हेच महानुभाव पंथ स्थापनेचे प्रयोजन होते. महानुभाव पंथाचे प्रवर्तक श्रीचक्रधरस्वामी यांचा चरित्रग्रंथ असणाऱ्या ‘लीळाचरित्रा’तील अनेक लीळांमधून श्रीचक्रधरांचा दृष्टिकोन स्पष्ट होतो. त्यांनी समाजातील अंधश्रद्धा, कर्मकांड, वर्णव्यवस्था, स्पृश्य-अस्पृश्य संकल्पना यांसारख्या बुरसटलेल्या विचारांविषयी योग्य शब्दांत आणि नेमके मार्गदर्शन केले आहे. याची प्रचिती आपल्याला ‘लीळाचरित्र’ वाचताना येते.

त्या काळात स्त्रियांना शूद्रांप्रमाणे वागणूक दिली जात होती. कर्म राहाटीत, नाहीतर धर्म राहाटीत तिला अडकवून ठेवणे, तिला बुरसटलेली वागणूक देणे, ही केवढी मोठी अंधश्रद्धा म्हणावी! स्त्रियांचा मासिक धर्म ही एक नैसर्गिक बाब आहे, असा आधुनिक विज्ञानवादी दृष्टिकोन चक्रधरांनी त्या काळात घेतला होता. ‘उमाईसा आंगुठा लावणे’ (लीळाचरित्र लीळा क्र.३८३ उत्तरार्ध - वि.भि.कोलते) या लीळेत तो आला आहे. एक दिवस उमाईसा नावाच्या शिष्येला मासिक धर्म झाला. आपण आता विटाळाचे झालो आणि आपल्यामुळे इतरांनाही विटाळ होईल, या सामाजिक रूढीमुळे ती पाळत बसली होती. तेव्हा श्रीचक्रधरस्वामी भोजनानंतर शतपावली करताना उमाईसाने त्यांना लांबूनच दंडवत घातला. त्यावेळी स्वामींनी तिच्या कपाळाला अंगुठा लावला आणि तिला म्हणाले, ‘‘आता हा अमुचा आंगुठा विटाळाची झाला. आता याला केदारी न्यावे की लोणारला न्यावे, म्हणजे याचा विटाळ जाईल?’’ स्वामींचे हे वक्तव्य ऐकून उमाईसा शरमली. तेव्हा स्वामींनी असे निरूपण केले की, प्रत्येक इंद्रियाचा धर्म आहे. जसे नाकाला शेंबूड, डोळ्याला चिपडे, कानात मळ तसा हा

सुद्धा एक इंद्रियाचा धर्म आहे. 'एक श्वेत नाडी, एक कृष्ण नाडी' म्हणजे अंगावरून पांढरे गेले, तर विटाळ नाही आणि रक्तस्राव झाला, तर विटाळ. मग या स्त्रावाचा विटाळ का मानावा? असा विशाल दृष्टिकोन असणारे श्रीचक्रधरस्वामी होते. नैसर्गिक सत्य हेच प्रमाण मानणारे होते. स्त्रियांनी अंधश्रद्धा न पाळता आपले जीवन निःसंकोच जगावे, असा उदात्त विचार येथे चक्रधरस्वामींचा दिसतो.

दुसऱ्या एका लीळेत स्त्रियांना ज्ञानाचा अधिकार आहे, असे स्पष्टपणे सांगणारे चक्रधर दिसतात. एकदा चक्रधरांचे अनुयायी असणाऱ्या सारंग पंडितांच्या मनात स्त्रियांच्याविषयी विकल्प येतो की, या काही ज्ञान घेण्यास योग्य आहेत का? यांचे जीवन म्हणजे 'चूल आणि मूल'! हा विचार जेव्हा श्रीचक्रधर स्वामींना समजतो, तेव्हा ते परखड शब्दांत कानउघडणी करतात की, 'याती अनु देव राखीत आणि तुम्हा काय अन्य देव राखितां?' हे सांगतानाच स्वामी सांगतात की, पुरुषांचा काय जीव आणि स्त्रीची काय जीवली? स्त्रियांना ज्ञानासाठी अपात्र समजणे, त्यांना ज्ञानापासून वंचित ठेवणे, त्यांना कर्मकांडात अडकवून ठेवणे, हीसुद्धा एक प्रकारची अंधश्रद्धा होय. हा केवढा मोठा उदात्त दृष्टिकोन समाजाला जागे करण्याचा आहे! या ठिकाणी त्यांनी जीव महत्त्वाचा मानला आहे. स्त्री आणि पुरुष ही निसर्गनिर्मित भिन्नलिंगी प्रजा आहे. त्यामुळे जेवढे महत्त्व पुरुष वर्गाला आहे, तेवढेच महत्त्व स्त्रियांना देखील आहे. स्वामी नेहमी सांगत, 'माणसाने माणसासी मनुष्य होवोनी असावे.'

एकदा मेहकर येथे बोणुबाईंना गोकुळाष्टमी साजरी करण्याची इच्छा झाली. तेव्हा त्या मातीचा कृष्ण, गोकुळ अशा गोष्टी तयार करू लागल्या. तेव्हा श्रीचक्रधरस्वामी तेथे गेले असता त्यांनी हे पाहिले आणि विचारले की, ''तुम्ही हे काय करता?'' तेव्हा त्यांनी आपण गोकुळाष्टमी साजरी करत असल्याचे सांगितले. तेव्हा स्वामी त्यांना सांगतात की, ''मातीचा देव करण्यापेक्षा तुम्ही माता यशोदा व्हा आणि आम्ही श्रीकृष्ण!'' अशा साध्यासोप्या पद्धतीने कोणतेही कर्मकांड न करता भक्ती करता येते, हे त्यांनी दाखवून दिले. भक्ती करताना त्याचा दिखावा करणे गरजेचे नसते, तर स्वानुभुतीची गरज असते, असा साधासोपा संदेश ते देतात.

पिंडदान करू नये, त्यापेक्षा अन्नदान हे श्रेष्ठदान आहे ते करावे. मनुष्य जन्म हा एकदाचा आहे. जात ही कर्मानुसार आली, असा विशाल दृष्टिकोन आपण ठेवला पाहिजे, असा मौलिक संदेश चक्रधरस्वामी आपल्याला देतात. ज्याकाळी समाज हा धर्मसूत्रे आणि कर्मकांडाने जरठ झाला होता, त्याकाळी त्यांनी साध्यासोप्या बोलीतून समाजाला नवे तत्त्वज्ञान सांगितले.

त्याकाळी स्त्रियांची त्यातल्या त्यात विधवांची अवस्था वाईट होती. एका ब्राह्मणाला पाच मुली होत्या आणि पाचही मुली विधवा होत्या. त्यामुळे त्याला 'पंचरांडा पिता' म्हणून गावकरी बोलवत. पण चक्रधरांनी त्याचा उल्लेख 'पंचगंगा पिता' असा केला.

अशा अनेक लीळांमधून आपल्याला दिसून येते की, कर्मठ समाजाला चक्रधरांनी खऱ्या अर्थाने आदर्श जीवनमार्ग दाखवला. स्वामींचे शिष्य नागदेवाचार्य हे स्त्रियांचा उल्लेख 'मानुसे' असा करतात. हा स्वामींच्या विचारांचा प्रभाव म्हणावा लागेल. सामान्य स्त्रियांना (म्हणजे वेश्यांना) सुद्धा स्वतःचा उद्धार करण्याचा अधिकार आहे, हे आपल्याला 'दृष्टांतपाठ' ग्रंथातील दाखल्यातून दिसून येते. स्त्रीशूद्रांशी समानतेने आणि सन्मानाने वागावे, असा वस्तुपाठ चक्रधरांनी अनेक प्रसंगातून घालून दिला आहे. त्यामुळे त्यांचे विचार हे समकाळाच्या पार्श्वभूमीवर अधिक मानवतावादी, समतावादी आणि प्रागतिक होते.

संदर्भग्रंथ

लीळाचरित्र – संपादक डॉ. वि. भि. कोलते

(लेखिका कराड येथे प्राध्यापक आहेत.)

●

## जादूटोणा प्रतिबंधात्मक कायद्यान्वये भोंदूगिरी करणाऱ्या महिलेला शिक्षा

देवी अंगात संचारते असे सांगत आर्थिक लुबाडणूक करणाऱ्या सौ. कल्पना प्रकाश आत्तरकर–सातारकर (वय ३५, रा. शिराळा, जि. सांगली) या महिलेला न्यायाधीश के.के. कुरंदळे यांनी सात महिने कारावास व पाच हजार रुपये दंडाची शिक्षा ठोठावली.

६ ऑक्टोबर २०१७ रोजी आष्टा पोलीस ठाण्यात दाखल केलेल्या गुन्ह्याचा निकाल पाच वर्षांनंतर १ फेब्रुवारी २०२२ रोजी लागला. सरकारी वकील भैरवी मोरे आणि पोलीस निरीक्षक मिलिंद पाटील यांनी गुन्हा सिद्ध होण्यासाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे राज्य प्रधान सचिव संजय बनसोडे, अवधूत कांबळे, अजय भालकर, प्रशांत पोतदार, भगवान रणदिवे यांनी या प्रकरणी पाठपुरावा केला होता.



# वैज्ञानिक मानसिकता: काळाची गरज

सुधीर फाकटकर
९४०३१८८१८९

> “आपल्या देशात मजेशीर विरोधाभास असा दिसतो की, एका बाजूला विज्ञान तंत्रज्ञानावर चौफेर टीका करणारे वंश, धर्म, पंथ, संप्रदाय विज्ञान तंत्रज्ञानाचा पुरेपूर वापर करताना दिसतात. अगदी सकाळी सकाळी धर्माचा प्रचार, प्रसार करण्यासाठी लाऊडस्पीकर वापरण्यापासून धार्मिक स्थळांच्या सुरक्षेसाठी वापरल्या जाणाऱ्या सीसीटीव्ही कॅमेरे इत्यादी साधनांपर्यंतची उदाहरणे दिसतील. हे खरे तर धर्मांनी विज्ञान तंत्रज्ञानावर दृढ विश्वास ठेवल्याचेच उदाहरण आहे. अशी उदाहरणे ठायीठायी आढळतील. मात्र या पार्श्वभूमीवर भारतात आजपर्यंत तरी कुणाही धर्म, पंथ, संप्रदायांच्या प्रमुखाने शास्त्रज्ञ, संशोधकांना आमंत्रित करून विज्ञान तंत्रज्ञानाविषयी जाणून घेतल्याचे ऐकिवात नाही.”

भारताचे संविधान अर्थात राज्यघटना हा आपल्या देशाचा सर्वोच्च तसेच पायाभूत ग्रंथ आहे. स्वातंत्र्यानंतर १९५० मध्ये राज्यघटना अंमलात आली. राज्यघटनेत देशाच्या एकूणच काराभारासंबंधी असलेल्या तरतुदी सुसूत्रपणे आणि एकत्रित नमूद केलेल्या आहेत. राज्यघटना २५ भागांची व १२ परिशिष्टांची आहे. यामध्ये तिसऱ्या भागात नागरिकांसाठी असलेले मूलभूत अधिकार सांगण्यात आले आहेत, तर चौथ्या भागात राज्यांसाठी मार्गदर्शक तत्त्वे तसेच नागरिकांसाठी असलेली कर्तव्ये समाविष्ट करण्यात आली आहेत. मूलभूत कर्तव्यांच्या अनुषंगाने राज्यघटनेत १९७६ साली ४२वी घटनादुरुस्ती होऊन वैज्ञानिक मानसिकता विकसित करण्यासंदर्भात आणखी एक खास कलम समाविष्ट करण्यात आले. त्यावेळी नेमलेल्या स्वर्णसिंग समितीने या दुरुस्ती संदर्भात शिफारशी केल्या होत्या. राज्यघटनेतील ५१-अ कलमाअंतर्गत एच किंवा आठवे कलम असे सांगते की, वैज्ञानिक मानसिकता विकसित करणे हे प्रत्येक भारतीयाचे मूलभूत कर्तव्य आहे. विस्ताराने हे कलम पुढीलप्रमाणे आहे. प्रत्येक भारतीयाची वैज्ञानिक मानसिकता, मानवता विकसित करणे आणि चिकित्सा व सुधारणा करण्यासंबंधी वातावरण निर्माण करणे, हे मूलभूत कर्तव्य आहे. उल्लेखनीय बाब म्हणजे राज्यघटनेत असे कलम समाविष्ट करणारे भारत हे जगातील पहिले राष्ट्र ठरले होते.

वैज्ञानिक मानसिकतेबरोबरच समाजात घडणाऱ्या सभोवतालच्या घटनांची चिकित्सा करणे आणि नागरिकांचे अहित होत असेल, तर ते थांबवणे तसेच हितकारी उपक्रमांचा आग्रह धरणे हेसुद्धा महत्त्वाचे आहे. यासाठीच या कलमात पुढे चिकित्सा व सुधारणा करण्यासंबंधी वातावरण निर्माण करण्याचा आग्रह धरला गेलेला आहे, तो सर्वसामान्यांची वैज्ञानिक मानसिकता विकसित करण्यासंदर्भात अत्यंत गरजेचा आहे.

वैज्ञानिक मानसिकता हा शब्दप्रयोग सर्वप्रथम पंतप्रधान पंडित नेहरूंनी वापरल्याचे सांगितले जाते. तथापि, भारतीय संस्कृतीमध्ये प्राचीन कालखंडातील चार्वाक-लोकायत तत्त्वज्ञान प्रणालींमध्ये घटितांच्या चिकित्सा होत असल्याचे स्पष्ट उल्लेख आहेत, तर सात-आठशे वर्षांपासून कर्मकांडांच्या अनुषंगाने भोंदूगिरी, नवस, साकडे इत्यादी निरर्थक गोष्टींची सडेतोड आणि जाहीर निंदा करणाऱ्या भारतातील संतांचीही मानसिकता वैज्ञानिकच असल्याचे दिसून येते. मागील दोन शतकातील असंख्य समाजसुधारकांनी सामाजिक समता, साक्षरता, दारिद्र्य निर्मूलन अशा अनेक विषयांवर जनजागरण करत चळवळी उभ्या केल्या आहेत.

भारतीय राज्यघटनेत वैज्ञानिक मानसिकतेचे कलम समाविष्ट झाल्यानंतर ऑक्टोबर १९८० मध्ये उटीजवळील कुन्नूर येथे वैज्ञानिक मानसिकतेची सांगोपांग चर्चा करण्यासाठी एक परिषद आयोजित केली गेली. या परिषदेत विज्ञान क्षेत्राशिवाय अन्य विषयांमधील अभ्यासकांनाही आमंत्रित केले गेले. या परिषदेत सर्वसामान्य लोकांपर्यंत प्रगती साध्य करण्यासाठी आणि समृद्ध जीवनमान उंचावण्यासंदर्भात, त्यांच्या मनात आशाआकांक्षा निर्माण करण्यासाठी वैज्ञानिक मानसिकता विकसित होण्याच्या आवश्यकतेवर भर देण्यात आला. तसेच भारतात वैज्ञानिक मानसिकता विकसित होण्यास सुरुवात झाली, तर निश्चितच दुसऱ्या नवनिर्मितीच्या कालखंडाचा प्रारंभ होईल, यावरही विश्वास व्यक्त करण्यात आला. कुन्नूर परिषदेमध्ये सुचवलेल्या विविध उपायांमध्ये;

- समाजामध्ये घडणाऱ्या किंवा जाणीवपूर्वक घडविल्या जाणाऱ्या अवैज्ञानिक कृतींचे सातत्यपूर्ण अवलोकन केले

जावे.

- विज्ञान तंत्रज्ञानाच्या अनुषंगाने वैज्ञानिक मानसिकतेच्या प्रसारासाठी स्वतंत्र दूरदर्शन वाहिनी सुरू करण्यात यावी.
- विज्ञान तंत्रज्ञानाशी संबंधित संस्थांनी विज्ञानप्रसारविषयक उपक्रम करावेत. तसेच शास्त्रज्ञ, संशोधक यांनी समाजाभिमुख राहून विज्ञानप्रसार करावा.

इत्यादी मुद्दे सुचवले गेले.

१९८० च्या परिषदेनंतर तीन दशकानंतर २०११ साली पुन्हा हिमाचल प्रदेशातील पालमपूर येथे वैज्ञानिक मानसिकतेवर विचारमंथन करण्यात आले. असे मंथन करण्यामागील उद्देश स्पष्ट होता की, एकविसावे शतक सुरू होताना सगळे जगच एक खेडे होण्याकडे वाटचाल करत होते. या पार्श्वभूमीवर वैज्ञानिक मानसिकतेचा आढावा घेणे आवश्यक होते. या दशकाआधी सुरू झालेला इलेक्ट्रॉनिक्स युगाचा प्रवास आता संगणक युगाकडे चालला होता. मात्र शोकांतिका अशी होती की, संगणकाचे माध्यम वापरूनच पुन्हा निरर्थक कर्मकांडांचाच प्रभाव जोमाने सुरू झाला होता. भारतीयांची पाऊले पुन्हा उलट दिशेला पडू लागली होती. याचा गांभीर्याने विचार होण्यासाठी पालमपूरला पुन्हा एक परिषद भरवण्यात आली. या परिषदेत वेगळ्या वळणावर आलेल्या आपल्या देशातील वैज्ञानिक मानसिकतेची सांगोपांग चर्चा झाली. मागील दशकापासून संपर्क आणि प्रसार माध्यमांचा वापर आणि प्रभाव वाढत होता. त्याचा विचार होऊन या परिषदेत काही अधिक उपाय सुचवले गेले. यामध्ये;

- प्राथमिक शालेय स्तरापासूनच विद्यार्थ्यांसाठी वैज्ञानिक पुस्तके निर्माण करावीत.
- विज्ञानाचे महत्त्व शालेय स्तरावरच बिंबवण्यात यावे.
- चिकित्सक वृत्ती वाढण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रश्न विचारण्याची शिकवण देण्यात यावी.
- संपूर्ण शिक्षण प्रणालीत सभोवतालच्या घटनांचे पृथःकरण करण्याचे उपक्रम असावेत.
- विज्ञान तंत्रज्ञानविषयक विनिमयात्मक उपक्रम वाढवण्यासाठी संशोधकांनी योगदान द्यावे.
- अभ्यासक्रमात आंतरराष्ट्रीय स्तरावरील विज्ञान तंत्रज्ञानविषयक माहितीचा समावेश असावा.
- विज्ञान आणि तत्सम प्रात्यक्षिकांमध्ये उपकरणांचा भरपूर वापर करण्यात यावा.
- उच्च विज्ञानशाखांची पुस्तके स्थानिक भाषांमध्येही भाषांतरित करण्यात यावीत.
- वैज्ञानिक संशोधनाच्या दस्तऐवजीकरणाला सामान्य लोकांच्या दृष्टिकोनातून गती देण्यात यावी.
- वैज्ञानिक विषय क्षेत्रांमध्ये सार्वजनिक संस्थांनीही योगदान देण्यासाठी त्यांना प्रोत्साहन देण्याचे आवाहन करण्यात आले.
- विज्ञान तंत्रज्ञानाच्या अनुषंगाने सामान्यांमध्ये असलेले कौशल्य, गुणवत्ता शोधून त्यांना उत्तेजन देण्यात यावे.
- नागरिकांमध्येही भारतीय वैज्ञानिक मानसिकता विकसित करण्याचे सुचवले आहे.
- वैज्ञानिक मानसिकता विकसित करण्यासंबंधी उपक्रम आखताना नागरिकांना समवेत घेण्यात यावे.
- विविध विज्ञान तंत्रज्ञान क्षेत्रातील मान्यवरांनी सामान्यजनांपर्यंत वैज्ञानिक मानसिकता विकसित करण्यासाठी सुसंवाद साधावा.
- शैक्षणिक संस्थांनी निवृत्त शास्त्रज्ञांच्या मार्गदर्शनाखाली वैज्ञानिक विषयांचे ज्ञान संपादन करावे.
- वैज्ञानिक वातावरण निर्माण होण्यासाठी वैज्ञानिक तत्त्वे विशद करणारी साधने विकसित करण्यात यावीत.
- वैज्ञानिक मानसिकता विकसित करण्यासाठी विज्ञानप्रसार ही सामाजिक जबाबदारी समजण्यात यावी.
- वैज्ञानिक मानसिकतेचा विकास ही एक विचारसरणी म्हणून उदयास येणे गरजेचे आहे. हे अत्यंत महत्त्वाचे विधान पालमपूरच्या परिषदेत अधोरेखित करण्यात आले.

राज्यघटनेत वैज्ञानिक मानसिकतेचे कलम समाविष्ट करण्यामागील सरकारचे उद्देश आणि घेण्यात आलेल्या परिषदांचे विचार समजावून घ्यावे लागतील. जग हे दिवसेंदिवस बदलत असून विज्ञान तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे मानवी जीवन अधिकाधिक सुसह्य किंवा सुलभ होत आहे. ज्याच्या जोरावर दैनंदिन मानवी जीवन समृद्ध होत आहे. त्या विज्ञान तंत्रज्ञानाचा स्वीकार करण्यासाठी मानसिकता विकसित होणे आवश्यक आहे आणि म्हणूनच वैज्ञानिक मानसिकता जोपासण्यासाठी वा सुदृढ करण्यासाठी कायद्याच्या माध्यमातून हे मूलभूत कर्तव्य सांगितले गेले आहे. दैनंदिन जीवनातील असंख्य व्यवहारांवरून विज्ञान तंत्रज्ञानाची अपरिहार्यता किंवा गरज सहज लक्षात येईल. कदाचित त्याच्या गैरवापराचा मुद्दाही येथे उपस्थित होईल. मात्र विज्ञान तंत्रज्ञानाचा गैरवापर ही सर्वस्वी मानवी चूक आहे. विज्ञान तंत्रज्ञानाचा वापर विवेकबुद्धीनेच करायला हवा. गैरवापर झाला म्हणून विज्ञान तंत्रज्ञान म्हणजे शाप असे कदापिही म्हणता येणार नाही.

देशवासियांसाठी राज्यघटनेच्या माध्यमातून वैज्ञानिक मानसिकता विकसित करण्याचे कर्तव्य अनिवार्य करण्यामागील हेतू अगदी सरळ आहे. आपल्या देशाला वैविध्यपूर्ण संस्कृती आणि परंपरांची पार्श्वभूमी आहे. संस्कृती, परंपरा जोपासणे अर्थातच अभिमानास्पद आहे. तथापि, आपल्या देशात संस्कृती परंपरांच्याच नावाखाली शुभाशुभ, नवस, साकडे, संदर्भहीन पूजाविधी, अनिष्ट रूढी आणि निरर्थक कर्मकांडांचाच प्रभाव दिसतो. यामुळे अर्थातच दैववाद

जोपासला जातो आणि मुख्यत्वे जनसामान्यांचेच शोषण होते. हे शोषण आर्थिक तर असतेच पण त्याबरोबर शारीरिक आणि मानसिकसुद्धा असते. जनसामान्यांपर्यंत वैज्ञानिक मानसिकता विकसित होत गेली, तर शतकानुशतके चालत आलेले हे शोषण थांबवणे सहज शक्य आहे. यातून भेदभावविरहित आणि सुदृढ समाज निर्माण होऊ शकतो. केवळ हाच हेतू साध्य करण्यासाठी राज्यघटनेत वैज्ञानिक मानसिकता विकसित करण्याचा आग्रह धरण्यात आला आहे. तसेच असा आग्रह धरताना काळानुरूप आढावाही घेण्यात आलेला आहे, हे समजावून घ्यावे लागेल.

दरम्यानच्या काळात १९८६ मध्ये विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या प्रसारासाठी कार्यरत असलेल्या परिषदेने (नॅशनल कौन्सिल फॉर सायन्स अँड टेक्नॉलॉजी कम्युनिकेशन) भारत सरकारकडे दि.२८ फेब्रुवारी हा दिवस 'राष्ट्रीय विज्ञान दिन' म्हणून साजरा करण्याची सूचना मांडली आणि पुढील वर्षापासून आपल्या देशात २८ फेब्रुवारी राष्ट्रीय विज्ञान दिन म्हणून साजरा करण्याची परंपरा सुरू झाली. २८ फेब्रुवारी हा दिवस निवडण्यामागील कारण, या दिवशी केवळ भारतीयच नव्हे; तर आशियाई देशातील पहिले नोबेल पारितोषिक विजेते शास्त्रज्ञ डॉ. सी व्ही. रामण यांनी दि.२८ फेब्रुवारी १९२८ रोजी त्यांच्या; पारदर्शक माध्यमातून जाताना प्रकाश किरण विखुरण्याची (प्रकीर्णन) क्रिया घडते, यावरील संशोधन सादर केले होते. हा शोध विज्ञानात 'रामण परिणाम' म्हणून प्रसिद्ध आहे. या दिवसाचे औचित्य साधूनच विज्ञानाचे महत्त्व सर्वसामान्यांपर्यंत पोहोचावे, विज्ञानाचे मानवी हिताचे उपयोग सर्वांना कळावेत, नवीन तंत्रज्ञानाचा प्रसार व्हावा तसेच जनसामान्यांची वैज्ञानिक मानसिकता विकसित होत विज्ञान तंत्रज्ञानाला प्रेरणा मिळावी; या उद्देशांना समोर ठेवून विज्ञानदिन साजरा करण्याची संकल्पना सुरू करण्यात आली आहे. आता मुद्दा येतो, तो महासत्तेचे स्वप्न बघणाऱ्या देशासाठी या महत्त्वाच्या कलमाचा राज्यघटनेत समाविष्ट झाल्यापासून तसेच त्यासंदर्भात पार पडलेल्या दोन परिषदा आणि साजऱ्या होत असलेल्या राष्ट्रीय विज्ञानदिनाच्या पार्श्वभूमीवर आजवर झालेल्या वाटचालीचा. अर्थात, आजच्या सद्यस्थितीचे अवलोकन करून हा आढावा घेणे इष्ट ठरेल.

आज कुठलाही दैनंदिन व्यवहार विज्ञान तंत्रज्ञानाच्या अविष्कारातून आकाराला आलेल्या साधनांशिवाय पूर्ण होत नाही. तसा हा व्यवहार अगदी आदिमानव काळातही पूर्ण होत नव्हता. मात्र त्यावेळी हे विज्ञानच आहे की, विज्ञानातून निर्माण झालेले तंत्रज्ञान आहे याची जाणीव नव्हती. याचे अगदी साधे उदाहरण द्यायचे झाल्यास त्या कालखंडात शिकार करून खाताना बनवली गेलेली दगडी हत्यारे किंवा पुढे शोधली गेलेली अग्नी तयार करण्याची कृती किंवा त्याही पुढे ऋतुचक्राचे झालेले आकलन. यामागे जाणून घेतलेले विज्ञान आणि त्यातून विकसित झालेले तंत्रज्ञानच होते. ही मजल दरमजल साध्य करतच आजच्या अत्याधुनिक युगापर्यंतची वाटचाल झाली आहे. कदाचित गैरवापराचा मुद्दा समोर येईल आणि तो रास्त असावा. मात्र जेव्हा माणूस अग्नी निर्माण करायला शिकला त्याचवेळी या अग्नीतून अन्न शिजवण्या- भाजण्याबरोबरच या अग्नीच्या उपयोगातून दुसऱ्याला त्रास देण्यासाठी चुकीची बुद्धीही माणसाला तेव्हाच झाली. यामागे हा केवळ त्याच्यातील विचारांचा फरक होता. हेच आजच्या विज्ञान तंत्रज्ञानाबाबत होत आहे. गैरवापर माणसाच्या अविवेकी विचारांमुळे होतो, यात विज्ञान तंत्रज्ञानाचा दोष नसतो.

आपल्या देशात मजेशीर विरोधाभास असा दिसतो की, एका बाजूला विज्ञान तंत्रज्ञानावर चौफेर टीका करणारे वंश, धर्म, पंथ, संप्रदाय विज्ञान तंत्रज्ञानाचा पुरेपूर वापर करताना दिसतात. अगदी सकाळी सकाळी धर्माचा प्रचार, प्रसार करण्यासाठी लाऊडस्पीकर वापरण्यापासून धार्मिक स्थळांच्या सुरक्षेसाठी वापरल्या जाणाऱ्या सीसीटीव्ही कॅमेरे इत्यादी साधनांपर्यंतची उदाहरणे दिसतील. हे खरे तर धर्मांनी विज्ञान तंत्रज्ञानावर दृढ विश्वास ठेवल्याचेच उदाहरण आहे. अशी उदाहरणे ठायीठायी आढळतील. मात्र या पार्श्वभूमीवर भारतात आजपर्यंत तरी कुणाही धर्म, पंथ, संप्रदायांच्या प्रमुखाने शास्त्रज्ञ, संशोधकांना आमंत्रित करून विज्ञान तंत्रज्ञानाविषयी जाणून घेतल्याचे ऐकिवात नाही. पाश्चात्त्य जगतात यासंदर्भात एक उदाहरण आहे. मोनॅको नामक देशात धर्मगुरू पोप किंवा चर्चशी संबंधित असलेली विज्ञान अकादमी दरवर्षी विज्ञान तंत्रज्ञानातील नवनवीन घडामोडी तसेच प्रगती जाणून घेण्यासाठी जगभरातील शास्त्रज्ञ-संशोधकांना आमंत्रित करून एक परिषद भरवते. दोन दिवस चालणाऱ्या या परिषदेत विज्ञान तंत्रज्ञानातील नवनवीन घडामोडी तसेच वैज्ञानिक प्रगतीमुळे मानवजातीला काय नवीन वळण लागेल यावर विचारविनिमय होतो. आजवर या परिषदेत आपल्या देशातील अनेक शास्त्रज्ञ-संशोधकांनाही आमंत्रित केले गेले आहे. ही भारतीयांसाठी अभिमानाची बाब असावी. आपल्या देशातही अशी परंपरा निर्माण करण्याची गरज आहे.

गंमत अशी की, कुठलेही तंत्रज्ञानयुक्त साधन-उपकरण (मोबाईल फोन, एटीएम कार्ड किंवा अगदी विजेचा दिवा) वापरताना कुणीही हे माझ्या धर्माच्या किंवा पंथाच्या व्यक्तीने शोधलेले नाही म्हणून मी वापरणार नाही असे म्हणताना दिसणार नाही. वैद्यकीय उपचार, औषधे, दळणवळण, उद्योग, व्यवसाय अशा विविध क्षेत्रांमध्ये वावरताना माणूस कधीही दुजाभाव करताना दिसत नाही आणि अशी शेकड्याने उदाहरणे देता येतील. विज्ञान तंत्रज्ञानातून आकाराला आलेल्या अविष्कारांच्या विविध उपयोगांसाठी सर्व धर्माची माणसे अगदी

सहज एकत्र येतात. याची जाणीव ठेवून धर्मांनी विज्ञान तंत्रज्ञानाच्या परिषदा आयोजित करून स्वतःदेखील ते जाणून घ्यावे. भारतीय संस्कृतीतील धर्म आणि संप्रदायांनी ते जाणून घ्यायचा प्रयत्न केल्यास जनसामान्यांमध्ये वैज्ञानिक मानसिकता विकसित होण्यास मोलाची मदत होईल.

एका बाजूला गौरवशाली परंपरा सांगणाऱ्या देशात स्वच्छता, प्रदूषण, व्यसनाधिनता, अंधश्रद्धा, अनारोग्य या लांच्छनास्पद समस्यांची सर्वदूर जाणीव होण्यास स्वातंत्र्य मिळाल्यानंतर पंच्याहत्तर वर्षे उलटत असतानाही संपलेल्या नाहीत. या पार्श्वभूमीवर राज्यघटनेतील वैज्ञानिक मानसिकता दृढ करणाऱ्या कलमाचे महत्त्व लक्षात येते. यासंदर्भात विविध धर्मांचे प्रमुख, राजकीय नेते, विज्ञान तंत्रज्ञान क्षेत्रातील तज्ज्ञ, विज्ञानप्रसार कार्यांशी संबंधित मान्यवर, समाजशास्त्रज्ञ, शिक्षणतज्ज्ञ या सर्वांना वेगवेगळ्या विचारपीठांवर वारंवार एकत्र आणून त्यांच्या मनोभूमिका समजावून घेणे गरजेचे आहे. मान्यवरांचे विज्ञानाबाबतचे विचार सामान्य जनतेपर्यंत गेले तरच राज्यघटनेतील या महत्त्वाच्या कलमाबाबत जागृती निर्माण होऊन खात्रीने स्वागतार्ह बदल होतील आणि भारताची पुढील वाटचाल सुसह्य होईल.

जाता जाता एक लहानसा प्रयत्न करू. किमान शैक्षणिक स्थळांमध्ये वैज्ञानिक मानसिकता आणि मानवतेचा विकास करणे तसेच चिकित्सा आणि सुधारणेचे वातावरण निर्माण करणे प्रत्येक भारतीय नागरिकाचे मूलभूत कर्तव्य आहे. शैक्षणिक संकुलांमध्ये 'भारतीय राज्यघटना कलम ५१अ (एच)' असा फलक लावण्याचा आग्रह धरूया.

(लेखक रेडिओ दुर्बिण वेधशाळेत कार्यरत असून विज्ञान लेखक आहेत.)

●


# के. जी. एन. टेस्ट ट्युब बेबी हॉस्पिटल

मासिक पाळी बंद झाल्यानंतर अपत्यप्राप्ती

## वंध्यत्वाकडून... मातृत्वाकडे

**उपलब्ध सुविधा**

IVF (टेस्ट ट्युब बेबी) ICSI, LAH (लेसर टेस्ट ट्युब बेबी)
सरोगेट मदर ART व भविष्यात जनुकीय प्रयोगशाळा
(गर्भधारणेपूर्वीच भविष्यात जन्मणाऱ्या बाळाचे व्यंगनिदान)
इत्यादी अत्याधुनिक सुविधा उपलब्ध असणारे
मराठवाड्यातील आंतरराष्ट्रीय दर्जाचे हॉस्पिटल



डॉ. आमीर शेख
M.D., P.G.D. (Mumbai)
FCPS,



डॉ. रजिया शेख
M.D.,
I. V. F.

**यशस्वी उपचार**

टेस्ट ट्युब बेबीमध्ये ९४ टक्के यश मिळविणारे
जागतिक पातळीवरील एकमेव हॉस्पिटल
सरोगेट मदर, ओहम डोनेशन, एम्ब्रिबो डोनेशन
लातुरातील पहिले ART बाळ, पहिले एम्ब्रियो रिडक्शन,
पहिले पॅपराशीयस बाळ, पहिले सुपर सोहलेशन (COH) करणारे हॉस्पिटल

नवीन रेणापूर नाका,
अंबाजोगाई रोड, लातूर
फोन नं.: ०२३८२-२२८३३१, २२८३३३,
मोबा.: ९४२२०७१३९६

मनापासून



# अंतरीची सल

डॉ. प्रदीप पाटकर
९८६९४७२२१५

"जगभर राजकारणात स्वार्थ मूलभूत प्रवृत्ती ठरून सद्सद्विवेकबुद्धीवर स्वार होताना दिसते. कारण मुळातच ते सत्ताकारण होत जाते. तिथे नफ्यातोट्याच्या हिशोबाची विचारांवर, विवेकावर पक्की पकड असते. त्यात हुकुमशाही वृत्तीचा नेता कशाचीच तमा बाळगत नाही. मग राजकारणात हिंसा आणि संहार अग्रस्थान मिळवितात. आखाती युद्ध, इराक-इराण-अमेरिका-व्हिएतनाम, सिरिया आणि आता युक्रेन-रशिया अशी अनेक महायुद्धे आणि अमर्याद मानवी संहार होतो. संपत्तीनाश, पर्यावरणाचा नाश, नीतीमूल्यांची मोडतोड, एकंदरीत विश्वव्यापी विध्वंस केला जातो. घरी सत्तासंघर्ष, दडपशाही व अविवेकी विचार-धारणांमुळे घराघरातून हिंसाचार बोकाळत जातो. स्त्रिया, मुले, वृद्ध, पुरुष यातील साऱ्या दुर्बल घटकांची परिस्थिती बिकट होताना दिसते."

किनाऱ्यावरून, बोटीतून, आकाशातून पाहाताना संथ समुद्राच्या लाटा विलोभनीय दिसतात. पाण्यात उतरावेसे वाटते. मात्र पोहता येत नसेल आणि चुकून त्या खोल पाण्यात खेचला गेलात, तर कसेतरी डोके पाण्याच्यावर ठेवण्याची धडपड करताना समुद्र विलोभनीय सोडाच, भयंकर धास्ती, मरणभीती देणारा ठरतो. दुरून डोंगर साजरे दिसावेत, तसे आयुष्य त्याच वाटेने जाऊ लागते, तेव्हा सलते. जबाबदारी, समस्या नसेल तोवर सारे ठीक. म्हणून बालपण छान वाटते. संकटातून सहिसलामत बाहेर पडल्यावर ते संकट काय काय शिकवून गेले त्याचा आढावा घेणे सुखद ठरते. कधी तो अनुभव स्वमूल्य वाढविणारा ठरतो. वाटते, एकंदरीत झाले ते ठीक झाले. पण संकटात असताना मात्र नको ते जिणे असेच वाटत राहाते.

जगणे सतत संघर्ष होत जाते; तो टाळायचा असेल, (तसे अनुकूल घटक असल्यास) तर निदान सतत समायोजनाची निकड जाणवून देत राहाते. इतरांचा संघर्ष समजून घेणे, त्यात मदत करणेही जमू शकते. जगताना वेळोवेळी संघर्ष करावा लागतो; मग तो परिस्थितीशी असेल, इतरांशी असेल, स्वत:शीही असू शकेल. हा संघर्ष जीवनाच्या, माणसांच्या, सृष्टीसमष्टीच्या आजवर दृष्टीस न पडलेल्या, न उमजलेल्या बाजूंचा अनुभव देत जातो. त्यातून आपली समज प्रगल्भ होऊ शकते (होतेच असे नाही!). संघर्ष अनेक अर्थांनी एक चांगला शिक्षक ठरू शकतो. मात्र त्याचे नेमके विश्लेषण (शक्यतो तज्ज्ञ मनोविश्लेषकाच्या मदतीने) करणे आवश्यक असते; मग ते भावी जीवनात उपयुक्त ठरू शकते.

जग जाणून घ्यायचे असेल, तर जगाबरोबरचे नाते समजून घ्यावे लागते. लहान मुलास ते शक्य असते. कारण त्या मनावर नात्यांच्या देवाणघेवाणीचे थर जमलेले नसतात. आपले कोण, परके कोण या अस्वस्थ असुरक्षिततेचा, भावनेचा स्पर्श अशा मनाला झालेला नसतो. नाव, नाते, भाषा, रीतिरिवाज, शिष्टाचार, खाण्यापिण्याच्या व वेषभूषेच्या पद्धती, वागण्याच्या पद्धती इ. अनेक भिंती व थर मनावर लिंपले गेलेले नसतात. मात्र अशा अबोध मनाला विश्लेषणाचे सामर्थ्यही मिळालेले नसते. कुणी परके का? हे जाणण्याअगोदरच ते परके आहेत हे कळते. तीच मुद्रा अंतर्मनावर, बाह्य समजेवर कोरली जाते व पुढील आयुष्यात त्या भेदांमधून बाहेर येणे कठीण होत जाते; मनाची संरक्षक व्यवस्था जणू बंदिस्त होऊन जाते. व्यवहारात वावरताना अशा मनाच्या खिडक्या उघडाव्या लागतात. थोडे सैल, थोडे गाफिल व्हावे लागते म्हणा ना! मनाची संरक्षक व्यवस्था थोडी डुलक्या काढू लागली तरच हे भेद बाजूला करता येतात. निरागस बालसुलभ वृत्तीनंतर, पौगंडावस्थेतील मैत्र व कुमारवयीन प्रथम प्रेम हे असे काही अनुभव या संरक्षक व्यवस्थेचे घट्ट बंद झालेले दरवाजे किलकिले करतात व आतील भेदांना ताजी मोकळी हवा मिळवून देतात ... मग असे पहिले अनुभव, प्रेमस्पर्श, जाती - प्रांत - भाषा भेदविरहित मैत्री आयुष्यभर सुखद भावना देत राहातात. मोजूनमापून केलेल्या प्रेमाला असा आस्वाद लाभत नाही.

जगभर राजकारणात स्वार्थ मूलभूत प्रवृत्ती ठरून सद्सद्विवेकबुद्धीवर स्वार होताना दिसते. कारण मुळातच ते सत्ताकारण होत जाते. तिथे नफ्यातोट्याच्या हिशोबाची विचारांवर, विवेकावर पक्की पकड असते. त्यात हुकुमशाही वृत्तीचा नेता कशाचीच तमा बाळगत नाही. मग राजकारणात हिंसा आणि संहार अग्रस्थान मिळवितात. आखाती युद्ध,

**(पृष्ठ क्र. २८ वर)**



# व्हायरस कोरोनाचा, फसवा इलाज G3 चा

प्रा. मच्छिंद्रनाथ मुंडे
९९६९४७३७०२

सुरेंद्र वाजपाई यांच्या घरी आज अचानक घरातील चार लोक कोरोनाबाधित म्हणून केलेल्या चाचणीत पॉझिटिव्ह झाल्याचे समजताच संपूर्ण कुटुंब, सगेसोयरे व शेजारीपाजारी हादरून गेले. वस्तुस्थिती अशी होती की, सुरेंद्र वाजपाई यांच्या पत्नी श्रीमती कावेरी ताई या सरकारी दवाखान्यात नर्स म्हणून मागील दोन–अडीच महिने कोरोनाबाधित रुग्णांची सेवा करीतच होत्या. सुरुवातीला त्यांना ताप व साधा कोरडा खोकला अशी लक्षणे दिसू लागताच त्यांनी त्यांच्याच दवाखान्यात स्वतःच्या संपूर्ण चाचण्या करून घेतल्या. चाचण्या पॉझिटिव्ह येताच त्यांनी स्वतःला घरातच कोंडून घेतले व त्यानंतर घरातील इतरांची चाचणी करण्यात आली. त्यांचेही रिपोर्ट पॉझिटिव्ह आल्यामुळे सर्वांना एकच धक्का बसला. एव्हाना सर्व सरकारी हॉस्पिटलमध्ये प्रचंड गर्दी व रिकामे बेड नसल्यामुळे सर्वांना घरातच क्वॉरंटाईन करण्यात आले.

वाजपाई हे प्रचंड धार्मिक असल्यामुळे गेल्या दोन महिन्यांत त्यांनी मेणबत्या, पणत्या, दिवे लावून, थाळ्याही बडवल्या होत्या. अधूनमधून त्यांच्या वाचनात येणाऱ्या व्हॉट्सअपच्या विद्यापीठातील सनातनी उपचार व कोरोना सुरक्षा उपचार पद्धतीचा अवलंब घरात सुरू होताच; त्यात घरात रोज भीमसेन कापूर जाळणे, धुपारती करणं, आल्याचा चहा पिणे, मालेगांव काढा पिणे, रात्री झोपताना हळदयुक्त दूध पिणे हे व असे अनंत उपचार सुरू होतेच. तरीसुद्धा या सर्वांवर मात करून कोविड–१९ या व्हायरसने त्यांच्या घरात नकळत एन्ट्री केली. त्यामुळे अतिधार्मिकतेने ग्रासलेल्या वाजपाई व त्यांच्या कुटुंबीयांना धक्का बसणे रास्त आहे. परंतु एवढे घडून गेल्यानंतरही शांत बसतील ते सनातनी विचारबाधित वाजपाई थोडेच? कुणा भक्ताकडून म्हणजे (सनातनी विचारधारेच्या भक्त मंडळीकडून) G3 चा फॉर्म्युला फोनद्वारे समजून घेतला व त्यांच्या सांगण्यावरून सर्व औषधे (कोरोनाला प्राथमिक पातळीवर आटोक्यात ठेवण्याची) बंद करून दोन–तीन दिवसातच G3 म्हणजे गोमाता, गोमूत्र व गोबर उपचार पद्धती घरात सुरू केली. G3 फॉर्म्युला म्हणजे, घर पूर्णपणे गोमूत्राने फवारणी करून वॉश आऊट करणे, दाराशी गोमाता २४ तास सेवेसाठी आणि दर्शनासाठी ठेवणे. तसेच गोमुत्र व गोबर फ्रेश उपलब्धतेसाठी बांधून ठेवणे. सकाळ/संध्याकाळी गोमातेचे पाय तिच्याच दुधाने धुवून साग्रसंगीत पूजा करणे आणि सर्व कोरोनाबाधित रूग्णांनी गायीचे दर्शन घेणे. त्याशिवाय गायीचे शेपूट तीन तीनदा तोंडावरून फिरवून (कोरोना झाड झाडणी पद्धत) घेणे. गोबराने घरात फर्निचर व मार्बल असतानादेखील सर्वत्र गोबरने (फक्त गाईचेच शेण) आठवड्यातून दोनदा सारवून घेणे. एवढे पुरे झाले नाही म्हणून मग गोबर प्लास्टिक पुडीत बांधून ते प्रत्येक कोरोनाबाधित व्यक्तीच्या उशाखाली ठेवण्यात आले.

एवढे सर्व उपचार करूनही अवघ्या १०/१२ दिवसातच सुरुवातीला पत्नी श्रीमती कावेरीताई यांचे निधन झाले. त्यांची डेड बॉडी उचलायला कुणीही शेजारी व नातेवाईकदेखील आले नाहीत. शेवटी त्यांच्याच दवाखान्यातून ॲब्युलन्समधून बॉडी स्मशानभूमीत नेऊन तिचे दहन विद्युतदाहिनीद्वारे सरकारी कर्मचाऱ्यांनी केले. त्यानंतर मुलगा सावरला व बरा झाला. मात्र सुरेंद्र वाजपाई व त्यांची कन्या यांचाही अंत कावेरीताईच्या पद्धतीनेच झाला.

वास्तवत: कोणतीही सनातन उपचार पद्धती, उदा. कापूर, हळदयुक्त दूध, थाळ्या, पणत्या यांचा काहीही उपयोग झाला नाही. त्यानंतर औषधे थांबवून G3 फॉर्म्युला वापरून सुरेंद्र वाजपाई यांनी कुटुंबाचा व स्वतःचा देखील घात केला. त्यांचा २१ वर्षाचा मुलगा वाचला. कारण त्याची रोगप्रतिकारक शक्ती, नियमित व्यायाम, सकस आहार व मन शांतचित्त ठेवण्याची वृत्ती. G3 म्हणजे चक्क मनाची फसवणूक आहे.

●

**सत्यशोधक पध्दतीने गृहप्रवेश**



**शिराळा :** छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त पणुंब्रे तर्फ शिराळा येथील श्री.आर.डी.पाटील व त्यांच्या कुटुंबियांनी कोणतेही कर्मकांड न करता त्यांच्या मातोश्री श्रीमती मालती पाटील यांच्या हस्ते फित कापून व भगिनी सौ.संगिता मादळे यांच्या हस्ते कलश पूजन करून गृहप्रवेश केला. यावेळी सर्व महापुरूषांच्या फोटोचे पूजन करण्यात आले. यावेळी सांगली मअंनिसचे जिल्हयाचे अध्यक्ष प्रा.विजयकुमार जोखे, डॉ.सुनिल पाटील आदी उपस्थित होते.



# ...आणि संघटनेमुळे विवेकशील झालो

अमोल चौगुले
९५०३४०१३८६

जडणघडण

“संघटनेचा एक कार्यकर्ता म्हणून कार्यरत असताना एक विवेकशील, संवेदनशील व कृतिशील ‘माणूस’ म्हणूनही मी घडू शकलो. त्यामुळे माझी व माझ्या कुटुंबाची विविध पातळ्यांवर प्रगती करू शकलो. अर्थातच, माझ्या व्यक्तिमत्त्वाच्या जडणघडणीत महाअंनिसचा सिंहाचा वाटा आहे हे नमूद करताना मला अतिशय अभिमान वाटतो. संघटना ज्या पद्धतीने संत-समाजसुधारकांचा वसा व वारसा पुढे नेण्याचा प्रयत्न करते त्यातून प्रेरणा घेत समाजातील चुकीच्या प्रथा-परंपरा, अंधश्रद्धा, व्यसनाधीनता, देवधर्मविषयक शोषण, वंश-पंथभेद अशा अनिष्ट गोष्टींना प्रश्न विचारण्याची निर्भीड व चिकित्सक वृत्ती माझ्यात केवळ संघटनेमुळेच निर्माण झाली.”

मी अमोल मुरलीधर चौगुले. सध्या अंबरनाथला वास्तव्याला असलो तरी माझं मूळ गाव सांगली जिल्ह्यातील इस्लामपूर. शालेय व महाविद्यालयीन शिक्षणही तिथलेच. १९९९ साली दहावीची परीक्षा उत्तीर्ण होऊन महाविद्यालयीन शिक्षणाला सुरुवात केली व तेथूनच माझ्या संपूर्ण आयुष्याला कलाटणी मिळाली. अकरावीला विज्ञान शाखेत प्रवेश घेतल्यानंतर, डॉ.नितीन शिंदे सरांच्या संपर्कात आलो आणि पुढे वैचारिक दिशा मिळत गेली. शालेय जीवनापासून विविध परीक्षा देण्याची आवड होतीच. तशातच त्यादरम्यान एका आगळ्यावेगळ्या परीक्षेला बसायची संधी मिळाली. त्या परीक्षेचे नाव होतं ‘वैज्ञानिक जाणिवा परीक्षा’. या परीक्षेमुळे माझी ओळख अशा एका संघटनेसोबत झाली जी चिकित्सा करायला शिकवते, प्रश्न विचारायला लावते आणि आजूबाजूच्या घटनांना समजून घेऊन त्यावर निर्भीडपणे मत मांडण्याचा विश्वास देते. शिवाय महत्त्वाचं म्हणजे समाजामध्ये विवेक, न्याय व नीतीने वागण्याचा आग्रह धरते. ही संघटना म्हणजेच ‘महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती’.

संघटनेतील माझा प्रवेश २०००-२००१ च्या सुमारास झाला. त्यादरम्यान शिंदे सरांचे कॉलेजमध्ये हिप्नॉटिझमचे कार्यक्रम व्हायचे. मी कार्यक्रमांना हजर असायचो. मात्र स्वतः कधीच हिप्नॉटाईज झालो नाही. सर म्हणायचे, ‘‘तू चंचल आहेस. तू कधीच हिप्नॉटाईज होणार नाहीस. तू असं कर, माझ्यासोबत येत जा. या कार्यक्रमात हिप्नॉटाईज होत असणाऱ्यांना बसवणं किंवा झोपवणं याबरोबर त्यांची काळजी घेत राहा.’’ तेव्हापासून नित्यनेमाने सरांसोबत कार्यक्रमांना उपस्थित राहू लागलो. त्याच दरम्यान संजय बनसोडे सरांशीही ओळख झाली. ते कॉलेजमध्ये अंनिसचे विविध उपक्रम घेऊन येत असत. हे सर्व मला भारी वाटत गेलं. मात्र तेव्हा हे समजत नव्हतं की, हे सर्वजण समाजाला काहीतरी वेगळं देत आहेत. खरं तर केवळ गंमत म्हणून मी या सर्वांमध्ये सामील झालो होतो. नंतर हळूहळू मला बैठकांना बोलावले जाऊ लागले. या बैठकांमध्ये नेहमीच काहीतरी नवीन ऐकायला व पाहायला मिळायचं. पुढील बैठकीत नक्कीच काहीतरी नवीन शिकायला मिळेल किंवा बघायला मिळेल या कुतुहलाने मी शाखेच्या सर्व साप्ताहिक बैठकांना जात होतो. त्या काळात इस्लामपूर शाखेत तरुणांची खूप मोठी उपस्थिती असे; (तशी ती आजही असते) याचं कारण म्हणजे या शाखेत विविध प्रकारचे तरुणांसाठीचे उपक्रम, सांस्कृतिक कार्यक्रम. त्यामध्ये पथनाट्य, नाटकं, गाणी, परिवर्तनाचे सूर नावाचा जलसा, चमत्काराचे प्रयोग, व्याख्याने, विविध विषयांवरील शिबिरे, कौटुंबिक सहली, ट्रेकिंग असं बरंच काही सतत चालू होतं. सर्वात महत्त्वाचं म्हणजे, या सर्व गोष्टींमुळे हळूहळू सर्वांशी माझं एक नातं निर्माण होऊन इस्लामपूर शाखा हे माझं दुसरं कुटुंबच झालं. सर्वांनी मलाही त्याच मायेनं, आपुलकीनं-प्रेमानं आपल्यामध्ये सामावून घेतलं आणि मी इस्लामपूर शाखेचा क्रियाशील कार्यकर्ता कधी झालो हे कळलं देखील नाही. संघटनेच्या विविध विषयांवरील शिबिरांमध्ये मी सहभागी झालो. संघटनेच्या विविध अधिवेशनांचा, राज्यस्तरीय उपक्रमांचा, बैठकांचा, संघर्षयात्रांचा मी साक्षीदार आहे. या काळात मला शहीद डॉ.नरेंद्र दाभोलकर यांचा सहवास लाभला, ही माझ्या आयुष्याच्या प्रवासातील अत्यंत मोलाची गोष्ट. शाखेतील सामान्य कार्यकर्ता, शाखा पदाधिकारी ते जिल्हा पदाधिकारी असा आजपर्यंतचा प्रवास सुरू आहे. इस्लामपूर शाखेत तेरा वर्षे कार्यरत राहिल्यानंतर स्थलांतरामुळे सध्या मी ठाणे जिल्ह्यात



२०१३ पासून कार्यरत आहे. संघटनेसोबतच्या प्रवासातून माझ्या व्यक्तिमत्त्वात घडलेले आमूलाग्र बदल माझे मलाच जाणवतात. संघटनेच्या कार्यातून निर्माण झालेला आंतरिक, बौद्धिक विकास तसेच शैक्षणिक, सामाजिक दृष्टिकोन निश्चितच प्रेरणादायी व ऊर्जावर्धक वाटतो.

संघटनेचा एक कार्यकर्ता म्हणून कार्यरत असताना एक विवेकशील, संवेदनशील व कृतिशील 'माणूस' म्हणूनही मी घडू शकलो. त्यामुळे माझी व माझ्या कुटुंबाची विविध पातळ्यांवर प्रगती करू शकलो. अर्थातच, माझ्या व्यक्तिमत्त्वाच्या जडणघडणीत महाअंनिसचा सिंहाचा वाटा आहे हे नमूद करताना मला अतिशय अभिमान वाटतो. संघटना ज्या पद्धतीने संत-समाजसुधारकांचा वसा व वारसा पुढे नेण्याचा प्रयत्न करते त्यातून प्रेरणा घेत समाजातील चुकीच्या प्रथा-परंपरा, अंधश्रद्धा, व्यसनाधीनता, देवधर्मविषयक शोषण, वंश-पंथभेद अशा अनिष्ट गोष्टींना प्रश्न विचारण्याची निर्भीड व चिकित्सक वृत्ती माझ्यात केवळ संघटनेमुळेच निर्माण झाली.

संघटनेत विविध महत्त्वाचे उपक्रम राबविले जातात. त्यापैकी मला भावलेला व प्रभावित करणारा एक उपक्रम म्हणजे 'संविधान बांधिलकी महोत्सव'. हा उपक्रम राबवित असताना संविधानिक मूल्ये वैयक्तिक, सामाजिक विकासासाठी किती महत्त्वाची व आवश्यक आहेत याचे मार्गदर्शन मिळाले. संघटनेत असलेले विचार व कृती स्वातंत्र्य, समान संधी, एकमेकांविषयीचे प्रेम, समानतेची वागणूक ही मूल्ये दैनंदिन आयुष्यातही किती उपयुक्त आहेत, हे लक्षात आले. लोकशाही मार्गाने निर्णय घेऊन कार्य करण्याची पद्धत माझ्या अंगी जोपासली गेली. कार्याध्यक्ष अविनाशभाई पाटील यांच्यासोबत केलेला हैदराबादचा दौरा, रामनगर-नैनीताल, उत्तराखंड येथे जाऊन महाअंनिसचे कार्यक्रम करण्याच्या संधीमुळे माझ्या कामाच्या कक्षा रुंदावण्यासाठी मोठी मदत झाली. शाखा पातळीवरील एखादा सामान्य कार्यकर्ता इतर राज्यांत जाऊनही कार्य करतो हे महाअंनिसचे इतरांपेक्षा एक आगळेवेगळे वैशिष्ट्य ठरावे.

इस्लामपूर शाखेत असताना सलग दहा वर्षे 'पर्यावरण संवर्धन' या विषयावरील शिबिरांचे नियोजन, आयोजन व सहभागामुळे पर्यावरणाचे प्रेम अधिकच वृद्धिंगत झाले. होळीची पोळी दान करा, फटाकेमुक्त दिवाळी, गणेशमूर्ती दान, सर्पविज्ञान अशा विविध पर्यावरणपूरक उपक्रमांच्या सहभागातून पर्यावरण रक्षणासाठी हातभार लावता आला. पर्यावरण जागृतीवर विविध ठिकाणी प्रबोधनपर व्याख्याने देऊन, इतरांनाही पर्यावरण रक्षणासाठी उद्युक्त करता आले, हे निश्चितच अभिमानास्पद वाटते.

आसपास सर्वत्र चंगळवादाचे वातावरण असताना संघटनेच्या उपक्रमांद्वारे अनेक तरुणांना व्यसनाधीनतेपासून परावृत्त करण्यात यशस्वी झालो. जोडीदाराची विवेकी निवड (जोविनि) हा महाअंनिसचा आणखी एक आगळावेगळा उपक्रम. या उपक्रमाद्वारे तरुण-तरुणींना वयात येण्याच्या काळातील शारीरिक, मानसिक, भावनिक बदलांची प्रशिक्षणाद्वारे शास्त्रशुद्ध माहिती देऊन, त्यांचे भावविश्व समजून घेऊन त्यांना योग्य ते निर्णय घेण्यासाठी मदत करू शकलो. विविध सांस्कृतिक कार्यक्रमांतून आलेला आत्मविश्वास व सभाधीटपणा ही महाअंनिसचीच देणगी आहे. त्याआधारे अंबरनाथ येथील एका महाविद्यालयात मी 'विवेक वाहिनी'ची स्थापना करून ती चालवण्यात यशस्वी झालो.

महाअंनिसच्या पुढाकाराने व प्रयत्नांतून पारित झालेल्या कायद्यांच्या साहाय्याने, अंधश्रद्धेच्या व जातपंचायतींच्या मनमानी कारभाराला बळी पडलेल्या पीडितांना शासन-प्रशासन पातळीवर संवाद करीत आधार व मदत देण्याचे कार्य करू शकलो, याचे निश्चितच समाधान वाटते. अलीकडच्या काळात कोविड-१९ च्या महाभयंकर साथीने अनेक जण त्रस्त होते. या भयंकर परिस्थितीत प्रशासनाला सोबत घेऊन गरजूंना मदत पोहोचवणे, त्यांच्यात आत्मविश्वास व निर्भयतेची भावना निर्माण करणे आवश्यक होते. संघटनेच्या 'मानस मित्र' या संकल्पनेनुसार त्यांना मानसिक आधार देण्याचे मोलाचे कार्य सर्व विवेकसाथींच्या मदतीने या काळात आम्ही घडवून आणू शकलो. संघटनेचे सर्व उपक्रम लोकवर्गणी व लोकसहभागातून राबवले जातात. मात्र, हे उपक्रम कमीत कमी खर्चात कसे पार पडतील, याचेही नियोजन करावे लागते. बचत करण्याची ही सवय माझ्या व्यक्तिगत आयुष्यातही बिंबवली गेली ती केवळ संघटनेच्या कार्यपद्धतीमुळे. इतरांवर अवलंबून न राहाता स्वतःचे काम स्वतः करण्यातून स्वावलंबित्व, श्रमप्रतिष्ठा याचे महत्त्व मनात रूजले व तो प्रभाव कुटुंबीयांवरदेखील पडला याचा निश्चितच आनंद वाटतो.

शहीद डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या निर्घृण खुनाचा संघटनेला तीव्र धक्का बसला. मन सुन्न झाले. मात्र, अशा दुःखद व बिकट परिस्थितीतही संघटनेची वाटचाल जोमाने सुरू राहिली. सर्व विवेकसाथी संकटांवर मात करीत निर्धाराने उभे राहिले, याचा निश्चितच अभिमान वाटतो. संकटाच्या काळातही मन शांत ठेवून विवेकाने निर्णय घेण्याचा गुण माझ्यात रुजला याचे श्रेय मी 'विज्ञान, निर्भयता, नीती' हे ब्रीद असलेल्या माझ्या संघटनेला देईन.

'संकटे दाही दिशा,
जडली झुंजायाची नशा.
त्यातून जिंकायाची आशा,
कधी सुटायची नाही.
किती घाव पडू देत,
आता तुटायाचे नाही.

या प्रेरणादायी काव्यपंक्तीनुसार आजही माझी संघटनेतील वाटचाल सुरू आहे. जडणघडणीच्या या प्रवासात मोलाचे सहकार्य करणाऱ्या संघटनेतील सर्व विवेकसाथींच्या प्रति मी कृतज्ञता व्यक्त करतो.

विवेकाचा आवाज बुलंद करूया!

●

चित्रपट परीक्षण



# झुंडः व्यवस्थेच्या दगडी भिंतीला पारदर्शक करणारा सिनेमा

प्रा. डॉ. श्यामसुंदर मिरजकर
९४२११२१२३५२

“रेल्वेलाईनवर जीव द्यायला गेलेला तरुण ऐनवेळी कचरतो. माघारी फिरतो. त्याच वेळी त्याला लांबून फुटबॉलचा जल्लोष ऐकू येतो. तो एक मोठी भिंत ओलांडून पलीकडे जातो आणि मृत्यूकडून जीवनाकडे जाण्याचा मार्ग त्याला सापडतो. तो चांगला गोलकिपर असतो. खरेतर राज्यघटनेमध्ये संधीची आणि दर्जाची समानता सर्व नागरिकांना प्रदान करण्याचे अभिवचन आहे. परंतु प्रत्यक्षात काय दिसते? अनेक माणसांना आपण माणूस समजतच नाही.”

‘हम को दुनिया ने रोज देखा है
फिर भी अनदेखा झुंड है।
हम न जिंदा थे, हम न मरते है
लोग कहते है, झुंड है।’

या गाण्याच्या ओळी आहेत दिग्दर्शक नागराज मंजुळेच्या ‘झुंड’ चित्रपटातल्या. एक असे जग, जे आपल्या आजूबाजूला सतत अस्तित्वात आहे, परंतु आपण त्याची दखल घेत नाही. दुर्लक्ष करतो. उपेक्षा करतो. आपण त्यांचे श्रम घेतो, पण माणसं नाकारतो. जगण्यासाठी दररोज संघर्ष आणि भागदौड करणारा हा वर्ग घाणीत कष्टतो. घामात भिजतो. व्यसनात बुडतो आणि बेवारस होऊन संपून जातो. समाजव्यवस्थेच्या तळच्या जातवर्गातून आलेली ही झुंड शहरांच्या तथाकथित सौंदर्याला गालबोट लावणाऱ्या झोपडपट्टीत राहाते. पलीकडेच एक चकचकीत आकर्षक नीटनेटका वर्ग कॉलनी, सोसायटी आणि अपार्टमेंटच्या टॉवरमध्ये राहातो. तो शाळा, कॉलेज आणि मॉल संस्कृतीत वाढलेला शायनिंग इंडिया आहे. कष्टणारा भारत आणि शायनिंग इंडिया यांच्या दरम्यान एक उंच भिंत आहे. त्या भिंतीला दरवाजा नाही. इंडियावाले लोक भिंतीवरून पलीकडे सगळा कचरा टाकतात. तो कुठे पडतोय आणि तिथे कोणी आहे का, याची त्यांना फिकीर नाही. उलट आमच्या कचऱ्यावर हे जगतात असा दर्प! या झोपडपट्टीवाल्या भारतातून चकचकीत इंडियात येण्यासाठी एक मोठी भिंत चढून त्यावरून उड्या मारून जावे लागते. मात्र अशा घुसखोरांना भिंतीपलीकडे ठेवण्यासाठी कधी वर्दीतले, कधी वर्दीत नसणारे सिक्युरिटी वर्कर कार्यरत असतात.

नागराज आपल्या विलक्षण धारदार चित्रशैलीने या वास्तवाचे दर्शन घडवितो. कुठेही अतिरंजित न होता, एकामागोमाग एक अनेक चित्रचौकटी मांडत राहातो. वरवर पाहाता झोपडपट्टीतील मुला-मुलींना फुटबॉलची गोडी लावून त्यांचे जीवनमान उंचावणाऱ्या, जगण्यातील उमेद वाढविणाऱ्या विजय बोराडे (प्रत्यक्षातील विजय बारसे) या क्रीडाशिक्षकाची ही कहाणी वाटते. पण नागराज या कहाणीला खेळ आणि ध्येयासक्त क्रीडाशिक्षक यात सीमित ठेवत नाही, तर तो त्याही पलीकडे जाऊन आपल्याला विचार करायला लावणारे खूप काही दाखवितो.


चेन स्नॅचिंग, धावत्या रेल्वेतून दगडी कोळसा चोरी, मोबाईल चोरी करणारे आणि गुटखा/खर्रा, दारू, गांजा यात गुरफटून गेलेले तरुण एकदा भर पावसात प्लास्टिकच्या डब्याला फुटबॉल करून खेळताना दिसतात. त्यांच्यातील स्पोर्ट स्पिरिट विजय बोराडे या क्रीडाशिक्षकाला भावते आणि तो त्या झोपडपट्टीवाल्या मुला-मुलींच्या जीवनात फुटबॉल आणतो. हा खेळ हळूहळू त्यांचे जगणे बदलतो. समृद्ध करतो. आशादायी करतो. त्याची ही कहाणी आहे.

नागराजने ती मांडली आहे आपल्या नेहमीच्या ‘हट के’ शैलीत. त्यातील प्रत्येक कॅरेक्टर हे एकेक नमुने आहेत. ते अभिनय करत आहेत, असे वाटतच नाही. इतकी सहजता व लवचिकता. अफलातून संवाद. ते त्या वस्तीचे लोकांचे अविभाज्य भाग असावेत असे. यातील मुले गुन्हेगारीकडे वळलेली, परंतु वस्तीतल्या माणसांची चौकशी करणारी. काळजी घेणारी. मदतीला धावणारी. नागराज या सगळ्यांकडे पाहाण्याची नवी दृष्टी देतो.

उदाहरणार्थ, एखाद्या स्त्रीला लागोपाठ मुली झाल्या, तर तिलाच दोष देण्याची समाजप्रवृत्ती असते. चित्रपटात एका मुस्लीम तरुण स्त्रीला तीन छोट्या मुली आहेत. नवरा तिला दोष देतोय. नव्हे संशयही घेतोय. मारायला धावतोय. ती मुली घेऊन घराबाहेर पडते. तो तिला घरात चल म्हणून धमकावतो. पण तो तिला भररस्त्यात मारू शकत नाही. ‘परिणाम वाईट होतील’, असे तो तिला म्हणतो. ती म्हणते, ‘क्या करेगा तू? तलाक देगा? अरे तू क्या मुझे तलाक देगा. मै तेरी कु तलाक देती. तलाक....तलाक....तलाक...’ आणि निघून जाते. पुढे ती फुटबॉल खेळते. तिची आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड होते. पासपोर्टसाठी आवश्यक कागदपत्रे आणण्यासाठी ती

नवऱ्याच्या दारी जाते तर सासू तिला घरात घेत नाही. नंतर नवरा तिला कागदपत्रे देण्यासाठी तिच्या दारी जातो, तर त्याची सासू त्याला घरात घेत नाही. या दोन दृश्यातून नातेसंबंधातील संघर्ष कुठे, कसा, कुणामुळे वाढत जातो, ते नेमकेपणाने टिपले आहे. धर्माचा बागुलबुवा न निर्माण करता ते सारे धाडसाने मांडले आहे. असे अनेक प्रसंग संपूर्ण चित्रपटात पाहावयास मिळतात.

एका दृश्यात रेल्वेलाईनवर जीव द्यायला गेलेला तरुण ऐनवेळी कचरतो. माघारी फिरतो. त्याच वेळी त्याला लांबून फुटबॉलचा जल्लोष ऐकू येतो. तो एक मोठी भिंत ओलांडून पलीकडे जातो आणि मृत्यूकडून जीवनाकडे जाण्याचा मार्ग त्याला सापडतो. तो चांगला गोलकिपर असतो. खरेतर राज्यघटनेमध्ये संधीची आणि दर्जाची समानता सर्व नागरिकांना प्रदान करण्याचे अभिवचन आहे. परंतु प्रत्यक्षात काय दिसते? अनेक माणसांना आपण माणूस समजतच नाही. ध्येयधोरण ठरवताना, निर्णय घेताना, त्यांचा विचारच करत नाही. त्यांना संधी मिळाली, तर ते काय करू शकतात? हा सिनेमा सांगतो, ही झोपडपट्टीतली झुंड कॉलेजच्या प्रशिक्षित टीमला हरवू शकते. जी मुलं दगडाच्या एका टिपिऱ्यात डुकराला पाडू शकतात, त्या मुलांच्या हातात बॉल दिला तर ते तेज बॉलर होणार नाहीत का? छोटे छोटे देश ऑलिम्पिकची अनेक पदकं नेतात आणि आपल्या देशात टॅलेंट नाहीच, हे मला मान्य नाही. फक्त ते शोधलं पाहिजे. त्याला संधी दिली पाहिजे, हे अमिताभ बच्चनच्या तोंडचे संवाद या दृष्टीने महत्त्वाचे आहेत.




हे सगळे झोपडपट्टीवासी एका अधोविश्वात जगतात. परंतु डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे त्यांचे प्रेरणास्थान आहे. त्यामुळेच जयंती उत्सवाचा जल्लोष चित्रपटात येतो. डीजे आहे. बेभान होऊन नाचणे आहे. त्याच वेळी एक ॲम्ब्युलन्स येते आणि काही कार्यकर्तेच त्या गाडीला ताबडतोब रस्ता करून देतात. हे जबाबदार वर्तन बघून हिंदी चित्रपटसृष्टीचा महानायक डॉ. बाबासाहेब आंबेडकर या महामानवासमोर हात जोडून उभा असल्याचे दृश्य आपणास दिसते. हा सकारात्मक संदेश संपूर्ण जगभर प्रदर्शित होणाऱ्या या चित्रपटातून नागराज मंजुळे आपणास देतो आहे. बॉलिवूडमध्ये प्रथमच चित्रपटाच्या माध्यमातून डॉ. आंबेडकरांना अभिवादन केले गेले आहे. ते श्रेय ठाम वैचारिक भूमिका असलेल्या नागराजचेच.

नागराजने अमिताभ बच्चन यांना चित्रपटाच्या कथेच्या गरजेप्रमाणे सर्वस्व ओतून अभिनय करायला भाग पाडलेले दिसते. कुठेही सुपरस्टार असण्याचे वलय आडकाठी ठरणार नाही, याची काळजी त्याने घेतली आहे. या चित्रपटातील दोन दृश्ये फार मार्मिक आहेत. एका दृश्यात झोपडपट्टीत फुटबॉल ग्राऊंड तयार करायचे चालले आहे. त्यामुळे एका भंगारवाल्याने अडवलेली जागा मोकळी करायला मुले भाग पाडतात. त्याच वेळी त्या मोकळ्या जागेत एक शेंदूर फासलेला देव आहे. त्याला हटवून दुसरीकडे ठेवायचे आहे. तरीही मनातून थोडे कचरणे आलेच. तेव्हा एक महिला पूजा करते. नंतर एक मुलगा पुढे येतो. शेंदूर माखलेला देव उचलतो, तर ती एका दुचाकीची पेट्रोल टाकी असते. सगळेच हसू लागतात आणि त्या आजवर पूजलेल्या देवाला भंगारात टाकतात.

दुसऱ्या एका प्रसंगात आदिवासी मुलीची पासपोर्ट मिळविण्यासाठी झालेली ससेहोलपट आली आहे. या आदिवासी मुलीकडे ना रहिवासी दाखला असतो, ना शाळा सोडल्याचा दाखला. तरीही अशिक्षित मुलगी आणि तिचा बाप यांची कागदपत्रे मिळवण्यासाठी चाललेली धडपड आपल्यालाच अंतर्मुख बनवते. आपली व्यवस्था माणसांचे जिवंत असण्याचे पुरावे कागदावर शोधते, याची खंत वाटत राहाते.

कोरोनापूर्वी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना पंतप्रधान मोदींनी भारतात बोलविले. तेव्हा ट्रम्पच्या नजरेस गलिच्छ झोपडपट्टी पडू नये म्हणून अहमदाबादच्या (गुजरात) रस्त्याकडेने भिंती उभारण्यात आल्या होत्या. नागराज अशा भेदरेषा ठळक करणाऱ्या भिंतींना पारदर्शक बनवतो आणि एका अप्रिय वाटणाऱ्या भारताचे दर्शन घडवितो. आपल्याला याची जाणीव करून देतो की, हेही आपलेच बांधव आहेत. आपण जे प्रतिज्ञेतून वारंवार उद्घोषिले होते, तसे बांधव. फक्त या मुलांची खंत इतकीच आहे की, 'आपुन को पहिले किसी ने पूछा नही की तू कैसा है?' म्हणूनच या वस्तीतला एक छोटा मुलगा निरागसपणे प्रश्न विचारतो, 'ये भारत क्या होता है?' या प्रश्नाचे उत्तर हवे असेल, तर एकदा हा चित्रपट पाहायलाच हवा. कारण नागराजने चित्रपटाच्या भाषेतून स्वतःला जे म्हणायचे आहे, ते अत्यंत प्रभावीपणे म्हटले आहे. आणि जगाच्या पटलावर एक नवा विषय चर्चेसाठी खुला केला आहे. Strictly prohibited to cross this wall, असे म्हणणाऱ्या भिंती अजून किती दिवस जपून ठेवायच्या, हे आता आपल्यालाच ठरवावे लागेल. फार पूर्वी कवी वामनदादा कर्डक यांनी आपल्या गीतात लिहिले आहे, 'ही भिंत पाडू या भेदाची'.

●



# ‘स्त्री जन्मत नाही, तर ती घडवली जाते’ हे सिद्ध करणारा ग्रंथः द सेकंड सेक्स

पुस्तक परिचय

यशवंती शिंदे
८८३०१७९१५७

“स्त्री व पुरुष हे मानवाच्या अस्तित्वाचे दोन महत्त्वाचे घटक. मानवाच्या वंशवृद्धीसाठी दोघांचीही सारखी गरज आहे. मानवाच्या अस्तित्वाला पुरुषांइतकीच स्त्रीची गरज आहे. मग स्त्रीला पुरुषासारखाच दर्जा असायला काय हरकत होती? असा तिला प्रश्न पडतो. स्त्री आणि पुरुष यांची शरीररचना सोडल्यास त्यांच्यामध्ये असा काय फरक दिसतो की, ज्यामुळे स्त्रीला दुय्यमत्व (सेकंड प्लेस) आणि पुरुषाला प्रधानत्व प्राप्त होते? खरे तर स्त्रीच्या शरीरामधून अपत्य प्राप्त होत असल्यामुळे स्त्रीला जास्त मानाचे स्थान असायला हवे होते; परंतु तसे होताना दिसत नाही.”

‘द सेकंड सेक्स’ हे सिमोन दि बोव्हुआर लिखित पुस्तक स्त्रीवादावरचे बायबल समजले जाते. हे पुस्तक तिने १९४६ ते ४८ या कालखंडात लिहिले. जरी या पुस्तकाची पार्श्वभूमी पाश्चात्त्य जगतातील अनुभवांवर, अभ्यासावर आधारलेली असली, तरी जगभरातील सर्वच स्त्रियांना ती आपल्या भावनांचे आणि परिस्थितीचे प्रतिबिंब वाटते. सिमोनच्या ‘द सेकंड सेक्स’ या पुस्तकाचा करुणा गोखले यांनी अतिशय सोप्या आणि प्रवाही भाषाशैलीमध्ये मराठी भाषेत अनुवाद केला असून, पद्मगंधा प्रकाशनाने तो प्रकाशित केला आहे. पुस्तकाची दोन खंडांत विभागणी केलेली आहे. पहिल्या खंडात स्त्रीविषयीचे वास्तव आणि मिथके यांबद्दलचे विश्लेषण येते, तर दुसऱ्या भागात आजचे स्त्रीजीवन याविषयीची मांडणी केलेली आहे. लिंगभेदांच्यापलीकडे जाऊन प्रत्येक व्यक्तीचे माणूसपण फुलायचे असेल, तर माणसानेच तयार केलेल्या लिंगनिष्ठ चौकटी, श्रेष्ठ-कनिष्ठतेच्या श्रेणी नेस्तनाबूत करणे गरजेचे आहे. त्यासाठी त्या मुळात का आणि कशा तयार झाल्या, हे समजून घ्यायला हवे. हे काम सिमोनच्या ‘द सेकंड सेक्स’ या पुस्तकाने साध्य केले आहे.

सिमोन ही फ्रान्समधील एक विचारवंत स्त्री. समाजात सर्वच पातळ्यांवर स्त्रियांना मिळणारी दुय्यमत्वाची वागणूक आणि त्यामागील शरीरशास्त्रीय, जीवशास्त्रीय, मानसशास्त्रीय आणि समाजशास्त्रीय अशा सर्व अंगांची चिकित्सा तिने केली. निसर्गचक्राचा व सामाजिक रूढी, परंपरा आणि संस्कारांचा स्त्रियांच्या आयुष्यावर कसकसा प्रभाव पडत जातो आणि स्त्री ‘घडत’ जाते, याचा या पुस्तकामध्ये सिमोनने ऊहापोह केला आहे. त्यासाठी सतत दोन वर्षे अथक परिश्रम घेऊन अभ्यासपूर्ण रीतीने ‘द सेकंड सेक्स’ या ग्रंथाची मांडणी केली आहे.

सिमोनचा जन्म १९०८ साली पॅरिसमध्ये एका सुसंस्कृत आईवडिलांच्या पोटी झाला. घरातील पहिलेच अपत्य असल्यामुळे ती अतिशय लाडाकोडात वाढली. वयाच्या अकराव्या वर्षापासूनच तिने लेखिका होण्याचे स्वप्न उराशी बाळगले होते. आपली स्वप्ने साकारण्यासाठी धडपडण्याची जिद्दही तिच्या अंगी होती. सिमोन तेरा-चौदा वर्षांची असताना एके दिवशी संध्याकाळी सर्वांची जेवणे आटोपून ती आणि तिची आई घरातील आवराआवर करत होत्या. सिमोन सिंकपाशी उभी राहून भांडी विसळत होती. काम करता करता सहज तिचे खिडकीबाहेर लक्ष गेले. त्या बाजूला त्या इमारतीतील सर्व फ्लॅटच्या स्वयंपाकघराच्या आणि झोपण्याच्या खोलीच्या खिडक्या उघडत होत्या. विशेष म्हणजे प्रत्येक स्वयंपाकघराच्या खिडकीत कुणी ना कुणी स्त्री घरकाम करताना दिसत होती. हे दृश्य पाहून सिमोन मनोमन चरकली! म्हणजे मोठी होऊन आपणही अशाच एखाद्या खिडकीत दिसणार? हे आपले भवितव्य असणार? त्यापेक्षा लग्न न केलेलेच बरे, असे तिने मनोमनी ठरवले.

सिमोन स्वतः आयुष्यभर अविवाहित राहिली. तिने इतर स्त्रियांप्रमाणे घरकाम, सजावट, मुलेबाळे यांत स्वतःचे सौख्य कधीच पाहिले नाही. उलट तिला आर्थिक स्वावलंबन, स्वतःचे निर्णयस्वातंत्र्य, प्रयोगशीलता, नेतृत्वक्षमता या गुणांचे आकर्षण वाटायचे. आपल्या निर्धारित ध्येयाच्या प्राप्तीसाठी अथक परिश्रमशील राहाण्याचा चिवटपणा तिच्या अंगी होता. ‘आर्थिक परावलंबित्व, विवाह, मातृत्व व घरकाम हे स्त्रीला गुलामगिरीत करकचणारे साखळदंड आहेत. आधुनिक स्त्रीने या शृंखलांचा पाश गळ्याभोवती पडू देऊ नये, असे तिने ठासून सांगितले. यामधून स्त्रीच्या आर्थिक स्वावलंबनाची गरज ती व्यक्त करते.

पुरुषांमध्ये रुजवल्या जाणाऱ्या स्वातंत्र्य, निर्णयक्षमता, तर्कनिष्ठता, आत्मविश्वास, बुद्धिवादीपणा या गुणांचे सिमोनला अतोनात कौतुक वाटायचे. स्त्रीमध्ये हे गुण रुजवले जात नाहीत. ‘स्त्री जन्मत नाही, तर ती घडवली जाते’, हे तिचे वाक्य जगप्रसिद्ध आहे. स्त्री आणि पुरुष यांना वेगवेगळ्या पद्धतींनी वाढविले जाते. स्त्रियांच्या मानसिक गुलामगिरीबद्दल सिमोन

स्त्रियांना दिल्या जाणाऱ्या शिक्षणाला दोष देते. मुलगा व मुलगी यांना वाढविण्यात केला जाणारा भेदभाव, त्याचे स्त्री व पुरुष या दोघांच्याही मानसिकतेवर होणारे दूरगामी परिणाम, स्त्रीच्या मानसिक दौर्बल्यामागची तिच्यावरील कुसंस्कारांची परंपरा यांचे विश्लेषण सिमोनने केल्यामुळेच स्त्री-समस्यांविषयी झोपी गेलेला समाज खाडकन जागा झाला. 'मुलींना निराळ्या प्रकारे वाढवा, म्हणजे मुलींमध्येही प्रयोगशीलता, धाडस, नेतृत्वगुण रुजतील. मुलींनी स्वतःच्या आयुष्याच्या नाड्या स्वतःच्या हातात घेतल्या की, स्त्री-पुरुष दोघेही एकाच पातळीवर येतील', असा सिमोनला विश्वास वाटतो.

स्त्री व पुरुष हे मानवाच्या अस्तित्वाचे दोन महत्त्वाचे घटक. मानवाच्या वंशवृद्धीसाठी दोघांचीही सारखी गरज आहे. मानवाच्या अस्तित्वाला पुरुषांइतकीच स्त्रीची गरज आहे. मग स्त्रीला पुरुषासारखाच दर्जा असायला काय हरकत होती? असा तिला प्रश्न पडतो. स्त्री आणि पुरुष यांची शरीररचना सोडल्यास त्यांच्यामध्ये असा काय फरक दिसतो की, ज्यामुळे स्त्रीला दुय्यमत्व (सेकंड प्लेस) आणि पुरुषाला प्रधानत्व प्राप्त होते? खरे तर स्त्रीच्या शरीरामधून अपत्य प्राप्त होत असल्यामुळे स्त्रीला जास्त मानाचे स्थान असायला हवे होते; परंतु तसे होताना दिसत नाही.

स्त्रीचे शरीर हे पुरुषांपेक्षा कमकुवत असते, या वस्तुस्थितीला एक जीवशास्त्रीय सत्य यापलीकडे फारसे महत्त्व नाही. जीवशास्त्रीय दृष्टिकोनातून विचार करताना स्त्री आणि पुरुष ही दोन भिन्नलिंगी व्यक्तिमत्त्वे असली आणि त्यांची शरीररचना भिन्न असली, तरीही निसर्गाने स्त्रीवर अन्यायच केला आहे, असे सिमोनला वाटते. प्राणिजगतात पुनरुत्पत्तीचे काम यांत्रिकपणे होत राहाते; परंतु मानवाच्या बाबतीत पुनरुत्पत्तीच्या प्रक्रियेवर सामाजिक रूढींचे नियमन असते. किशोरवयात स्त्रीच्या शरीरात होणारे बदल, दर महिन्यास येणारी मासिक पाळी, त्यानंतर येणारी बाळंतपणे, त्या काळात होणारे मानसिक बदल या गोष्टी खरे तर निसर्गाने स्त्रीवर लादल्या आहेत. या नैसर्गिक बदलांशी झुंजण्यातच स्त्रीचे आयुष्य निघून जाते. त्यामुळे स्त्रीचे आयुष्य नकारात्मकरीत्या बदलून जाते आणि ती त्यातच गुरफटून बसते.

दैनंदिन जीवनातल्या नीरस, कंटाळवाण्या, रटाळ रहाटगाडग्याच्या आयुष्यामध्ये स्वतःचा ठसा उमटविण्यासाठी, भरीव काम करण्यासाठी तिला वावच मिळत नाही. पुरुषाला जसा स्वयंनिर्णय घेऊन स्वतःचे कर्तृत्व सिद्ध करण्यासाठी अवकाश मिळतो, तसा स्त्रीला मिळत नाही. घरकाम, मुलांचा सांभाळ, घरातील जबाबदाऱ्या यांतच सतत ती अडकून पडते. दुसरी गोष्ट म्हणजे स्त्रीने केलेले घरातील प्रत्येक काम हे क्षणभंगुर असते. उदा. सकाळी छान स्वयंपाक केला, घर स्वच्छ, नीटनेटके आवरले तर ते फार काळ टिकत नाही. तेवढ्या वेळेपुरते त्याचे कौतुक होते; परंतु संध्याकाळी पुन्हा नवीन स्वयंपाक, नवीन तयारी या दुष्टचक्रात ती भरडली जाते. तिची दमछाक होते आणि या सर्वांत महत्त्वाचे म्हणजे या कामांबद्दल कसलाही मोबदला/वेतन मिळत नाही. स्त्रीच्या असहाय्यतेचे प्रमुख कारण आर्थिक परावलंबन हेच आहे, असे सिमोनला वाटते.

स्त्रीच्या जगण्याच्या बहुतेक क्षेत्रात तिचे दुय्यमत्व दिसून येते. लग्नानंतर पती आणि पत्नी दोघेही नोकरी करत असतील आणि एखाद्या प्रसंगी नोकरी सोडण्याची वेळ आलीच, तर ती पाळी स्त्रीची असते. नवऱ्याच्या करिअरला प्राधान्य दिले जाते. स्त्रीचे अर्थार्जन म्हणजे 'संसाराला हातभार' इतकीच त्याबद्दलची मानसिकता आपल्याला दिसून येते. शिवाय करिअर करायचे ठरलेच, तर घरकामापासून मात्र सुटका होत नाही. मग पुन्हा तिची तारेवरची कसरत सुरू होते.

विवाहाबद्दल मत मांडताना सिमोन म्हणते की, विवाहबंधन हे स्त्री व पुरुष या दोघांनाही जाचक होऊ द्यायचे नसेल, तर लग्न म्हणजे स्त्रीसाठी 'करिअर' समजणे थांबले पाहिजे, 'स्त्रिया आताच इतका त्रास देतात, तर स्वतंत्र झाल्यावर किती छळतील?' असा प्रश्न पुरुषांकडून केला जातो. परंतु या युक्तिवादामागील तर्कशास्त्रच चुकीचे असल्याचे सिमोन मांडते. स्त्री स्वतःच्या महत्त्वाकांक्षांचा बोजा पुरुषावर टाकते. कारण तिला स्वतःच्या आकांक्षा पुऱ्या करण्याची संधी दिली जात नाही. विवाह हे स्त्रीच्या आयुष्यात येणारे असे स्थित्यंतर आहे, ज्यामुळे तिचे आयुष्य आरपार बदलून जाते. जी सुरेख, सोनेरी आयुष्याची स्वप्ने तिने पाहिलेली असतात, ती केवळ भ्रामक मोहजाल असल्याचे तिला स्पष्ट होते आणि या नंतर आपले आयुष्य म्हणजे केवळ एक नीरस, कंटाळवाणे, असह्य जीणे बनून राहिल्याचे पाहून तिला खूप वाईट वाटते.

जीवनातील सर्व टप्प्यांवरती तिचे पुरुषावरील अवलंबित्व अधोरेखित होत राहाते. त्यामुळे आपण पुरुषाचे आश्रित आहोत, ही भावना तिच्या मनाला वेदना देते. सिमोनपूर्वी आणि तिच्यानंतर कुठल्याही स्त्रीने स्त्रियांविषयीचा इतका सखोल अभ्यास केला नाही. मुलीचे बालपण, किशोरावस्था, युवावस्था, विवाह, मातृत्व, प्रौढा आणि वयोवृद्धावस्था अशा सर्व अवस्थांमधील मानसिक व शारीरिक बदलांचे चित्रण या पुस्तकामध्ये सिमोनने केले आहे. स्त्रीला आत्मभान येऊन 'स्व'चे प्रकटीकरण साधायचे असेल, तर तिला तिच्या आवडीचे कार्यक्षेत्र निवडून त्यात काम करण्याची मुभा हवी. स्त्री-पुरुष समानता, स्त्री स्वातंत्र्य आणि स्त्री-पुरुषांमधील परस्पर सहकार्य यांची आस असणाऱ्या व्यक्तींना तसेच ज्या कुणाला स्त्रीच्या समस्यांविषयी आस्था वाटते, स्त्रीच्या अवस्थेमध्ये सकारात्मक बदल व्हावा असे वाटते, त्या प्रत्येकासाठी 'द सेकंड सेक्स' हे पुस्तक दीपस्तंभ ठरावे.

द सेकंड सेक्स
सिमोन द बोव्हुआर
अनुवाद : करुणा गोखले,
पद्मगंधा प्रकाशन, पुणे.
एकूण पृष्ठे : ५५९, किंमत : ६००/-

●



# विविध उपक्रमांच्या वाटेवर

अनिल शोभना वसंत
९८२३२८०३२७

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचा तीस वर्षांचा आलेख पाहाता, ही चळवळ यशस्वी होण्यामागे समितीने राबविलेल्या विविध उपक्रमांचे योगदान फार मोठे आहे. एक कृतिशील चळवळ म्हणून महा.अंनिसकडे पहिले जाते. सतत कोणत्या ना कोणत्या कार्यक्रमाच्या निमित्ताने चळवळ लोकांच्यात राहिली म्हणून व्यापक झाली. चळवळीचे विचार जनमानसात पोहोचावे म्हणून समितीने अतिशय कल्पकतेने उपक्रमांचे आयोजन केले. कोरोना संकटामुळे लॉकडाऊनच्या काळातसुद्धा विविध उपक्रम विभागातर्फे ऑनलाईन पद्धतीने उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. लॉकडाऊन संपल्यावर ऑनलाईन व ऑफलाईन या दोन्ही पद्धतीने विविध उपक्रम शाखा-शाखांत जोमात राबविले गेले. एप्रिल २०२२ या महिन्यात सर्व शाखांमध्ये सामाजिक समता सप्ताह हे महत्त्वाचे अभियान राबवायचे आहे.

**सामाजिक समता सप्ताह:**

११ एप्रिल रोजी महात्मा फुले जयंती आणि १४ एप्रिल रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती आहे. महात्मा फुले यांनी चातुर्वर्ण्यव्यवस्था, धर्माची गुलामगिरी याला कृतिशील विरोध केला. सत्यशोधकी विवाह पद्धत निर्माण केली. शोषणप्रधान समाजव्यवस्था मुळासकट उखडून फेकल्याशिवाय स्वातंत्र्य, समता, बंधुतादी शाश्वतमूल्यांवर आधारित समाज उभारताच येणार नाही, असे महात्मा फुले यांचे ठाम मत होते. त्यामुळे जुन्या समाजरचनेला पुष्टी देणाऱ्या अंधश्रद्धांचा त्यांनी पर्दाफाश केला होता. आराधना, भक्ती, पूजा, नैवेद्य, नवस, जप-अनुष्ठान यांचा त्यांनी निषेध केला होता. कर्मकांडांना जोतिरावांचा विरोध असण्याचे एक कारण ती निरर्थक आहे हे तर होतेच; पण तितकेच गंभीर दुसरे कारण असे की, ती कर्मकांडे मानवमात्रांत फूट पाडतात.

फलज्योतिषाचा फोलपणा सिद्ध करताना ते म्हणतात, 'आकाशातील ग्रह भूमंडळावरील मानव स्त्री-पुरुषास पीडा देतात, याला कोणताही शास्त्रीय आधार नाही.' बालकाच्या जन्मवेळी आकाशात असलेल्या ग्रहदशेनुसार बालकाच्या नावाची मुळाक्षरे ठरवणे आणि जन्मपत्रिका मांडून त्यांच्या भावी आयुष्यात संभावणाऱ्या लाभांचे भाकीत वर्तवणे हा प्रकार जोतिरावांना शुद्ध ठकबाजीचा वाटत होता. मंत्रतंत्र, चमत्कार करणारे भोंदू मग ते ब्राह्मण असो की ब्राह्मणेतर असोत जोतिरावांनी त्यांना सारखाच विरोध केला. प्रारब्ध, पापपुण्य, स्वर्ग-नरक, सद्‌गती-दुर्गति, कर्मविषयक कल्पनांमधील फोलपणा पटवून देताना माणसाच्या ऐहिक जीवनाचे प्राधान्य जोतिराव नेहमीच अधोरेखित करीत. महात्मा फुले यांनी सदोदित मानवतावादी, समतावादी समाज-माणूस घडवण्याचा प्रयत्न केला. भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, थोर तत्त्वचिंतक बाबासाहेब आंबेडकर यांनी जातीअंताची लढाई लढली. शोषितांना हक्क मिळावे यासाठी आयुष्यभर संघर्ष केला. भारतीय संविधानाचे शिल्पकार म्हणून संविधानिक शाश्वती आणि सुरक्षेचे नागरी स्वातंत्र्य, धर्मस्वातंत्र्य, अस्पृश्यतेचे उच्चाटन आणि स्त्रियांच्या आर्थिक व सामाजिक अधिकाराविषयी त्यांनी आवाज उठविला. भारतात लोकशाही आणि सामाजिक न्याय प्रस्थापित व्हावा यासाठी त्यांनी अविरत प्रयत्न केले. अस्पृश्यता, जातिभेद व स्त्रीदास्य यांना पावित्र्य प्रदान करणारा तत्त्वविचार व व्यवहार याविरोधात संघर्षाची भूमिका घेऊन त्यांनी जनलढेही उभारले. महाडचा चवदार तळ्याचा सत्याग्रह (१९२७), काळाराम मंदिर सत्याग्रह (१९३०-३५), मुखेडचा पांडवप्रताप सत्याग्रह (१९३२) पर्वती सत्याग्रह अशा लढ्यांतून त्यांनी धर्मश्रद्धा व अंधश्रद्धा यासंबंधीच्या चिकित्सेच्या लाटा भारतभर उसळवीत ठेवल्या. डॉ. आंबेडकर यांनी आत्मा, अवतारवाद, चमत्कारवाद, वेदप्रामाण्य नाकारले. अंधश्रद्धा पाळणारे लोक अशिक्षित असतात, असे ते ठामपणे म्हणत.

या दोनही महामानवाच्या जयंतीनिमित्त त्यांचे समतेचे आणि अंधश्रद्धा निर्मूलनाचे विचार जनमानसात पोहोचविण्यासाठी सामाजिक समता सप्ताह आयोजित करीत आहोत. यासाठी शाखा-शाखांमध्ये ११ एप्रिल ते १४ एप्रिल दरम्यान महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या समाजकार्याविषयी व्याख्यान, वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा आदींचे आयोजन करावे. 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर' चित्रपट प्रोजेक्टरद्वारे दाखवून त्यावर चर्चा घडवून आणावी.

**राष्ट्रसंत तुकडोजी महाराज जयंती:**

३० एप्रिल रोजी महाराष्ट्रातील एक आधुनिक संत, भक्त, कवी व समाजसुधारक राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांची जयंती आहे. अंधश्रद्धा निर्मूलन व जातिभेदाच्या निर्मूलनासाठी त्यांनी भजनांचा आणि कीर्तनाचा प्रभावीपणे वापर करून जनप्रबोधन

केले. आत्मसंयमनाचे विचार त्यांनी 'ग्रामगीता' या काव्यातून मांडले. मराठी व हिंदी भाषांमध्ये त्यांनी काव्यरचना केली. स्वातंत्र्यलढ्यात आणि राष्ट्रकार्यात त्यांनी हिरिरीने सहभाग घेतला. स्वतःच्या कार्यामुळे ते राष्ट्रसंत बनले. कुटुंबव्यवस्था, समाजव्यवस्था आणि राष्ट्रव्यवस्था स्त्रीवर अवलंबून असते. त्यामुळे स्त्रीला अज्ञानात व दास्यात ठेवणे अन्यायकारक असल्याचे ते ठामपणे प्रतिपादन करीत.

तुकडोजी महाराजांच्या कार्याची ओळख व्हावी यासाठी शाखा पातळीवर त्यांचे अंधश्रद्धा निर्मूलनाचे कार्य व व्यसनमुक्ती मोहीम याबाबत व्याख्यान आयोजित करावे. ग्रामगीता, भारुडे, अभंग, पोवाडे यांचे प्रभावीपणे सादरीकरण करून जनजागृती करावी. तर चला, आपण विविध उपक्रम यशस्वी करून आपल्या शाखेला, जिल्ह्याला आणि पर्यायाने समितीला मजबूत करत विवेकाचा आवाज बुलंद करूया. आपण आयोजित केलेल्या कार्यक्रमाची संपूर्ण माहिती, फोटोसहित समितीच्या विविध उपक्रम विभागाकडे कार्यक्रम संपन्न झाल्यानंतर त्वरित पाठवावी.

(लेखक महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या विविध उपक्रम विभागाचे राज्य कार्यवाह आहेत.)

●

**अंतरीची सल** (पृष्ठ क्र. १९ वरुन...)

इराक-इराण-अमेरिका-व्हिएतनाम, सिरिया आणि आता युक्रेन-रशिया अशी अनेक महायुद्धे आणि अमर्याद मानवी संहार होतो. संपत्तीनाश, पर्यावरणाचा नाश, नीतीमूल्यांची मोडतोड, एकंदरीत विश्वव्यापी विध्वंस केला जातो. घरी सत्तासंघर्ष, दडपशाही व अविवेकी विचार-धारणांमुळे घराघरातून हिंसाचार बोकाळत जातो. स्त्रिया, मुले, वृद्ध, पुरुष यातील साऱ्या दुर्बल घटकांची परिस्थिती बिकट होताना दिसते. आपल्या मनातील विवेक इतका दुर्बल कसा की अविवेक त्यावर सहज विजय मिळवून जातो?

आपल्याच नव्हे; तर अनेक चळवळीतील कार्यकर्त्यांना ऐन उमेदीतही असे अनेक अनुभव येत राहातात. कधी मन उदास होते, थकवा येतो, अवसान गळून जाते, उत्साह जातो. वाटते, आजवरचे सारे व्यर्थच गेले. वाटत असते, विवेक आपल्याला कळलाय, इतरांना समजावून सांगूया. आपली माहिती पुरेशी आहे. मग काही अनुभव येतात, ते आपल्या आजवरच्या या समजाला धक्का देतात. माणसे दिसतात वेगळी, वागतात अनाकलनीय. मैत्र दुरावते, घट्ट अनुबंध विस्कटतात, निर्व्याज स्नेहबंध शायलॉकसारखे पाउंड ऑफ फ्लेश वसूल करतात. त्यातून सावरायला खूप कठीण जाते. कोण चुकले, काय चुकले याचा न्यायनिवाडा करताना मुळात मैत्रीचे काय झाले? हा प्रश्नच त्रयस्थ ठरून क्षितिजापार होत जातो. त्याचे असे भर मैफिलीतून उठून जाणे मनाला चिरत जाते. आपली चळवळ विवेक, नीती यावर आधारित निर्भय मानवांची चळवळ आहे, असे आपण अभिमानाने सतत सांगत असतो. आपण वेळोवेळी आत्मपरीक्षण करीत राहिलो, तर मनाच्या अग्रभागी स्थित विवेक मनाच्या कोनाड्यात फेकला जाणार नाही. तसे होऊ नये अशी काळजी आपण घ्यायला हवी.

(लेखक महा.अंनिसचे जेष्ठ कार्यकर्ते आणि प्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ आहेत.)

●

**विचारधन**

अंधश्रद्धेच्या आहारी जाणं ही गोष्ट माणसाचं माणूसपण संपवून टाकणारी आहे अंधश्रद्धेचा आधार घेणं हा माणसाला समजून घेण्याचा प्रकार आहे तो आधार तुमचं व्यक्तिमत्व जेवढे कणखर बनत जाईल त्या प्रमाणामध्ये कमी होत जाईल.

– शहीद डॉ.नरेंद्र दाभोलकर



# महा. अंनिसची खबरबात

विशाल विमल
७२७६५५९३१८

**राष्ट्रीय विज्ञानदिनी महाअंनिसचे शंभरहून अधिक कार्यक्रम:**

राष्ट्रीय विज्ञान दिनाच्यानिमित्ताने (२८ फेब्रुवारी) महाराष्ट्र अंनिसच्या पुढाकाराने महाराष्ट्रभरात एकाच दिवशी शंभर हुन अधिक कार्यक्रम झाले आहेत. व्याख्यान, चमत्कार सादरीकरण, आकाशदर्शन पोस्टर प्रदर्शन असे कार्यक्रमाचे स्वरूप होते.

**नंदुरबार:** शहादा शाखेने गटशिक्षणाधिकारी यांच्या माध्यमातून ४५ शाळांमधील प्रत्येकी ५ विद्यार्थी व १ विज्ञान शिक्षक यांचे प्रशिक्षण घेऊन या सर्व शाळांत कार्यक्रम घडवून आणला. त्यांना सहभाग प्रमाणपत्र दिले. तसेच, महिलांसाठी स्वयंपाक घरातील विज्ञान या विषयावर व्याख्याने घेतली आहेत.

**मुंबई :** बोरिवली येथील गणपत पाटीलनगर येथे अंधश्रद्धा निर्मूलन व चमत्कार सादरीकरण कार्यक्रम झाला. यश सुर्यवंशी, विजय परब, भास्कर सदाकळे यांनी पुढाकार घेतला.

**कोल्हापूर :** महाराष्ट्र अंनिसने आयोजित केलेल्या ऑनलाईन वक्ता प्रशिक्षण शिबिरामध्ये महेंद्र नाईक (पनवेल), सुधीर कुंभार (कराड), विनायक सावळे (शहादा) आणि सुशीला मुंडे (मुंबई) यांनी कार्यकर्त्यांना वैज्ञानिक दृष्टिकोन मांडणीबद्दल मार्गदर्शन केले. प्रशिक्षित कार्यकर्त्यांनी देशभूषण हायस्कूल येथे शहरातील प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांचे वैज्ञानिक दृष्टिकोन प्रशिक्षण घेतले. या दोन्ही शिबिरांमध्ये मिळून शहरातील १५० हून अधिक शिक्षक उपस्थित होते. यावेळी देशभूषण हायस्कूलचे मुख्याध्यापक श्री. गाट, महापालिकेच्या प्राथमिक शिक्षण समितीचे अधिक्षक बाळासाहेब कांबळे, सुधाकर सावंत उपस्थित होते.

मुरगूड येथे कागल तालुक्यातील ७० विज्ञान शिक्षकांचे प्रशिक्षण घेण्यात आले. यावेळी कागल पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी डॉ. बी. बी. कमळकर, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते प्रा. डी. डी. चौगुले, मुरगूड शाखा कार्याध्यक्ष भीमराव कांबळे, अविनाश चौगुले, निवास फराकटे, बबन बारदेस्कर, सचिन सुतार, सरिता पाटील उपस्थित होते.

उदाजीराव अध्यापक विद्यालय, गारगोटी येथे भुदरगड तालुक्यातील माध्यमिक व प्राथमिक शाळांतील १२५ विज्ञान शिक्षकांचे प्रशिक्षण शिबिर झाले. यावेळी भुदरगड पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी दीपक भिंगाने, भुदरगड शाखा कार्याध्यक्ष डॉ आनंद पाटील, शिक्षण विस्तार अधिकारी प्रबोध कांबळे, स्मिता कांबळे, विकास सावंत उपस्थित होते. या सर्व शिबिरांमध्ये अंनिसचे राज्य सरचिटणीस कृष्णात स्वाती, जिल्हा प्रधान सचिव हर्षल जाधव, जिल्हा युवा सहभाग कार्यवाह गौतम कांबळे आणि मुरगूड शाखा प्रधान सचिव समीर कटके यांनी शिक्षकांशी संवाद साधला.

करवीर शाखेच्यावतीने प्रबुध्द भारत हायस्कूल, लक्षतिर्थ वसाहत, कोल्हापूर येथे पूजा देसाई यांनी चमत्कार सादरीकरणासह वैज्ञानिक दृष्टिकोन विषय मांडला. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक संजय अर्दाळकर आणि राहुल सुतार उपस्थित होते.

न्यु इंग्लिश स्कूल सांगवडेवाडी येथे मुक्ता निशांत यांनी चमत्कार सादरीकरणासह वैज्ञानिक दृष्टिकोन या विषयावर विद्यार्थ्यांशी संवाद साधला.

कोल्हापूर शहर शाखेच्यावतीने सुसंस्कार हायस्कूल कदमवाडी येथील कार्यक्रमात गौतम कांबळे यांनी कार्यक्रम केला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून किरण गवळी, संस्थेचे संस्थापक मिरासाहेब मगदूम उपस्थित होते.

पन्हाळा शाखेच्यावतीने नवनाथ हायस्कूल, पोहाळे येथे आयोजित कार्यक्रमात राहुल सुतार व रामदास देसाई यांनी वैज्ञानिक दृष्टिकोन या विषयावर विद्यार्थ्यांशी संवाद केला. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक आणि महाराष्ट्र अंनिस पन्हाळा शाखेचे अध्यक्ष चंद्रकांत निकाडे हे अध्यक्षस्थानी होते.

मुरगूड शाखेच्या वतीने महात्मा फुले विद्यालय आणूर, विद्या मंदिर मळगे खुर्द, पिंपळगाव बुद्रुक विद्यालय पिंपळगाव येथे सारिका पाटील यांनी वैज्ञानिक दृष्टिकोन या विषयावर विद्यार्थ्यांशी संवाद साधला.

शाहुवाडी शाखेच्या वतीने बालदास महाराज माध्यमिक विद्यालय, शिरगाव आणि नागेशकर विद्यालय,वारुळ येथे प्रा. प्रकाश नाईक, अजिंक्य बेर्डे, प्रा. निलेश घोलप यांनी विद्यार्थ्यांशी वैज्ञानिक दृष्टिकोन या विषयावर संवाद साधला.

शिरोळ शाखेच्यावतीने कन्या विद्यामंदिर अब्दुललाट येथे विनायक सुनिता अशोक, सार्शा कुंभार यांनी विज्ञानोत्सव घेतला.

कागल शाखेच्यावतीने हरी आवळे यांनी ऊस तोडणी

कामगार मुलांची शाळा, कागल येथील विद्यार्थ्यांशी वैज्ञानिक दृष्टिकोन या विषयावर संवाद साधला.

चंदगड शाखेच्या देवानंद जगधने यांनी धनंजय जुनियर कॉलेज नागनवाडी येथील विद्यार्थ्यांशी वैज्ञानिक दृष्टिकोन या विषयावर संवाद साधला.

**वर्धा :** विज्ञानदिनानिमित्त तलमले औद्योगिक प्रशिक्षण संस्थेने कार्यक्रम आयोजित केला होता. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे प्राचार्य हरिश बिजेकर होते. राज्यप्रदान सचिव गजेंद्र सुरकार यांनी मार्गदर्शन केले. राज्यपदाधिकारी सारिका डेहनकर होत्या. कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रा. प्रितेश म्हैसकर यांनी केले.

महाराष्ट्र अंनिस वर्धा जिल्ह्याच्यावतीने आयोजित केलेल्या चमत्कार प्रशिक्षण कार्यशाळेत ज्येष्ठ नागरिकांनी प्रशिक्षण घेतले. वर्धा येथील बजाज चौकात जिल्हा प्रधानसचिव सचिन मेश्राम यांनी चमत्काराचे सादरीकरण केले.

**कल्याण :** मातोश्री रमाबाई आंबेडकर विद्यालयात राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमास विद्यार्थी, शिक्षक आणि अन्य नागरिक मिळून सुमारे दीडशे लोक उपस्थित होते. 'अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका' या मासिकाचे कार्यकारी संपादक उत्तम जोगदंड यांनी प्रबोधन कार्यक्रम सादर केला. त्यांनी वैज्ञानिक प्रयोग करून दाखविले. कार्यक्रमाच्या शेवटी या चमत्कारांमागील विज्ञान किंवा हातचलाखी सांगून त्याची रहस्ये सांगितल्यावर विद्यार्थी खूप चकित झाले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महादेव सोनावणे, मीनाक्षी सोनावणे, जी. टी. पवार यांनी मेहनत घेतली.

**यवतमाळ :** वैज्ञानिक प्रयोगाचे प्रात्यक्षिक व प्रबोधन कार्यक्रम महाराष्ट्र अंनिसचे राज्य युवा सहकार्यवाह रुपेश वानखेडे यांनी केला. धनगरवाडी – मेंढला (ता. कळंब, जि. यवतमाळ) येथील अहील्याबाई होळकर नगर येथे हा कार्यक्रम झाला.

**इस्लामपूर :** महाराष्ट्र अंनिस आणि कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, यांच्यातर्फे व्याख्यान आणि आकाशदर्शनाचा कार्यक्रम झाला. राज्य प्रधान सचिव संजय बनसोडे यांनी वैज्ञानिक दृष्टिकोन सामाजिक चळवळीत तरुणांनी सहभाग घ्यावा, असे आवाहन केले. ज्येष्ठ खगोल अभ्यासक प्रा. नितीन शिंदे यांनी नक्षत्र, रास, ग्रह, तारे, विविध खगोलीय संकल्पना याबाबत सखोल मार्गदर्शन केले. प्रा. प्रताप पाटील, भूषण जाधव यांनी दुर्बिणीच्या साहाय्याने ग्रह ताऱ्यांची माहिती दिली. यावेळी अनिल पाटील, डॉ. सुदाम माने, प्रा. एल. डी. पाटील, डॉ. राहुल नाकील आदी उपस्थित होते. विजय व जगन्नाथ नांगरे यांनी प्रबोधनगीते सादर केली. प्रज्ञा विभुते, केतन मंडले, प्राजक्ता विभुते, चंद्रकांत कोळी यांनी संयोजन केले.

येथील मालती वसंतदादा पाटील कन्या प्राथमिक शाळेत वैज्ञानिक दृष्टिकोन याविषयी संजय बनसोडे यांचे व्याख्यान झाले. मुख्याध्यापिका इरफाना संदे यांनी स्वागत केले. कागदाचा वापर करून काही प्रात्यक्षिके करून घेतली. तसेच वैज्ञानिक प्रयोग करुन दाखवले. कृती गीते आणि बालगीते सादर केली गेली. प्रोजेक्टर वर व्हिडीओ क्लिप्स दाखवत वेगवेगळ्या संकल्पना मांडण्यात आल्या.

**बावची**ः ता. वाळवा येथील शिवाजी हायस्कूल येथे संजय बनसोडे यांनी सहप्रयोग व्याख्यान दिले. मुख्याध्यापक डी. एस. पाटील कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. आर.जी.माळी, एस.व्ही. भोई, एस.एस. कोठावळे यांनी संयोजन केले. सुनील पुजारी यांनी स्वागत केले. राजेंद्र पांढरबळे यांनी सूत्रसंचालन केले. भास्कर पाटील यांनी आभार मानले.

**मसूचीवाडी**ः (ता. वाळवा) येथील तुकाराम सावळा कदम विद्यामंदिरात संजय बनसोडे यांचे व्याख्यान झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच राधिका पाटोळे होत्या. मुख्याध्यापिका एस. ए. पाटील यांनी प्रास्ताविक केले. उपसरपंच शांताराम कदम, सुहास कदम, शंकर कदम, संभाजी पवार, विकास कदम आदी मान्यवर उपस्थित होते. बजरंग संकपाळ यांनी संयोजन केले.

**अलिबाग :** महाराष्ट्र अंनिसच्या अलिबाग शाखेने चमत्कार सादरीकरण व व्याख्यानाचे आयोजन केले होते. यावेळी राज्य सरचिटणीस नितीनकुमार राऊत यांनी प्रात्यक्षिके दाखवून माहिती दिली.

**शाहूवाडी :** प्रबुद्ध हायस्कूल येथे तांब्यात भुत बंद करणे चमत्कार सादर करताना कार्यकर्ती पूजा देसाई

**अघोरी उपचार करणाऱ्या शेख बाबाला अटक**

**लातूर :** खलंग्री, (लातूर) येथील भोंदूबाबा हकानी इस्माईल शेख याच्या विरोधात किनगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. सैलानी बाबांच्या आशिवादाने तो लोकांचे असाध्य आजार, समस्या सोडविण्याचे दावे करत होता. समस्या सोडविण्याच्या नावाखाली लोकांची आर्थिक फसवणूक करत होता. या बाबाच्या फसवणुकीमुळे आत्महत्येपर्यंत गेलेल्या व्यक्तीला लातूर शाखेच्या कार्यकर्त्यांनी वाचविले आहे. जिल्हा पोलिस अधीक्षक निखिल पिंगळे, अप्पर पोलीस अधीक्षक अनुराग जैन, उपजिल्हा पोलीस अधीक्षक बलराज रंजिले, पोलीस निरीक्षक चिदंबर कामठेवाड, एपीआय शैलेश बंकवाड, पीएसआय राजेश जाधव, मुरलीधर मुरकुटे यांनी गुन्हा दाखल करण्यात पुढाकार घेतला. महाराष्ट्र अंनिसचे प्रधानसचिव माधव बावगे, राज्य पदाधिकारी रुक्साना मुल्ला, रणजित आचार्य, सुधीर भोसले, हनुमंत मुंडे आदी कार्यकर्त्यांनी कारवाईसाठी पुढाकार

घेतला.

**पुणे :** जागतिक महिला दिनानिमित्त शिवाजीनगर पुणे शाखेने लिंगसमभाव कार्यशाळा आयोजित केली होती. अंनिस आणि समविचारी संस्था संघटनांचे ४१ कार्यकर्त्यांनी प्रशिक्षण घेतले. महिला सर्वांगीण उत्कर्ष मंडळाच्या (मासुम) जयश्री नलगे, योगेश धेंडे यांनी प्रशिक्षण घेतले. शिबिरामध्ये राज्य पदाधिकारी अतुल सवाखंडे, विशाल विमल, जिल्हा कार्याध्यक्ष संजय बारी, शिवाजीनगर शाखा अध्यक्ष वनिता फाळके, कार्याध्यक्ष विनोद खरटमोल, सचिव श्याम येणगे, सहसचिव अरिहंत अनामिका, आकुर्डी शाखा सचिव स्वप्नील वाळुंज, शाखांच्या विभागांचे कार्यवाह, सहकार्यवाह यांच्यासह ४१ कार्यकर्ते सहभागी होते.

**खोटेनाटे उपचार करणाऱ्या महिलेला अटक**

**भंडारा :** पवनी तालुक्यातील ईटगाव पुनर्वसन येथील महिला मैनाबाई मारबते ही अंगात देवीदेवता आणल्याचे भासवून लोकांवर खोटेनाटे उपचार करून फसवत होती. महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती जिल्हा शाखा भंडाराकडे तक्रार प्राप्त झाल्यानंतर या ढोंगी महिलेचा भंडाफोड करण्यात आला. या प्रकरणी अड्याळ पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करून या ढोंगी महिलेचा अटक करण्यात आली आहे. अड्याळ पोलीस ठाणे अंतर्गत येणाऱ्या ईटगाव (पुनर्वसन) येथे गत अनेक वर्षांपासून स्वतःच्या अंगात वाघीण, भोलेबाबा या देवीदेवता आल्याचे भासविणारी मैनाबाई मारबते ही दरबार भरवून रोगमुक्त होण्यासाठी राख, लिंबू, तंत्र मंत्र करून देत होती. जादूटोणा करणाऱ्याचे नाव सांगून समाजात भांडणे निर्माण करून आर्थिक फसवणूक करीत असल्याची माहिती महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती जिल्हा शाखा भंडाऱ्याकडे प्राप्त झाली होती.

**नवी मुंबईत महाअंनिसचे विविध उपक्रम :**

**नवी मुंबई :** रबाळे येथील ज्युपिटर इंडस्ट्रियल वर्क येथे आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त महिला व पुरुष कामगारांचे एक तासाचे प्रबोधन सत्र आयोजिण्यात आले होते. या कार्यक्रमामध्ये आर्थिक स्वावलंबन, स्त्री पुरुष समानता, अंधश्रद्धा निर्मूलन इत्यादी विषयांवर संवाद साधण्यात आला. कर्मचारी म्हणून आपण आपल्या मागण्याबद्दल सतर्क असावे, हक्कांची जाणीव असावी इत्यादी मुद्दे राज्य प्रधान सचिव सुशीला मुंडे यांनी मांडले तर काही बुवाबाजी संदर्भातील प्रात्यक्षिके राज्य पदाधिकारी मच्छिन्नद्रनाथ मुंडे यांनी सादर केली.

**नवी मुंबई :** नेरूळ येथील शिक्षण प्रसारक विद्यालयात महाराष्ट्र अंनिसच्या नवी मुंबई जिल्हा शाखेने 'महिला आणि अंधश्रद्धा' या विषयावर व्याख्यान आयोजित केले होते. विद्यालयाचे संस्थापक अध्यक्ष नामदेव भगत यांनी अंधश्रद्धेतून स्त्रियांचे शोषण होते, त्यांचे प्रबोधन व्हावे म्हणून व्याख्यानाचे आयोजित केल्याचे सांगितले. भारती अनारे यांनी प्रास्ताविक केले. राज्यपदाधिकारी मच्छिंद्रनाथ मुंडे यांनी चमत्काराचे व अतिंद्रिय शक्तीचे प्रयोग सादर केले.

**नवी मुंबई :** जागतिक महिलादिनी महाराष्ट्र अंनिसने कष्टकरी महिलांशी संवाद या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. कार्यक्रमाचे आयोजन नवी मुंबई जिल्हा शाखा व स्त्री मुक्ती संघटना यांनी केले होते. हा कार्यक्रम तुर्भे येथील इंदिरा नगर येथे पार पडले. संवाद सत्राची सुरूवात मिनाक्षी पाटील यांच्या प्रबोधनपर गाण्याने झाली. प्रधानसचिव सुशिला मुंडे यांनी संवादातून महिलांना प्रेरणा दिली. संवाद सत्राला भारती अनारे, नंदकिशोर तळाशीलकर, भास्कर सदाकाळे, विजय परब व अशोक निकम यांनी सक्रिय सहभाग नोंदवला.



**नवी मुंबई :** महाराष्ट्र अंनिस नवी मुंबई जिल्हा शाखा व महाराष्ट्र महिला परिषद यांनी सावित्रीबाई फुले स्मृतीदिनानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन केले होते. कोपरखैरणे येथील महाराष्ट्र महिला परिषदेच्या, 'श्रमिक' कार्यालयात कार्यक्रम झाला. राज्य प्रधानसचिव सुशिला मुंडे यांनी सावित्रीबाई फुले यांच्या बंडखोरवृत्तीमुळे महिलांच्या शिक्षणाचा मार्ग सुरू झाल्याचे सांगितले. मच्छिद्रनाथ मुंडे, नंदकिशोर तळाशिलकर यांनी विविध चमत्काराची प्रात्यक्षिके दाखवून त्या मागील विज्ञान उलगडून दाखविले. नीला लिमये यांनी कार्यक्रमाचा समारोप केला. कार्यक्रमाला प्रकाश माळवे, गजानंद जाधव व उत्तम रोकडे यांनी सहभाग नोंदवला.

**जळगाव :** आंतरराष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त विद्यार्थी विज्ञान महोत्सवाचे आयोजन महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती जळगाव जिल्हा आणि मराठी विज्ञान परिषद जळगाव यांनी केले होते. विविध विद्यालयात कार्यशाळा घेण्यात आल्या. महाराष्ट्र अंनिस जिल्हा कार्याध्यक्ष दिगंबर कट्यारे, मराठी विज्ञान परिषदचे सचिव दिलीप भारंबे, रविंद्र सिंह पाटील आणि शशिकांत नेहेते यांनी चमत्कार सादरीकरण आणि मार्गदर्शन

केले. सुमारे दोन हजार विद्यार्थ्यांना प्रबोधन करण्यासाठी सदर अभियान उपयुक्त ठरले आहे. विशेष म्हणजे विद्यार्थ्यांनी चमत्कार सादरीकरण करण्यासाठी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदविला.

**जळगाव :** वरखेड ता.चाळीसगाव येथे सर्वोदय विद्यालय यांचे एन.एस.एस.शिबीरात रविंद्र चौधरी यांनी अंधश्रद्धा निर्मूलन व चमत्कार सादरीकरण या विषयावर व्याख्यान व विविध प्रकारचे चमत्कार सादरीकरण करुन त्यामागील विज्ञान स्पष्ट केले. कार्यक्रम प्रसंगी विद्यालयाचे मुख्याध्यापक शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते. चाळीसगाव शाखेचे कार्याध्यक्ष ॲड. संदीप सोनार यांनी विद्यार्थ्यांना अंनिसबदल माहिती दिली.




**जळगाव :** महाराष्ट्र अंनिस जळगाव जिल्हा शाखा व मराठी विज्ञान परिषद जळगाव यांनी शाळांमध्ये कार्यशाळा घेतली. वैज्ञानिक दृष्टिकोन म्हणजे कार्यकारणभाव समजणे ही संकल्पना विद्यार्थ्यांकडून वदवून घेताना विविध चमत्कार व प्रयोगातून विज्ञानाद्वारे प्रबोधन करण्यात आले. कार्यक्रमात जिल्हा कार्याध्यक्ष दिगंबर कट्यारे, मराठी विज्ञान परिषद जळगावचे सचिव दिलीप भारंबे, रवींद्रसिंह पाटील, शशिकांत नेहेते यांनी मानवसेवा विद्यालय (खोटेनगर), खुबचंद सागरमल विद्यालय (शिवाजीनगर), बाहेती विद्यालय (महाबळ), स्वामी समर्थ विद्यालय (पिंप्राळा), शारदा माध्यमिक विद्यालय (सुप्रीम कॉलनी), नूतन मराठा महाविद्यालय (जळगाव), सौ. सु. गि. पाटील विद्यालय (भडगाव) याठिकाणी कार्यशाळा घेतली. विद्यार्थ्यांनी चमत्कार सादरीकरण करण्यासाठी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला.

**अकोला :** खडकी विभागातील संतनगर येथे छत्रपती शाहू यंग ब्रिगेड, वर्हाड विकास बहुउद्देशिय संस्था व महाराष्ट्र अंनिसच्या अकोला शाखेने जिल्ह्यातील विविध क्षेत्रात कर्तृत्ववान, दैदिप्यमान कार्य करणार्या महिलांचा जागतिक महिला दिनी यथोचित सन्मान मान्यवरांचे हस्ते करण्यात आला. कार्यक्रमाचे




अध्यक्षस्थानी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे राज्य उपाध्यक्ष महादेवराव भुईभार तर उद्घाटक म्हणून खदान पोलीस स्टेशनचे ठाणेदार श्रीरंग सनप होते. यावेळी महाराष्ट्र अंनिसचे राज्य सरचिटणीस बबनराव कानकिरड, जिल्हा कार्याध्यक्ष प्रा. संजय तिडके, नगरसेवक मंगेश काळे, प्रवीण हुंडीवाले, सविता शेळके, विद्या राणे, साहित्यिक पंजाबराव वर, रोशन गायकवाड होते. कर्तृत्ववान महिला म्हणून संजना बोरकर, दिपाली देशमुख, ज्योती गायकवाड, कविता डामरे, सविता शेळके, विद्या राणे, दिपा लांडे, मनिषा भुजाडे, ओवी जवादे, मिनाक्षी शेगोकार, आर्किटेक्ट मंगला खरे, वृषाली तळेगांवकर, प्रणिता समृतकर, वृषाली डिंकुटवार, कु. सोनाली दिलीपवर, महानंदा गावंडे, दिवनाले मॅडम यांना प्रमाणपत्र, पुष्पगुच्छ देऊन सन्मानित केले. यावेळी पत्रकार पंजाबराव वर व सुनंदा वर यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला. कोरोना योद्धा पुरस्काराने लिडरग्रुपचे आनंद सिरसाट, आकाश हिवराळे, मंगेश लोखंडे, संकेत कांबळे, निलेश मनवर, दुर्गेश मानकर, मनिष गोरे, उत्कर्ष पिंजरकर, तारण इंगोले यांना मान्यवरांचे हस्ते सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाचे आयोजन रोशन गायकवाड व पंजाबराव वर यांनी केले.

**सांगली** : राष्ट्रीय विज्ञान दिनाच्या निमित्ताने सांगली जिल्ह्यात महा. अं नि स वतीने प्रबोधनाचे कार्यक्रम झाले. के. बी. पी. स्कूल, सांगली, तक्षिला स्कूल सांगली, दगडे कन्या शाळा येथे ज्येष्ठ खगोल अभ्यासक शंकर शेलार यांनी कार्यक्रम केला.

सेकंडरी स्कूल अँड ज्यूनियर कॉलेज भिलवडी येथे निलेश कुडाळकर यांनी प्रबोधन कार्यक्रम केला.

केदारवाडी ता. वाळवा येथे कासेगावच्या राजाराम बापू फार्मसी कॉलेजच्या एन.एस.कार्यक्रमात 'महिला आणि अंधश्रद्धा'या विषयावर संजय बनसोडे यांनी मार्गदर्शन केले.

•



# जय महाकाली शिक्षण संस्था

जय महाकाली शिक्षण संस्था–शिक्षा, ज्ञान, विज्ञान, अध्यात्म, संस्कार और सभ्यता का मंदिर है। हमारे भीतर का आत्मज्ञान, आत्मबोध, आत्माचरण इस ज्ञान मंदिर का ईश्वर है। उसे जानने के लिए नीति, नियम, संयम, सत्य आचरण आपकी पतवार है। विद्यार्थी बच्चों मन में संकल्प करो, यहाँ विकल्प अवश्य मिलेगा। सोचो, समझो, जागो, आगे बढो। सफलता आपके कदम चुमेगी। तब सारा संसार आपका सम्मान, सत्कार एवं स्वागत करेगा।



**पं. श्री. शंकरप्रसादजी अग्निहोत्री**
अध्यक्ष, जय महाकाली शिक्षण संस्था, वर्धा



**श्री. सचिनजी अग्निहोत्री**
सचिव, जय महाकाली शिक्षण संस्था, वर्धा

# श्री गणेश इंडस्ट्रीज

डोंगरशेळकी, ता. उदगीर, जि. लातूर

## उच्च प्रतीची L&T Co. ची क्रश सॅण्ड मिळेल.

**महेश अंदे**

मोबा.: 9689021757, 8459923177




**Book Packets Containing periodicals**

प्रति, ______________________

______________________

______________________

**प्रेषक,**

संपादक

**अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका**

कल्पतरू, कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजसमोर,

इस्लामपूर, जि. सांगली–४१५४०९.

भारती मुद्रणालय, कोल्हापूर.